



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार २ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# समृद्धीवर ट्रकने ६ महिला मजुरांना चिरडले

## जालना जिल्ह्यातील घटना; सर्व ६ जणींचा घटनास्थळीच मृत्यू



**जालना /प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर आज बुधवार दि. १ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अत्यंत दुर्दैवी आणि भीषण अपघाताची घटना घडली आहे. जालन्यातील कडवंची शिवारात हा भीषण अपघात झाला असून, या अपघातात ६ महिला मजुरांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून मुंबईच्या दिशेने वेगाने जाणा-या ट्रकने महामार्गावर काम करत असलेल्या महिला मजुरांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की काही महिला मजूर ट्रकखाली चिरडल्या गेल्या आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातानंतर घटनास्थळी हाहाकार माजला होता. अपघाताची माहिती मिळताच तालुका जालना पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी पंचनामा आणि पुढील तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच स्थानिक नागरिकांनीही तत्परता दाखवत मदतकार्य हाती घेतले आणि जखमींना रु ग्णालयात हलवण्याचा प्रयत्न केला.

**लेकरांचा मन हेलावणारा आक्रोश-** या घटनेमुळे समृद्धी महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महामार्गावर काम करणा-या मजुरांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत का? असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, या अपघाताबाबत अधिकृत माहिती मिळवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असून मृतांचा आकडा आणि ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. या घटनेवर माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनीही प्रतिक्रिया देत दुःख व्यक्त केले आहे. पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून अपघाताचे नेमके कारण लवकरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच नातेवाईकांपैकी कुणी रु ग्णालयात पोहोचले तर कुणी अपघातस्थळी पोहोचले. तिथले दृश्य पाहून लेकरांनी एकच आक्रोश केला.

# देशात इंधनाचा दोन महिन्यांचा साठा

## ■ पेट्रोल-डिझेलच्या तुटवड्याची भीती संपली
## ■ पेट्रोलियम मंत्रालयाकडून माहिती जारी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्य-पूर्वेत अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात भडकलेल्या युद्धामुळे भारतात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा तुटवडा निर्माण होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. पण, पेट्रोलियम मंत्रालयाने ही भीती पूर्णपणे फेटाळून लावली आहे. देशात पुढील दोन महिने पुरेल एवढा इंधन साठा उपलब्ध आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय बाजारात एलपीजीच्या किमतीत सुमारे ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, देशांतर्गत ग्राहकांसाठी सिलिंडरच्या किमतीत कुठल्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. यामुळे तेल कंपन्यांना काही प्रमाणात तोटा सहन करावा लागत आहे असे मंत्रालयाने म्हटले आहे.

**सर्वसामान्यांना मोठा दिलासा-** मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दोन महिन्यांपूर्वी ब्रेंट क्रूडचा भाव ७० डॉलर प्रति बॅरल एवढा होता, जो आता १०० डालरच्याही वर पोहोचला आहे. मात्र, ६ एप्रिल २०२२ पासून देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढलेल्या नाहीत. यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय चढ-उतारांचा भार तेल कंपन्या सोसावा लागत आहे.

**गॅस आणि इंधन पुरवठाही सुरळीत-** मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार पीएनजी आणि सीएनजीचा १०० टक्के पुरवठा सुनिश्चित करण्यात आला आहे. ९२ टक्के गॅस बुकिंग ऑनलाइन होत आहे. ८१ टक्के डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोडद्वारे पूर्ण केली जात आहे. काल एकाच दिवसात ६० लाख सिलिंडरचे वितरण करण्यात आले. महत्वाचे म्हणजे, विमान इंधनाच्या दरात २५ टक्क्यांनी वाढ झाली असली, तरी जागतिक बाजारपेठेच्या तुलनेत ही वाढ फार कमी आहे. हवाई प्रवास खिशाला परवडणारा असावा, ही सरकारची प्राथमिकता आहे असेही मंत्रालयाने म्हटले आहे.

### आरोपी महिलेकडे शरीरसुखाची मागणी

# सहाय्यक पोलिस निरीक्षक जाधववर गुन्हा

**अकोला/ प्रतिनिधी-** पोलिस दलाची मान शरमेने खाली घालणारी धक्कादायक घटना अकोल्यातून समोर आली आहे. ८० लाख रु पयांच्या फसवणूक प्रकरणात पोलिस कोठडीत असलेल्या एका महिला आरोपीकडे, कर्तव्यावर असलेल्या एका पोलिस अधिका-याने शरीरसुखाची मागणी केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे अकोला पोलिस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. वरिष्ठ अधिका-यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतली आहे. सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक राजेश जाधव याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणात पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नोकरी लावण्याच्या बहाण्याने ८० लाख रु पयांची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित महिलेला सायबर पोलिसांनी



अटक केली होती. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. या कोठडी दरम्यान महिलेला अकोला शहरातील सिव्हिल लाईन पोलिस ठाण्यात ठेवण्यात आले होते. कोठडीत असताना तेथील सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक राजेश जाधव याने आपल्याकडे शरीरसुखाची मागणी केली, असा खळबळजनक दावा आरोपी महिलेने लेडी पोलिस कर्मचा-याकडे केला.ही बाब संबंधित महिला पोलिस कर्मचा-याने तातडीने आपल्या वरिष्ठ अधिका-यांच्या कानावर घातली. आपल्याच विभागातील एका अधिका-याने असे नीच कृत्य केल्याचे समजताच वरिष्ठ पोलिस अधिका-यांचा पारा चढला. माहिती मिळताच वरिष्ठांनी थेट सिव्हिल लाईन पोलिस ठाणे गाठले आणि तेथील संबंधित पोलिस एएसआय राजेश जाधवची चांगलीच कानउघाडणी करत त्याला सर्वांसमोर झापले. या प्रकारामुळे पोलिस ठाण्यात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# इराणचा बहरीनमधील ॲमेझॉनच्या कार्यालयावर हल्ला

**तेल अवीव/तेहरान/वॉशिंग्टन -** इराणने आज बहरीनमधील अमेरिकन कंपनी अमेझान वेब सर्व्हिसेसच्या डेटा सेंटरवर हल्ला केला. फायनान्शिअल टाइम्सच्या वृत्तानुसार, या हल्ल्यानंतर त्या ठिकाणी आग लागली. यापूर्वी, बहरीनच्या गृह मंत्रालयानेही कंपनीच्या इमारतीत आग लागल्याचे कळवले होते, जी अग्निशमन दलाच्या पथकांकडून विझवली जात होती. मात्र, त्यावेळी कंपनीचे नाव उघड करण्यात आले नव्हते. मध्यपूर्वेत कार्यरत असलेल्या १८ अमेरिकन कंपन्यांना लक्ष्य करण्याची धमकी इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने दिल्यानंतर दुस-याच दिवशी हा हल्ला झाला आहे. यामध्ये मायक्रोसफ्ट, अपल, गुगल आणि मेटा यांसारख्या कंपन्यांचा समावेश आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की इराणसोबतचे युद्ध संपवण्यासाठी कोणत्याही कराराची गरज नाही. अमेरिका हे युद्ध २ ते ३ आठवड्यांत संपवू शकते.

**युद्धाने मध्य पूर्वेला ?१८ लाख कोटींचे नुकसान-** युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) ने म्हटले आहे की, मध्य पूर्वेत सुरू असलेले युद्ध संपूर्ण प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला मोठे नुकसान पोहोचवू शकते. त्यांच्या अहवालानुसार, हा संघर्ष आता केवळ काही देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर संपूर्ण प्रदेशासाठी एक मोठे संकट बनले आहे.



इस्त्रायलमध्ये इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात चौदा जण जखमी झाले. हा हल्ला तेल अवीवजवळ झाला. इस्त्रायलची आपत्कालीन सेवा, मागेन डेव्हिड अडोमने सांगितले की, सर्व जखमींना बनी ब्राक भागातील एका रु ग्णालयात दाखल करण्यात आले आहे.जखमींमध्ये एका ११ वर्षांच्या मुलीचा समावेश आहे, जिची प्रकृती गंभीर आहे. क्षेपणास्त्राच्या तुकड्यांमुळे ती गंभीर जखमी झाली आहे. एक १३ वर्षांचा मुलगा आणि एक ३६ वर्षांची महिला देखील गंभीर जखमी झाले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी आज सौदी युवराज मोहम्मद बिन सलमान (एमबीएस) यांच्याशी फोनवर संवाद साधला. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, ट्रम्प यांनी एमबीएस यांना इराण युद्धातील शस्त्रसंधीबद्दल माहिती दिली.युएईने एकाच दिवसात इराणची ५ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ३५ ड्रोन पाडल्याचे म्हटले आहे. युद्ध सुरू झाल्यापासून युएईने एकूण ४३८ क्षेपणास्त्रे आणि २,०१२ ड्रोन रोखले आहेत. इराणी रेड क्रेसेंटच्या माहितीनुसार, युद्धामुळे देशभरात १,१५,००० हून अधिक इमारतींचे नुकसान झाले आहे. यामध्ये घरे, रु ग्णालये, शाळा आणि मदत केंद्रांचा समावेश आहे.

# गॅस सिलिंडर तब्बल 195 रु पयांनी महागले

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाचे पडसाद भारतात उमटत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलिंडरच्या दरात १९५.५० रु पयांची मोठी वाढ



केली आहे. मात्र, घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरचे दर स्थिर ठेवल्याने सर्वसामान्यांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.तेल कंपन्यांनी जाहीर केलेल्या नवीन दरवाढीनुसार, दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत आता २,०७८.५० रु पयांवर पोहोचली आहे. यापूर्वी १ मार्च रोजी या सिलिंडरच्या दरात ११४.५ रु पयांची वाढ करण्यात आली होती. एका महिन्यात दुस-यांदा झालेली ही मोठी दरवाढ हाटेल, आहारगृहे आणि केटरिंग व्यावसायिकांचे बजेट कोलमडवणारी ठरणार आहे.

# लॉकडाउनच्या अफवा पसरवल्यास गुन्हा

## केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांचे अफवा न पसरवण्याचे आवाहन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सोशल मीडिया आणि व्हाट्सअॅपवर १ एप्रिल रोजी वार लाकडाउन नोटीस व्हायरल झाली, ज्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. अशोकचक्र आणि मंत्रालय यांसारख्या चिन्हांसह तयार केलेली ही नोटीस पहिल्या दृष्टीक्षेपात अधिकृत वाटली, परंतु नंतर ती एप्रिल फूलचा विनोद असल्याचे निष्पन्न झाले.केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्स वर लाकडाउनच्या अफवा पूर्णपणे निराधार असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, सरकारच्या स्तरावर कोणत्याही प्रकारच्या लाकडाउन प्रस्तावावर विचार केला जात नाही. त्यांनी लोकांना शांतता राखण्याचे आणि अफवा न पसरवण्याचे आवाहन केले. मंगळवारी व्हायरल झालेल्या या नोटीसचे स्वरू प आणि भाषा अगदी सरकारी आदेशासारखी ठेवण्यात आली होती, ज्यामुळे अनेक लोकांनी पडताळणी न करता ती पुढे फारवर्ड केली. तथापि, दस्तऐवज उघडल्यावर सत्य समोर आले. त्यात एप्रिल फुल असे लिहिले होते आणि सोबत एक इमोजी देण्यात आला होता. यावरू न हे स्पष्ट झाले की, ही केवळ मस्करी म्हणून तयार केलेली बनावट नोटीस होती.लाकडाउनच्या बातम्या खोट्या आहेत- हरदीप सिंग पुरी म्हणाले की, लाकडाउनची बातमी पूर्णपणे खोटी आहे. सरकारकडे असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. अशा अफवा पसरवणे बेजबाबदारपणाचे आणि हानिकारक आहे. अलीकडच्या




काळात इराणशी संबंधित तणाव, हार्मुझच्या सामुद्रधुनीतून पुरवठा थांबण्याची शक्यता आणि भारतात पेट्रोल, डिझेल व एलपीजीच्या वाढत्या किमतींमुळे लोक आधीच चिंतेत होते. याच कारणामुळे अनेकांनी व्हायरल पोस्ट खरी मानली. यासोबतच २०२० च्या कोविड लाकडाउनच्या आठवणी आणि त्यावेळचे वातावरणही ही अफवा वेगाने पसरण्याचे एक मोठे कारण बनले. सरकारने किंवा कोणत्याही सरकारी एजन्सीने युद्ध किंवा सुरक्षा कारणांमुळे कोणत्याही लाकडाउनचा सल्ला किंवा सूचना जारी केलेली नाही. ही घटना पुन्हा एकदा दर्शवते की भीती आणि गोंधळाच्या वातावरणात बनावट संदेश खूप वेगाने पसरतात. तज्ज्ञांनी लोकांना सांगितले आहे की कोणताही संदेश पुढे पाठवण्यापूर्वी त्याची सत्यता अधिकृत स्त्रोतांकडून नक्की तपासावी.

### *गुरु देवजींच्या आशीर्वादामुळे चमत्कार*

# माझ्या घशाची समस्या नाहीशी

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या भाजपच्या महापौर रितू तावडे यांच्या एका वक्तव्याची सध्या जोरदार चर्चा होत आहे. गुरुदेवजींच्या चमत्कारामुळेच माझ्या घशाची समस्या नाहीशी झाली, असे वक्तव्य रितू तावडे यांनी केले आहे. महावीर जयंती निमित्त बोरोवली कोरा केंद्र मैदानात आयोजीत करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सध्या नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण चर्चेत आहे. आता तावडे यांच्या या विधानामुळे जोरदार चर्चा सुरू आहेत.'दीड ते दोन वर्षांपासून मला घशाची समस्या होती. मी गुरु जींना सांगितले की आवाजाची समस्या आहे. मी औषधं घेत आहे. परंतु काहीही फरक



परत नसल्याचे त्यांना सांगितले. त्यांनी आशीर्वाद दिला आज मी स्पष्ट बोलत आहे. हा मोठा चमत्कार असल्याचे विधान महापौर रितू तावडे यांनी केले आहे. आज माझा आवाज तुम्ही ऐकत आहात. खूपच सकारात्मक उर्जा अनुभवायला मिळत आहे असे रितू तावडे म्हणाल्या. भगवान महावीर यांचा अहिंसेचा मार्ग आपल्याला दिसत आहे. दीड वर्षांपासून मी ज्या घशाच्या समस्येने त्रस्त होते, पण गुरु जींनी आशीर्वाद दिल्याने मी आज तुमच्यासमोर असं बोलू शकत असल्याचे तावडे म्हणाल्या. तावडे यांच्या विधानाची जोरदार चर्चा सुरू आहे.






# यवतमाळच्या ऐतिहासिक समता पर्वात वैचारिक कार्यक्रमाची भरगच्च मेजवानी

## दोन नाटकं, प्रसिद्ध वक्त्यांचे परिसंवाद, कवी संमेलन, महिलांसाठी भरगच्च कार्यक्रम



### -यवतमाळ आयडॉल ची संगीतमय मेजवानी

**यवतमाळ/प्रतिनिधीः-**

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फुले आणि राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती पर्वावर गत २२ वर्षापासून यवतमाळ येथे समतापर्वाचे आयोजन करण्यात येत असते. याही वर्षी समतापर्व प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित समता पर्वामध्ये वैचारिक कार्यक्रमाची मेजवानी मिळणार आहे. यवतमाळच्या समता मैदानावर दिनांक ७ एप्रिल पासून तर १३ एप्रिल पर्यंत विविध वैचारिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती आयोजकांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंगळवार दि. ७ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता पासून विविध स्पर्धा समूह नृत्य आणि प्रसिद्ध संगीतकार डॉ. मधुकर मेश्राम यांचा सुगम संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. बुधवार दिनांक ८ एप्रिल रोजी समता पर्व महिला समिती द्वारा वूमन आयकॉन, महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम आणि सायंकाळी ६ वाजता कवी संमेलन आयोजित आहे.

गुरुवार दिनांक ९ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता पासून यवतमाळ आयडॉलचे भव्य उद्घाटन अनिल रामजी आडे यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी प्रसिद्ध पत्रकार अभिजीत कांबळे संपादक बीबीसी मुंबई यांचे भारतीय राजकारणाचे पतन व माध्यमांची जबाबदारी या विषयावर प्रबोधन होणार आहे.

गुरुवार दिनांक १० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता समता पर्व विचारवेध सत्र आणि उद्घाटकीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे .या कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रदीप झाडे महाप्रबंधक नेर अर्बन बँक, नारायण फुले अध्यक्ष समतापर्व २०२६, शंकरराव नारनवरे मार्गदर्शक समता पर्व, नरेंद्र फुलझेले, डॉ. विशाल जाधव, मंगला मून सहायक आयुक्त सामाजिक न्याय विभाग, ओमप्रकाश नगराळे सहाय्यक आयुक्त बहुजन कल्याण, संघपाल मेश्राम, धीरज थूल, इत्यादी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

समारोपीय कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी पदी यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री, लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

यावेळी नारायण थूल अध्यक्ष, डॉ.विलास कन्नाके सचिव, राजू चांदेकर, कार्याध्यक्ष उमेश मेश्राम, प्रवक्ता, माधुरी अनिल आडे मुख्य संयोजक महिला समिती, प्रमोदिनी रामटेके कोषाध्यक्ष, डॉ.चंद्रकांत सरदार, राहुल कोचे, चंद्रकांत वाळके, एड. ज्योती जीवने, हर्षाली बोडके, काजल तायडे, धर्मपाल भितकर, शुभम वाळके, डॉ. शैलेंद्र तेलंग, डॉ. बाळकृष्ण सरकटे, सुरज खोब्रागडे, रमेश अतकर, नंदकिशोर निमगडे, डॉ. दिलीप घावडे, जनार्दन मनवर, रीना वानखडे, माधुरी वाळके, वृंदा कांबळे इत्यादींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# सामुहिक बलात्कारातील आरोपींना फाशीची शिक्षा द्या



## -प्रहारची पोलीस आयुक्तालयावर धडक

**अमरावती/प्रतिनिधीः-**

भानखेडा जंगलात तरुणी सोबत झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपीविरुद्ध मकोका लावून त्यांना फांशीची शिक्षा देण्याची मागणी प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने बुधवारी १ एप्रिल रोजी पोलीस आयुक्त राकेश ओला यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ही घटना निंदनीय आहे. यामुळे महिला आणि तरुणी मध्ये असुरक्षेची भावना निर्माण झाली आहे. म्हणून या प्रकरणातील आरोपींविरुद्ध मकोका लावण्यात यावा तसेच प्रकरण फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालवून आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच पीडित तरुणीच्या वतीने नामांकित विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती करण्यात यावी. कोणत्याही स्थितीत पिडितेला न्याय मिळाला पाहिजे अशी मांगणी पोलिस आयुक्तांकडे करण्यात आलेली आहे. यावेळी प्रहार महानगरप्रमुख बंटी रामटेके, जिल्हाप्रमुख पवन उर्फ छोटू महाराज वसु ,गोलू पाटील, जितू दुधाने ,शेख अकबर, अलका शहाणे, शुभांगी वाटाणे, भारती वानखडे, कविता भूसूम, पुष्पा तेलगोटे, गिरी बापू, शेषराव मुले, विक्रम जाधव, नंदू वानखडे, अजय तायडे, अनिल रामटेके, सुनिता राजुरकर, अजय तायडे, कुणाल खंडारे , सुनिता सवई ,छाया पोंगर ,दिपाली गडलिंग ,चंदा वानखडे ,जयश्री वानखडे ,शोभा हिरेकर ,रंजना मुजर, रेखा गोसावी, निर्जला वानखडे, माया मेश्राम ,सुनंदा इंगळे, शांता रीठे, शालू तायडे, कल्पना चौधरी मोनू सरोवर, अंजू वासनिक, दीक्षा पोंगई, पद्मा पांडे, संगीता घारड ,निर्मला डोंगरे, सुनीता राऊत, पंचफुला नांदणे, सुलभा तेलमोरे आदि उपस्थित होते.

# विभागीय शिक्षक मेळावा शुक्रवारी

## भाजपा शिक्षक आघाडी व शिक्षक संघर्ष संघटनेचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-**

भाजपा शिक्षक आघाडी व शिक्षक संघर्ष संघटनेच्या वतीने विभागीय शिक्षक मेळाव्याचे उद्या शुक्रवार ३ एप्रिल रोजी शहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजन करण्यात आलेले आहे. मेळाव्यात मुख्य अतिथी म्हणून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्य शिक्षण मंत्री पंकज भोयर, पदमश्री जनार्दन पंत बोते, शिक्षक आमदार श्रीयुत ज्ञानेश्वर म्हात्रे आदि उपस्थित राहणार असल्याची माहिती आज बुधवार १ एप्रिल रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये भाजपा शिक्षक आघाडी विभागीय संयोजक संगीता शिंदे यांनी दिली.

त्यांनी सांगितले की मेळाव्या दरम्यान शिक्षण क्षेत्रातील दिग्गज हाजेरी लावणार आहे. मेळाव्या दरम्यान शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर दीर्घकालीन उपाय योजना बाबत मंथन होणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवणारे, ज्यांनी मराठी शाळांची कीर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवली असे दत्तात्रेय वारे गुरुजी यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्या दरम्यान शाळांचा कायापालट, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची कीर्ती, अमरावती विभागातील शाळांचा विकास यावर हे मार्गदर्शन करणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, जुनी पेन्शन, शाळांना शंभर टक्के अनुदान, टीईटी प्रश्न आदि शैक्षणिक विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष रवींद्र चव्हाण, डॉ.उपेंद्र कोठेकर, खासदार डॉ. अनिल बोंडे, महापौर श्रीचंद तेजवानी, आमदार रवी राणा, प्रताप अडसड, केवलराम काळे ,प्रवीण तायडे ,राजेश वानखडे, चंदू उर्फ उमेश यावलकर, माजी मंत्री प्रवीण पोटे, किरण महल्ले, माजी खासदार नवनीत राणा, रविराज देशमुख ,डॉ.नितीन धांडे, किरण पातुरकर, दिनेश सूर्यवंशी, शिवराय कुळकर्णी ,तुषार भारतीय, कमलताई गवई , अनंतराव गुढे आदि उपस्थित राहणार आहे. मेळाव्यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये डॉ.संगीता शिंदे यांच्या सोबत अन्य पदाधिकारी देखील उपस्थित होते.

# डंपरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**चिखलदरा/प्रतिनिधीः-**

डंपरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील पाचडोंगरी ते ढाणा मार्गावर आज बुधवार १ एप्रिलच्या सकाळी समोर आली आहे. मनोज भुता बेठेकर (वय ३५,नवलगांव ) असे अपघातात मृत तरुणाचे नाव आहे. माहिती नुसार मनोज भूता बेठेकर आजारी असल्याने आपल्या उपचारासाठी नवलगांव ते काट कुंभ येथे जात होते. त्यावेळी पाच डोंगरी ते ढाणा मार्गावर समोरून येणाऱ्या डंपर एमएच २७ बीएक्स ८६९७ ने बेठेकर यांना जोरदार धडक दिली. या मध्ये मनोज बेठेकर यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाता नंतर डंपर चालक तिथून फरार झाला.घटनेची माहिती मिळताच काटकुंभ पोलीस चौकीचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह



पोस्टमार्टम साठी पाठवला. पुढील तपास सुरू आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### उड्डाणपुलावरील लोखंडी प्लेट

मृत घोषित केले. विशेष म्हणजे, गेल्या तीन वर्षांपासून कोट्यवधी रुपयांच्या खर्चातून सुरू असलेल्या या पुलाच्या कामात सुरक्षेचे नियम अक्षरशः धाब्यावर बसवले असल्याचे स्पष्ट झाले आहे. काम अंतिम टप्प्यात असताना अशा प्रकारची बेफिकीरी उघड झाल्याने प्रशासनाच्या देखरेखीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच दाभेरी ग्रामस्थ संतप्त झाले. रुग्णालयात धाव घेत त्यांनी ठेकेदार व संबंधित सुपरवायझरवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्याची जोरदार मागणी केली. 'ही घटना अपघात नसून निष्काळजीपणातून घडलेली हत्या आहे,' असा संतप्त सूर ग्रामस्थांतून उमटत आहे. पोलिस निरीक्षक ईश्वर वर्गे व वैभव घोगरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. रेल्वे पुलाचे बांधकाम म्हणजे उच्च जोखमीचे काम. मात्र येथे ना सेफ्टी नेट, ना सावधानतेचे फलक, ना कोणतीही संरक्षण व्यवस्था! ग्रामस्थांनी वारंवार सूचना देऊनही ठेकेदाराने दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. अखेर या बेफिकीरीची किंमत एका निष्पाप जीवाने चुकवली. आता तरी जबाबदारांवर कठोर कारवाई होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### पिता-पुत्रावर प्राणघातक हल्ला

स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करत दोघांनाही जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथे दाखल केले. मात्र धम्मदीप बोरकर यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे, तर हिरामण बोरकर यांची स्थिती चिंताजनक असल्याने त्यांना नागपूर येथे हलवण्याची तयारी करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच फेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

**जुन्या वादातून हल्ला-** प्राथमिक तपासात हा हल्ला जुन्या वादातून झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या घटनेमुळे संजय गांधी नगर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे. हल्लेखोरांना तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. पुढील तपास फ्रेजरपुरा पोलिस करीत आहेत.

### गळफास घेऊन युवकाची आत्महत्य

विटभट्टीवर काम करून सचिन बोकळे यांच्या विटभट्टीकडे जात असताना अंजनगाव बारी जंगल परिसरात पळसाच्या झाडाला अरुण उईके हे गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. दरम्यान त्यांचे नातेवाईक आणि विटभट्टी मालक मिलिंद भोयर यांनी या घटनेची माहिती तात्काळ पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही केली. प्राथमिक माहितीनुसार, सदर युवकाने घरगुती कारणातून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद (मर्ग) दाखल केली असून पुढील तपास सुरू आहे.

### सातुर्णा परिसरातील फ्लॅटमध्ये

माहितीनुसार , राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भव्यदिप अपार्टमेंटमधील फ्लॅट क्रमांक २०२ येथे देहव्यापार सुरू असल्याचे समोर आले होते. त्यानंतर पोलिसांनी खात्री करण्यासाठी डमी ग्राहक पाठवून सापळा रचला. डमी ग्राहकाकडून संकेत मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने पंचांसह छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत संबंधित फ्लॅटमधून देहव्यापार चालवणारी महिला मालक, दोन युवक आणि दोन युवतींना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत मागील सुमारे तीन महिन्यांपासून या फ्लॅटमध्ये हा अवैध व्यवसाय सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. ताब्यात घेतलेल्या महिलेकडून मोबाईल व आर्थिक व्यवहारांची तपासणी सुरू असून, या रॅकेटला मदत करणारे तसेच ग्राहक म्हणून येणाऱ्या व्यक्तींचीही चौकशी केली जाणार आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी रोख ९,१५० रुपये आणि पाच मोबाईल फोन असा एकूण सुमारे ७४,१५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निरीक्षणात गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली. दरम्यान, शहरात अशा अवैध धंद्यांची माहिती नागरिकांनी पोलिसांना द्यावी, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले असून माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र

दोघी शिलांगण ते भुतेश्वर रोड मार्गे निघाल्या होत्या.

दरम्यान, जगताप यांच्या दुचाकीच्या मागून भरधाव वेगाने आलेल्या एका दुचाकीवर दोन युवक होते. क्षणाचाही विलंब न करता मागे बसलेल्या युवकाने जगताप यांच्या गळ्यातील ४० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र जोराने हिसकावले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे त्या घाबरून गेल्या. झटापटीदरम्यान मंगळसूत्रातील १२ ग्रॅमचे पेंडल खाली पडले, मात्र २८ ग्रॅमची सोन्याची पट्टी लुटारूंनी हिसकावून घेतली आणि गडगडेश्वर मार्गाने भरधाव वेगाने पसार झाले.

घटनेनंतर घाबरलेल्या जगताप यांनी तत्काळ मागे येणाऱ्या मैत्रीणीला आवाज देत घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर त्वरित डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती देण्यात आली. काही वेळातच पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. पोलिसांनी परिसराची पाहणी करून अज्ञात लुटारूंविरुद्ध गुन्हा नोंदवला असून त्यांचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. भरदिवसा घडलेल्या या धाडसी लुटीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून महिलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### उड्डाण पुलाखाली तलवारींसह

हद्दीत नियमित पेट्रोलिंग सुरू असताना सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम उड्डाण पुलाखाली हातात तलवार घेऊन उभा आहे. मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पाहणी केली असता संबंधित इसम हातात तलवार घेऊन उभा असल्याचे आढळले. त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडून सुमारे ५०० रुपये किमतीची लोखंडी पाते असलेली तलवार जप्त करण्यात आली. या प्रकरणी नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द शस्त्र अधिनियम कलम ४, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक गणेश राऊत, पोहेकॉ राजाभाऊ राऊत, पोलीस कॉन्स्टेबल वैभव तिखिले, राजीक खान, शोएबुद्दीन सैयद, निलेश साविकार आणि अमित ढोले यांनी पार पाडली.

### जिल्ह्यात 'एचटीबीटी' कापूस

केल्यास पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. बियाणे केवळ अधिकृत परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावे. खरेदी करताना पक्के बिल अवश्य घ्यावे. त्यात पीक, वाण, लॉट क्रमांक आणि कंपनीचे नाव असल्याची खात्री करावी. पॅकेटवर सरकारमान्य अधिकृत चिन्ह तपासावे. बीजी-२ (बोलगार्ड २) वाणाची किंमत ९०१ रूपये आहे. बियाणे पाकीट पूर्णपणे सीलबंद असल्याची खात्री करावी. पाकीटावरील बियाणे उगवणीची अंतिम मुदत तपासून पहावी. सर्व वाणांमध्ये बीजी-२ तंत्रज्ञान सारखेच असल्याने विशिष्ट वाणाचा आग्रह धरू नये. १०० मिलीमीटर पाऊस झाल्याशिवाय कापूस लागवड करू नये, पूर्व हंगामी लागवड टाळावी. विक्रेत्याने पक्के बिल देण्यास नकार दिल्यास तालुका कृषी अधिकारी किंवा कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) यांच्याशी संपर्क साधावा.

बेकायदेशीर बियाणे विनापावती आणि चढ्या दराने विकले जातात. त्यांच्या पाकीटावर गुणवत्तेचे विवरण, तंत्रज्ञान किंवा कोणत्या क्षेत्रासाठी शिफारस केली आहे, याचा कोणताही उल्लेख नसतो. जिल्ह्यात जर अशा बोगस बियाण्यांची विक्री किंवा लागवड करताना आढळल्यास, तात्काळ कृषी विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांना कळवावे. ही माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाते, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी कळविले आहे.

### दुचाकीसह खड्ड्यात कोसळून

कॅनॉलच्या एका खड्ड्यात त्याचा मृतदेह आज दुपारी १ वाजता आढळून आला.

अचानक वादळी वाऱ्यामुळे त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले व यातच त्याचा कॅनॉलनजीकच्या खड्ड्यात कोसळून मृत्यू झाला असावा,असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी तिवसा पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

### शेअर मार्केटमध्ये नफा देण्याचे

त्यानंतर पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता संबंधित महिलेने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. यानंतर आपली साडे पाच लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शेंद्रे यांनी सायबर पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### नवसारी येथे उभारणार भव्य

करून क्रीडा संकुल विकसित केले आणि काही क्षेत्रावर (१८७८.८० चौ.मी.) वाणिज्य वापर सुरू केला होता. या शर्तभंगामुळे शासनाच्या नियमांनुसार या जागेचे अकृषिक दराने होणारे मूल्यांकन १० कोटी ९० लाख १९ हजार ७०० रुपये आणि २०११ पासूनच्या वाणिज्य वापरापोटीचे व्याज ३ कोटी ५६ लाख २१ हजार ८६२ रुपये, अशी एकूण १४ कोटी ४६ लाख ४१ हजार ५६२ रुपयांची रक्कम शासनाकडे जमा करण्याचे आदेश देण्यात आले होते.

परंतु, अमरावती महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती बेताची असून, कर्मचाऱ्यांची देणी व कंत्राटदारांची थकीत देयके असे जवळपास ३५० कोटींचे दायित्व महापालिकेवर आहे. महापालिकेच्या स्वउत्पन्नातून एवढी मोठी रक्कम भरणे शक्य नसल्याचे महापालिका आयुक्तांनी शासनाला कळवले होते. याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील पाठपुरावा करुन पालिकेसाठी हे मैदान उपलब्ध करुन देण्याचा मार्ग मोकळा करुन दिला.

### शहरात वाहतूक नियमांमध्ये

विभागास राहील. तसेच अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता सहायक पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतूकीच्या नियमनाबाबत अंशत: बदल करण्याचे अधिकार राहील. या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालक, वाहनधारकांवर मोटर वाहन अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी या कालावधीत सहकार्य करावे आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

Annexure "B"
Advt No -/ 2026
MEDICAL FACULTY (UG)

**DR. RAJENDRA GODE MEDICAL COLLEGE, AMRAVATI**

UNIVERSITY-MARDI ROAD, GHATKHEDA, AMRAVATI
(www.drgmch.ac.in)
(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

**WANTED**

A) Applications are invited for filling up the following posts in the above said College / Institute

| Sr. No. | Type of Post | Vacant Post | | |
|---|---|---|---|---|
| | DEAN / PRINCIPAL | 1 (OPEN) | | |
| Sr. No. | SUBJECT | Professor | Reader | Lecturer |
| 1 | ANATOMY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) |
| 2 | PHYSIOLOGY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) |
| 3 | BIOCHEMISTRY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) |
| 4 | PHARMACOLOGY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) |
| 5 | PATHOLOGY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) |
| 6 | BLOOD BANK | -- | -- | -- |
| | MICROBIOLOGY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) |
| 7 | FORENSIC MEDICINE | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| 8 | Community Medicine/ Preventive & Social Medicine | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ), 01 (OBC) |
| | Epidemiologist-cum-Asst.Prof. | -- | | -- |
| | Statistician-cum-Asst. Prof. | -- | | 01 (OPEN) |
| | RHTC-MO cum Lecturer/ Asst.Prof. | -- | | -- |
| | UHTC-MO cum Lecturer/ Asst.Prof. | -- | | -- |
| 9 | GENERAL MEDICINE | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ), 01 (OBC) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ), 01 (OBC), 01 (SEBC) |
| 10 | PAEDIATRICS | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) |
| 11 | V.D. & LEPROSY | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| 12 | PSYCHIATRY | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| 13 | GENERAL SURGERY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ), 01 (OBC) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ), 01 (OBC), 01 (SEBC) |
| 14 | ORTHOPAEDICS | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) |
| 15 | OPHTHALMOLOGY | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) |
| 16 | OTO-RHINO-LARYNGOLOGY | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) |
| 17 | OBSTETRICS & GYNAECOLOGY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ), 01 (OBC) |
| | Antenatal Medical Officer cum Asst. Professor | -- | | -- |
| | Maternity and Child Welfare Officer cum Asst. Professor | -- | | -- |
| 18 | ANAESTHESIOLOGY | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ) | 01 (SC), 01 (OPEN), 01 (VJ), 01 (OBC), 01 (SEBC) |
| 19 | RADIO-DIAGNOSIS | 01 (OPEN) | 01 (OPEN) | 01 (SC), 01 (OPEN) |
| 20 | DENTISTRY | -- | 01 (OPEN) | 01 (OPEN) |
| | Persons with Disabilities | | | |

All eligible candidates to report for interview along with their original documents and one set of self-attested photocopy on 12/04/2026 at **Dr. Rajendra Gode Medical College, Amravati.**
Reporting time: **10:00 am.**
TA/DA is not Applicable.
**Eligibility :** Teaching post: As per guidelines of NMC & MUHS, Nashik

Sd/-
President / Secretary / Dean /

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## मोहगव्हाणमध्ये अवैध दारूचा सुळसुळाट
## प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*तालुक्यातील मोहगव्हाण गावात अवैध दारू विक्रीने अक्षरशः थैमान घातले असून, गावातील सामाजिक वातावरण ढासळत चालल्याने महिलांचा संताप तीव्र झाला आहे. 'गाव उद्ध्वस्त होत असताना प्रशासन झोपले आहे का?' असा संतप्त सवाल करत वज्रादेही महिला विकास संघाच्या संस्थापक अध्यक्षा आरतीताई ठोके यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे आक्रमक निवेदन सादर केले आहे.*



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मोहगव्हाण येथे मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार करून खुलेआम विक्री केली जात आहे. कायद्याचा कोणताही धाक नसल्याप्रमाणे हा व्यवसाय बिनधास्तपणे सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या अवैध धंद्यामुळे गावातील तरुण पिढी व्यसनाच्या गर्तेत ओढली जात असून, त्यांच्या आयुष्याशी अक्षरशः खेळ केला जात आहे.

विशेष म्हणजे, दारूच्या नशेत काही व्यक्तींकडून गावात दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात येत असल्याचेही समोर आले आहे. महिलांना व मुलींना रस्त्यावरून चालताना अश्लील शिवीगाळ, छेडछाड व भांडणांचा सामना करावा लागत आहे. 'आमच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार?' असा थेट सवाल गावातील महिलांनी उपस्थित केला आहे.

ग्रामस्थांच्या मते, अनेक वेळा तोंडी तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने अवैध दारू विक्रेत्यांचे मनोबल अधिकच वाढले आहे. परिणामी, गावातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून, परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

महिलांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट इशारा देत सांगितले आहे की, जर तात्काळ छापेमारी करून अवैध दारू विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर गावकरी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील. 'आम्हाला शांत बसवू नका, अन्यथा आम्हीच कारवाई करू,' असा इशाराही यावेळी देण्यात आला.

तसेच, भविष्यात अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी नियमित तपासणी मोहीम राबवावी, दोषींवर कडक कारवाई करून त्यांना धडा शिकवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. गावाचे आरोग्य, तरुणांचे भविष्य आणि महिलांची सुरक्षितता धोक्यात असताना प्रशासनाने तातडीने जागे होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभाग काय भूमिका घेतो आणि मोहगव्हाणमधील अवैध दारू विक्रीवर लगाम कधी बसतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## आदिशक्ती श्री.भिला माता संस्थानला लवकरच प्रशस्त असे सभागृह उपलब्ध करून देणार – आ.सई डहाके

■ प्रतिनिधी | कारंजा ■

येथील आदिशक्ती श्री.भिला माता संस्थान कारंजाकडून सोमवार दि.३० मार्च २०२६ रोजी चैत्र नवरात्रौत्सव आणि संस्थानच्या १९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून, कारंजा नगरीच्या लोकप्रिय महिला आमदार श्रीमती सईताई डहाके यांचे हस्ते आदिशक्ती श्री.भिला मातेला शेकडो भाविकांच्या देणगीमधून,कारंजा नगरीतील विश्वकर्मा,धातुच्या सिंहासनाचे निर्माते तांबटकार - प्रदिप गुगळे यांनी त्यांच्या उत्कृष्ट कलाकुसरी मधून,तयार केलेले सोनेरी सिंहासन अर्पण करण्याचा आणि कलावंत भजनी महिला मंडळीचा आदिशक्ती पुरस्काराने भव्य सत्कार सोहळा साजरा करण्यात आला.यावेळी बोलतांना आमदार सईताई डहाके म्हणाल्या की, 'आदिशक्ती श्री भिला माता ही विश्वाची जननी,विश्वाची आदिशक्ती असून,कारंजा येथे ह्या जगदंबेचे चैत्र शुद्ध नवरात्रोत्सव आणि आश्विन शुद्ध नवरात्रोत्सव साजरे केल्या जातात. ह्या जागृत अशा भिला देवीच्या दर्शनाने सकारात्मक उर्जा मिळते.त्यामुळे येथे नवरात्रौत्सवात हजारो भाविकांची वर्दळ असते.त्यामुळे पुढेमागे लवकरात लवकरच आपल्या विकास निधीमधून,भाविकांच्या सुख सोईसाठी भव्य असे सभागृह उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन त्यांनी आपल्या संभाषणातून दिले.तसेच महिला ह्या आदिशक्ती असून भजनी मंडळींच्या महिलांना संस्थान तर्फे 'आदिशक्ती पुरस्कार' देत असल्याचा मला आनंद होत असल्याचे सुद्धा स्पष्ट केले.



याबाबत सविस्तर वृत्त असे की,कारंजा लाड येथील मंगरूळ वेशीजवळ असलेल्या,महाराणा प्रताप व्यायाम शाळेमागे भोईपूऱ्यातिल,आदिशक्ती श्री. भिला माता संस्थान कारंजा येथे,चैत्र शुद्ध नवरात्रौत्सव आणि मंदिराच्या १९ व्या वर्धापन दिना निमित्त, कार्यक्रमाचे अध्यक्ष,माजी नगराध्यक्ष संजय काकडे यांच्या अध्यक्षतेखाली,कार्यक्रमाच्या उद्घाटक कारंजा मानोरा विधानसभा मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार श्रीमती सई डहाके यांचे उपास्थितीत तसेच प्रमुख पाहूणे महाराष्ट राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष निलेशजी सोमाणी,श्री भिला माता संस्थान कारंजाचे अध्यक्ष देवमन मोरे,नगरसेविका श्रीमती कुसूम पाटील अघम,नगरसेविका चंदा भिमराव कोळकर,नगरसेविका कांचन येशूदास डेंडूळे, कंत्राटदार रविन्द्र गुल्हाने, किशोर बावणे,गजाननराव साटोटे गुरुजी,लोमेश पाटील चौधरी,ओंकार मलवळकर, रामबकस डेंडूळे आदींच्या उपस्थितीत आदिशक्ती श्री. भिला मातेला सोनेरी सिंहासन अर्पण करण्याचा आणि भजनी मंडळाच्या महिला कलावंताना आदिशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात सोहळा घेण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानराव साटोटे गुरुजी यांनी तर सुत्रसंचालन संजय कडोळे यांनी केले. श्री.भिला माता संस्थान कारंजा तर्फे भिला मातेचे भक्त तथा दिवंगत गोंधळी लोककलावंत स्व.उमेश मधुकर कडोळे स्मृतीप्रित्यर्थ, महिला भजनी कलावंताच्या सन्मानार्थ आदिशक्ती पुरस्काराचे आयोजन करण्यात आले असता,एकमेव राज्यस्तरिय आदिशक्ती पुरस्कार हा वाशिम येथील सामाजिक कार्यकर्त्या,गुरुदेव सेवा मंडळाच्या पदाधिकारी आणि महिला पत्रकार अँड भारतीदेवी निलेश सोमाणी यांना देण्यात आला.तर मंडळाचे पुरस्कार भजनी मंडळांना आणि वैयक्तीक १२५ महिलांना पुरस्कार देण्यात आले. तसेच यावेळी संस्थानतर्फे डॉ.ऋतिक गजाननराव साटोटे यांचा सन्मानचिन्ह देऊन आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.सर्व महिलांचे धार्मिक व आध्यात्मिक कार्य पाहून हे पुरस्कार विनामुल्य (नि:शुल्क) देण्यात आले.कार्यक्रमानंतर सर्व उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे रुचकर भोजन देण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन अध्यक्ष देवमनराव मोरे आणि सुत्रसंचालक संजय कडोळे यांनी केले होते तर आभार प्रदर्शन संजय मोरे यांनी केले.

## नितीन जाधव यांच्या विजयासाठी ईश्वर जाधव यांची शेगावकडे पायी यात्रा



**मालेगाव :** अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत नितीन दिलीपराव जाधव हे विजयी झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विजयासाठी माजी जि.प. अध्यक्ष दिलीपराव जाधव यांचे समर्थक ईश्वर जाधव यांनी शेगावला पायी जाऊन श्री गजानन महाराजांचे दर्शन घेण्याचा संकल्प केला होता. नितीन जाधव विजयी होताच ईश्वर जाधव यांनी दि. ३१ मार्च रोजी सकाळी ७ वाजता शेगावकडे पायी प्रस्थान केले असून, दि. २ एप्रिल रोजी ते शेगाव येथे पोहोचणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जि.प. वाशिमचे माजी अध्यक्ष दिलीपराव जाधव आणि माजी समाजकल्याण सभापती पानुताई दिलीपराव जाधव यांचे पुत्र नितीन जाधव यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत प्रथमच उमेदवारी करत विजय मिळवला. त्यामुळे जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचा दमदार प्रवेश झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.

अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मालेगाव शाखा संचालक पदासाठी झालेल्या निवडणुकीत नितीन जाधव, गोपाल पाटील राऊत आणि प्रकाश पाटील कुटे हे उमेदवार रिंगणात होते. ही निवडणूक अतिशय अटीतटीची आणि प्रतिष्ठेची मानली जात होती. तिन्ही उमेदवारांनी जोरदार प्रचार केल्याने या निवडणुकीकडे तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले होते.

## वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा तडाखा !

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

१ एप्रिल रोजी दुपारनंतर अवकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह मालेगावांत अचानक हजेरी लावल्याने पिकांना फटका बसला आहे. मालेगांव तालुक्यांत पावसाची नोंद झाली असून, वादळी वाऱ्यासह झालेल्या या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडला असून, या नुकसानाची पाहणी करून शासनाकडून मदत देण्याची शेतकऱ्यांकडून मागणी केली जात आहे.

मागील तीन दिवसांपासून मालेगाव तालुक्यात ढगाळ वातावरण तयार झाले होते. त्यानंतर बुधवारी दुपार नंतर ४ वाजतापासून पावसाला सुरुवात झाली. काही भागांत पावसाची रिपरिप सुरू होती. अचानक आलेल्या या पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळवले. या पिकांना अवकाळी पावसाचा फटका बसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यंदा आंबा पिकाला चांगली फलधारणा झाली होती; मात्र अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यामुळे आंब्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याशिवाय संत्रा, टरबूज आणि लिंबू या फळपिकांनाही फटका बसला आहे. दरम्यान, तालुक्यात बिजवाई कांद्याची लागवड यंदा साधारण प्रमाणात करण्यात आली होती. हे पीक काढणीच्या टप्प्यावर असतानाच अवकाळी पावसाचा तडाखा बसल्याने हे पीक खराब होण्याची भीती निर्माण झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



बुधवारी वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे काही पिके आडवे झाले, तर आंब्याची फळेही मोठ्या प्रमाणात गळून पडली. प्रशासनाने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी .....

### मालेगांव तालुक्यात अवकाळीची हजेरी ....

मालेगांव तालुक्यात विजांचा कडकडाट, वादळी वारा आणि अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावली. या अवकाळी पावसाचा उशिरा पेरणी केलेल्या भाजीपाला, हळद तसेच इतर हंगामी पिकांना फटका बसल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे पिके आडवी झाली.

## 'स्वस्तिक पॅटर्न' वृक्षलागवड उपक्रम जिल्ह्यात सर्वदूर राबविणार

**अकोला :** वृक्षक्रांती मिशनतर्फे 'स्वस्तिक पॅटर्न'मध्ये संपूर्ण जिल्ह्यात वृक्षलागवडीचा प्रस्ताव असून, त्यांना सर्व यंत्रणांनी सहकार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व यंत्रणांना दिले आहेत.

मिशनचे संस्थापक ए. एस. नाथन यांच्यातर्फे 'स्वस्तिक पॅटर्न'मध्ये वृक्षलागवडीचा उपक्रम अनेक वर्षांपासून राज्यात ठिकठिकाणी राबविण्यात येत आहे. अकोला जिल्ह्यातील ६० शासकीय कार्यालये व जागांमध्ये या उपक्रमात वृक्षलागवड झाली. यंदाही हा उपक्रम राबविण्याची इच्छा असून, जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालये, ई-क्लास जमीनीवर, तसेच एमआयडीसीच्या खुल्या जागांवर स्वस्तिक वृक्षलागवडीसाठी नि:स्वार्थ सेवा देण्याची तयारी आहे, असे श्री. नाथन यांनी प्रस्तावात नमूद केले आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील वृक्षलागवडीला चालना मिळण्यासाठी कार्यालयातील जागा, पाण्याची व्यवस्था, रोपे, कुंपण, यंत्रसामग्री आदी बाबींसाठी यंत्रणांनी मिशनला सहकार्य करावे.

## भीमा तुझ्या जन्मामुळेच लाभले 'आचार्य' पद
## प्रा. डॉ. प्रशांत शिरसाट यांचे यश

■ प्रतिनिधी | कारंजा ■

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे,' हा क्रांतिकारी संदेश देत वंचित समाजाला ज्ञानाचे दार खुले करून देणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे आज सर्वसामान्य घटक प्रगतीच्या उंच शिखरावर पोहोचत आहेत. याच विचारांची प्रेरणा घेत कारंजा लाड येथील प्रा. डॉ. प्रशांत शामराव शिरसाट यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात 'आचार्य' (Ph.D.) पदवी संपादन करून उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. आपले हे सर्वोच्च शैक्षणिक यश त्यांनी कृतज्ञतापूर्वक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी अर्पण केले आहे.



प्रा. डॉ. शिरसाट हे स्थानिक शिक्षक कॉलनीचे रहिवासी असून अकोला येथील श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल (एल.आर.टी.) वाणिज्य महाविद्यालयात ग्रंथालय विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी 'महाराष्ट्र राज्यातील नॅक प्रक्रियेत महाविद्यालयीन ग्रंथपालाची भूमिका : नवीन नॅक चौकटीच्या विशेष संदर्भासह एक अभ्यास' या विषयावर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आपला शोधप्रबंध सादर केला होता. दिनांक २३ मार्च २०२६ रोजी विद्यापीठाने त्यांच्या संशोधनाला अधिकृत मान्यता दिली. त्यांनी हे संशोधन कार्य प्राचार्य डॉ. के. ओ. मांडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

'डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक क्रांतीचे फळ' आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. प्रशांत शिरसाट म्हणाले, 'माझ्या आयुष्यातील 'आचार्य' ही सर्वोच्च पदवी प्राप्त करताना माझे मस्तक ज्या महामानवाच्या चरणी झुकते, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. भीमा, तुझ्या जन्मामुळेच आम्हा सामान्यांना ज्ञानाची कवाडे खुली झाली. तुमच्या विचारांमुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकलो.

## शिक्षकांचा मतदानाचा अधिकार हिरावू देणार नाही -किरण चौधरी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शिक्षक मतदार संघाच्या नोंदणी प्रक्रियेत सर्व तांत्रिक निकषांची पूर्तता करूनही काही व्यक्तींनी घेतलेले आक्षेप अनाठायी असून, पात्र माध्यमिक शिक्षकांचा मतदानाचा अधिकार कुठल्याही परिस्थितीत हिरावू दिला जाणार नाही, अशी ठाम भूमिका मेस्टा (श्एंऊँ) संघटनेचे अमरावती विभाग कार्याध्यक्ष किरण चौधरी यांनी मांडली.

निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार अनुभवाची अट व शाळेच्या शासनमान्यतेसह सर्व बाबींची पडताळणी करूनच अंतिम शिक्षक मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे पात्र शिक्षकांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात मेस्टा संघटनेच्या वतीने मा. विभागीय आयुक्त तथा शिक्षक मतदार नोंदणी अधिकारी, अमरावती विभाग तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांना निवेदन देऊन संघटनेची भूमिका स्पष्ट करण्यात आली.

शिक्षक मतदार नोंदणीसाठी पात्रतेच्या तारखेपूर्वीच्या सहा वर्षांत किमान तीन वर्षांचा अध्यापन अनुभव व संबंधित शाळा शासनमान्य असणे आवश्यक असते. या सर्व निकषांची पूर्तता झाल्यानंतरच अंतिम यादी जाहीर करण्यात आली असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

तरीही काही घटकांनी अंतिम यादीवर आक्षेप घेतल्याने गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप मेस्टा संघटनेने केला आहे.

## सागा सुपर अबॅकस अकॅडमीच्या ९ विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

■ प्रतिनिधी | कारंजा ■

संभाजीनगर येथे पार पडलेल्या ऑनलाइन नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये कारंजा लाड येथील सागा सुपर अबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शहराचे नाव उज्ज्वल केले.

दि. २९ मार्च २०२६ रोजी कै. भानुदासराव चव्हाण स्मृती सभागृहात दुपारी ४ वाजता आयोजित 'सुपर अबॅकस नॅशनल कॉम्पिटिशन अवॉर्ड फंक्शन'मध्ये या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या स्पर्धेत एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सौ. अश्विनी राहुल शेगोकार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय पातळीवर यशाचा झेंडा फडकावला. यामध्ये उदंतिका वैभव गावंडे (लेव्हल १) हिने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच शिवाय संतोष नेमाने (द्वितीय), अनय अतुलकुमार महल्ले (चतुर्थ), उत्कर्ष नंदापुरे (चतुर्थ) आणि निर्वाण नितीन इंगोले (पंचम) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले.



विशेष श्रेणीमध्ये स्पृहा आतिष चौधरी, रियांशा स्वप्निल इंगोले, निहित विजय पोहाने आणि श्रीरंग अभिषेक वानखडे यांचा गौरव करण्यात आला.

तसेच चैतन्य घुले, श्रावी शेगोकार, स्वरा हिवाळे, बुद्धांग भुसारे, ईशान शेगोकार आणि ओजस्वी निंगोट यांना कॉंग्रॅच्युलेशन ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

## गुरुकुल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय संस्कृत स्पर्धेत यशस्वी कामगिरी



■ प्रतिनिधी | कारंजा ■

येथील गुरुकुल विद्यालय कोळीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित राज्यस्तरीय संस्कृत स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक (नागपूर) विस्तार सेवा मंडळ व ज्ञानवर्धिनी संस्कृत शिकवणी वर्ग, कारंजा लाड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ फेब्रुवारी रोजी ही परीक्षा घेण्यात आली.

या स्पर्धेत वर्ग नववीतील नूतन सोनेकर हिने राज्यस्तरावर तृतीय, तर किमया वाघमारे हिने चतुर्थ क्रमांक पटकावला. श्रुती डोके हिने जिल्हास्तरावर प्रथम, तर खुशी बेलखेडे व महल्ले हिने तृतीय क्रमांक मिळवला.

वर्ग सातवीतील श्रावणी डोके हिने जिल्हास्तरावर तृतीय, तर जानवी सावध हिने शालेय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. वर्ग सहावीतील सायली राठोड हिने जिल्हास्तरावर प्रथम, तर श्रेया फुफरे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच वर्ग दहावीतील स्वरित जवके याने शालेय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला.

## गौतम नगर आणि महात्मा फुले नगरच्या समस्यांबाबत 'ब्लू पँथर' आक्रमक

### नगराध्यक्षांना दिले निवेदन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील गौतम नगर आणि महात्मा फुले नगर परिसरातील प्रलंबित नागरी समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'ब्लू पँथर' संघटनेच्या वतीने नगराध्यक्षांच्या नावे मा. हाजी मोहम्मद युसुफ सेठ पुंजानी यांना नुकतेच निवेदन देण्यात आले. या भागातील रस्त्यांचे पुनर्रबांधकाम, पथदिवे आणि नाल्यांच्या दुरुस्तीबाबत तातडीने पावले उचलण्याची मागणी यावेळी करण्यात आली.



**प्रमुख मागण्या आणि समस्या :**

**निवेदनाद्वारे कार्यकर्त्यांनी परिसरातील गंभीर समस्यांचा पाढा वाचला. यात मुख्यत्वे:**

रस्त्यांची दुरवस्था: गौतम नगर ते नागवाणी शाळा मार्गे सिंधी कॅम्पकडे जाणाऱ्या रस्त्याची चाळण झाली असून, येथे तात्काळ 'री-कॉंक्रीटिंग' करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**पथदिव्यांचा अभाव:** रात्रीच्या वेळी होणारे अपघात टाळण्यासाठी या मार्गावर नवीन पथदिवे लावण्याची गरज व्यक्त केली.

**आरोग्याचा प्रश्न:** पंचायत समितीपासून महात्मा फुले नगरकडे वाहणारा नाला तुंबल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून, या नाल्याचे पुनर्रबांधकाम करण्याची मागणी लावून धरली आहे.

**युवकांसाठी व्यायामशाळा :** गौतम नगरमधील खुल्या जागेत युवकांसाठी अद्ययावत व्यायामशाळा उभारण्याचा प्रस्ताव नगर परिषदेच्या सभेत मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली.

'नागरिक नियमित कर भरूनही त्यांना नरकयातना भोगाव्या लागत आहेत. जर प्रशासनाने या जनहितार्थ मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर आम्हाला तीव्र जनआंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल.'

**प्रशासकीय आश्वासन :** निवेदन स्वीकारल्यानंतर मा. हाजी मोहम्मद युसुफ सेठ पुंजानी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. 'या सर्व मागण्या रास्त असून, नगराध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक बाबी तपासून ही सर्व कामे लवकरात लवकर मार्गी लावू,' असा शब्द त्यांनी शिष्टमंडळाला दिला.

**उपस्थिती :** यावेळी 'ब्लू पँथर'चे अध्यक्ष अॅड. निलेश खंडारे, उपाध्यक्ष अॅड. पंकज सावळे, सचिव सुरज गणराज, मीडिया प्रभारी महादेव तायडे संघटक रंगराव गोपनारायण यांच्यासह रॉबिन आठवले, बाळासाहेब ठोबरे, अंकुश ठोबरे, प्रदीप हरियर, भुपेंद्र हरियर, मिथुन खरात, गोपाल ढवळे व संघटनेचे इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२५ ■ गुरुवार, २ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# नशामुक्त समाजासाठी अमली पदार्थ विरोधी अभियानात सहभागी व्हा - एसपी सौरभ अग्रवाल

## -अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियानाचा शुभारंभ -नशामुक्त चित्रफितीचे लोकार्पण





**वर्धा जनमाध्यम :** अमली पदार्थाच्या सेवनामुळे शारीरिक, मानसिक दुष्परीणाम होतात. सोबतच यातून गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होते. त्यामुळे नशामुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी समजून अमली पदार्थ विरोधी अभियानात सहभाग नोंदवावा तसेच इतरांना व्यसनापासुन दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी केले.

अग्निहोत्री कॉलेज परिसरातील शिवशंकर सभागृह येथे अमली पदार्थ जनजागृती अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला जय महाकाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पंडित शंकरप्रसाद अग्निहोत्री, मराठी नाट्य दिग्दर्शक हरीष इथापे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, आर्वीचे उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले, पुलगावच्या उपविभागीय पोलिस अधिकारी वंदना कारखेले आदी उपस्थित होते.

अमली पदार्थाच्या आहारी जाऊन शरीराची हाणी करु नये. आपल्याला व समाजाला व्यसनापासून दूर राहण्यासाठी आपण व इतरांना यापासून परावृत्त करावे. अमली पदार्थाचे सेवन करणारे, विक्री करणारे, वाहतुक करणारे, अमल पदार्थ बाळगत असणाऱ्यांची माहिती पोलिस विभागाला द्यावी, असे आवाहनही सौरभकुमार अग्रवाल यांनी केले. अमली पदार्थ विरोधी अभियान व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे पुनर्वसन करुन समाजात चांगला व्यक्ती म्हणुन जगण्याचा अधिकार देणारे अभियान आहे, असेही पुढे बोलतांना सौरभकुमार अग्रवाल म्हणाले.

यावेळी मानसिक रोगतज्ञ डॉ. स्वप्नील अलोने यांनी अंमल पदार्थापासुन शरीरावर होणार दुष्परिणाम व मानसिक आरोग्य परिणामाची माहिती दिली. व्यसन हे समस्येचे निराकरण नसून क्षणिक आनंदासाठी कायस्वरुपी आयुष्य उध्वस्त करण्याचे साधन आहे. त्यामुळे व्यक्तींनी व्यसनापासुन दूर राहावे असे आवाहन केले.

गेले २६ वर्ष व्यवसनाच्या आधीन जाऊन आता व्यसनमुक्त झालेले अशोक कारेमोरे यांनी आपले अनुभव कथन करुन व्यसनापासुन कशा प्रकारे आयुष्याचे नुकसान होते याबाबत तसेच इंदिरा गांधी व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालक सारीका देशपांडे यांनी सुध्दा व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी सर्व मान्यवर व उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

यावेळी वंदना कारखेले यांनी पीपीटीद्वारे अमली पदार्थ कायदा, कायद्यातील शिक्षेची तरतूद, व्यसनाधीन लोकांचे पुनर्वसन याबाबत माहिती दिली. तत्पूवी नशामुक्त चित्रफितीचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच चित्रफित तयार करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार अतिरिक्त पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांनी मानले.कार्यक्रमाला अग्निहोत्री कॉलेजचे विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरालगतच्या गावांना घंटागाड्यांचे वाटप; स्वच्छतेचा प्रश्न सुटणार

## पालकमंत्र्यांच्या हस्ते घंटागाड्यांचे वितरण; ग्रामपंचायतींना दिलासा

**-वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर उपाय; १५ गावांना घंटागाड्या**



**वर्धा जनमाध्यम :** शहरालगतच्या ग्रामपंचायतींमध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या कचरा व्यवस्थापनाच्या समस्येवर उपाय म्हणून १५ ग्रामपंचायतींना घंटागाड्यांचे वितरण करण्यात आले. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते जिल्हा परिषद येथे हा कार्यक्रम पार पडला.

जिल्हा परिषदेच्या जनसुविधा निधीतून या घंटागाड्या खरेदी करण्यात आल्या आहेत. शहरालगतच्या गावांमध्ये गेल्या काही वर्षांत लोकसंख्या झपाट्याने वाढली असून कचरा संकलनाचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मात्र, आवश्यक वाहनांची कमतरता असल्याने नियमित कचरा उचलण्यात अडथळे निर्माण होत होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले की, या घंटागाड्यांमुळे कचरा संकलनाची व्यवस्था अधिक सक्षम होणार असून ग्रामपंचायतींच्या स्वच्छतेला चालना मिळेल. तसेच नागरिकांनाही स्वच्छतेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले तसेच विविध ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिपरी मेघे, उमरी मेघे, नालवाडी, बोरगाव मेघे, सावंगी मेघे, पवनार, साटोडा, केळझर आदी ग्रामपंचायतींना या घंटागाड्यांचे वितरण करण्यात आले.

# पाणीटंचाईवर आळा घालण्यासाठी प्रशासन सज्ज

## १७८ कामांना मंजुरी; ७५७ गावांसाठी कृती आराखडा

**वर्धा जनमाध्यम :** आगामी उन्हाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नियोजनबद्ध पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या १७८ कामांना मंजुरी देण्यात आली असून, उर्वरित प्रस्तावही लवकरच मंजूर होण्याची शक्यता आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याचा प्रश्न तीव्र होत असल्याने यंदा प्रशासनाने पूर्वतयारीवर भर दिला आहे. जिल्ह्यातील ७५७ गावांमध्ये पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन दोन टप्प्यांत कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यानुसार गरजेनुसार उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

यामध्ये नळ योजना दुरुस्ती, नवीन कुपनलिका उभारणी, सार्वजनिक विहिरींचे खोलीकरण तसेच खाजगी विहिरींचे अधिग्रहण यांचा समावेश आहे. सध्या नळ योजना सुरळीत राहाव्यात यासाठी दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे.

दरम्यान, मंजूर झालेल्या कामांसाठी निविदा प्रक्रिया लवकर पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना सुरुवात केली जाणार आहे. पंचायत समिती स्तरावरही प्रस्तावांना गती देण्यात येत असून, आवश्यक त्या ठिकाणी तातडीने उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ही कामे वेळेत पूर्ण झाल्यास उन्हाळ्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या या नियोजनामुळे नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

#### व्यावसायिक सिलेंडर बंद... जनतेला रांगेत उभं केलं

# दोन दिवसांत गर्दी कमी करायची असेल तर तात्काळ पुरवठा सुरू करा



**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरात गॅस सिलेंडरच्या टंचाईने नागरिकांचे हाल अक्षरशः वाढले असून एजन्सीसमोर दररोज रांगाच रांग दिसत आहे. सकाळपासूनच नागरिक सिलेंडरसाठी तासन्तास प्रतीक्षा करत उभे राहत आहेत. महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण या समस्येमुळे त्रस्त झाले आहेत.

या वाढत्या गर्दीमागे मुख्य कारण म्हणजे व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद असल्याचे स्पष्ट होत आहे. हॉटेल, ढाबे आणि इतर व्यावसायिकांना सिलेंडर मिळत नसल्याने त्यांनी घरगुती गॅसवर तुटून पडण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसाठी असलेला गॅसच कमी पडत असून कृत्रिम टंचाई निर्माण होत आहे.

याचदरम्यान काही ठिकाणी गैरप्रकारही वाढल्याचे समोर येत आहे. काही जण घरगुती सिलेंडर घेऊन तेच जास्त दराने व्यावसायिकांना विकत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे परिस्थिती आणखी बिघडत असून सामान्य नागरिकांना अधिक फटका बसत आहे. नागरिकांचे म्हणणे स्पष्ट आहे की, व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा तात्काळ सुरू केल्यास ही गर्दी दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. मात्र प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप होत आहे.

सध्या एजन्सीसमोरील वाढती गर्दी, नागरिकांचा संताप आणि गॅसचा तुटवडा यामुळे परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास हा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मंदिरावर झेंडा चढविताना करंट लागून मृत्यू

## महादेवपूरा येथे दुर्दैवी घटना; हनुमान जयंतीपूर्वी शोककळा

**वर्धा जनमाध्यम :** हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या तयारीदरम्यान महादेवपूरा येथील प्राचीन श्री हनुमान मंदिरात करंट लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी, १ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ४.४५ वाजता घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अनिल सुरेश परियाल (वय ४५) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते मंदिरातील तयारीत सक्रिय सहभागी होते. मंदिरावर भगवा झेंडा चढवित असताना त्यांचा तोल जाऊन ते शेजारील वीज खांबावर पडले. यावेळी जिवंत विद्युत तारांचा स्पर्श झाल्याने त्यांना करंट लागून त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. लाकडाच्या साहाय्याने त्यांना तारांपासून दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला. माजी नगरसेवक शेख नौशाद, इमरान कैसर, बबलू खान, साजिद माजान, सानू खान,



इमरान इम्मू यांच्यासह इतरांनी मदतकार्य केले. दरम्यान, शहर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. हनुमान जयंतीच्या पूर्वसंध्येला घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

# सायकल घसरून पडल्याने वृद्धाचा मृत्यू

**वर्धा जनमाध्यम :** सायकलवरून जात असताना अचानक तोल जाऊन पडल्याने एका वृद्धाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सेवाग्राम येथील चरखागृह परिसरात घडली. किशोर वाघमारे (वय ७२, रा. आदर्शनगर) असे मृताचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वाघमारे हे रोजच्या प्रमाणे सायकलवरून आपल्या कामासाठी निघाले होते. चरखागृह परिसरातील सिमेंट रस्त्यावरून जात असताना अचानक सायकल घसरली आणि ते जोरात खाली पडले.



या अपघातात त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली.

घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने मदत करण्याचा प्रयत्न केला. त्यांना उपचारासाठी हलविण्याची धडपड सुरू असतानाच त्यांची प्रकृती अधिकच खालावली.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# सम्यक बुद्ध विहारात नामदेवराव ढाले स्मृती किचन शेडचे उद्घाटन



**वर्धा :-** धम्म चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते स्मृतीशेष नामदेवराव ढाले यांच्या स्मृती प्रित्यर्थ सम्यक बुद्धविहार सांस्कृतिक भवन प्रबुद्ध नगर मसाळ्याला अनिल ढाले व ढाले परिवाराच्या वतीने किचन शेड बनवून देण्यात आले. दिनांक १ एप्रिल ला सम्यक बुद्ध विहार सांस्कृतिक सभागृह समितीच्या उपाध्यक्ष जिजाबाई राऊत यांच्या हस्ते किचन शेडचे उद्घाटन करण्यात आले. अतिथी म्हणून अनिल ढाले (मुंबई ) डॉ जागृती ढाले, सुनील ढाले, हरीका ढाले, भैय्या ढाले, सुनंदा ढाले, इंदुमती कांबळे,मोरेश्वर कांबळे , सिंधुताई वनकर, तातोबाजी येसनकर, लताताई येसनकर, दिवाकरराव मुन, सुनिता मुन,डॉ दिलीप दबडे,नम्रता दबडे, पुष्पाताई फुलझेले, कान्होपात्रा वैद्य,मंदा कांबळे, प्रेमलता रिंगणे, स्नेहलता कांबळे, शोभा बोरकर, हंसराज बोरकर, एड. नरेंद्र पाटील,करुणा शंभरकर,विद्या नाईक, रवी निखाते,सागर थूल, सुहानी ढाले, मनोज राऊत, मनोहर गोसावी इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन सुनील ढाले यांनी तर आभार अनिल ढाले यांनी मानले.

#### सत्तेच्या खुर्चीवर नाही... जनतेच्या मनावर राज्य

# अमर काळेंची माणुसकी झळकली; एका भेटीत जिंकली हजारो हृदये

**हिंगणघाट ।** वर्धा जनमाध्यम : राजकारणात घोषणांचा गजर, भाषणांची आतषबाजी आणि जनतेपासून दुरावलेले नेते, हे चित्र सर्वत्र दिसत असताना अमर शरदराव काळे यांनी मात्र या सगळ्याला छेद देत माणुसकीचे जिवंत उदाहरण घालून दिले. हिंगणघाट येथील एका साध्या कार्यक्रमात घडलेला प्रसंग आज जनतेच्या तोंडा तोंडात फिरत आहे.

कार्यक्रम संपला, टाळ्यांचा कडकडाट थांबला, पाहुण्यांची भाषणं झाली, आणि नेहमीप्रमाणे नेतेमंडळी निघून जातील अशी सर्वांची अपेक्षा. पण इथे घडले वेगळंच व्यासपीठावरून थेट खाली उतरून खा,अमर काळे जनतेत मिसळले. कुठलाही दिखावा नाही, कुठलीही दिमाखदार सुरक्षा नाही, फक्त माणसांशी माणूस म्हणून संवाद

गर्दीत प्रत्येकाशी हस्तांदोलन, गप्पा, विचारपूस सुरू असतानाच एका वृद्धाकडे त्यांची नजर खिळली. हातात मळकट थैला, अंगावर साधे कपडे, पण चेहऱ्यावर स्वाभिमान आणि डोळ्यांत अपेक्षा. कोणी तरी माझ्याकडे पाहील का? हा निःशब्द प्रश्न. क्षणाचाही विलंब न लावता खा, काळे त्या वृद्धाकडे गेले. हा प्रसंग पाहून उपस्थित नागरिक थबकलेच एक खासदार स्वतः



पुढे येऊन एका सामान्य माणसाची विचारपूस करत आहे, हे दृश्यच वेगळे होते. त्या वृद्धाच्या डोळ्यांत पाणी आले. थरथरत्या हातांनी त्यांनी एक कागद खासदारांच्या हातात दिला. काही सांगायचं होतं, पण शब्द फुटत नव्हते. अखेर भावनांचा बांध फुटला माझं काम होईल की नाही माहीत नाहीष्ठ पण तुम्ही ज्या आपुलकीने भेटलात, त्यातच मला सगळंच मिळाले हा संवाद ऐकून परिसरातील वातावरण भारावून गेले. राजकारणात हरवलेली माणुसकी त्या क्षणी जिवंत झाल्याचे प्रत्येकाने अनुभवले. त्या वृद्धाने पुढे सांगितले, स्व. डॉ. शरदराव काळे यांच्याबद्दल खूप ऐकले होते, आज त्यांचेच संस्कार अमर काळे यांच्यात पाहिले. असा नेता आयुष्यात पहिल्यांदाच पाहतोय.

आजच्या सत्ताकेंद्रित राजकारणात जिथे नेते जनतेपासून दूर जात आहेत, तिथे अमर काळे मात्र जनतेच्या मनात घर करत आहेत. त्यांचं नेतृत्व हे फक्त पदापुरतं मर्यादित नसून ते थेट लोकांच्या भावनांशी जोडलेले आहे. हा प्रसंग केवळ एक भेट नव्हती, ती होती विश्वासाची ठिणगी, आपुलकीची ऊब आणि खऱ्या नेतृत्वाची साक्ष, जनतेच्या डोळ्यांत अश्रू होते, पण मन मात्र समाधानी होते, कारण असा खासदार प्रत्येकाच्या नशिबात नसतो.

# उकळते पाणी अंगावर पडून व्यक्तीचा मृत्यू

**वर्धा जनमाध्यम :** मद्यधुंद अवस्थेत अंघोळीसाठी नेत असलेले उकळते पाणी अंगावर पडल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना नालवाडी येथे घडली. राजू अंबूलकर (वय ५२) असे मृताचे नाव आहे.

माहितीनुसार, अंबूलकर हे मद्यप्राशन करून घरी आले होते. त्यानंतर अंघोळीसाठी त्यांनी गंजभर उकळते पाणी घेतले. मात्र, मद्याच्या नशेत असताना त्यांचा तोल गेला आणि गरम पाण्याचा गंज थेट त्यांच्या अंगावर सांडला. या प्रकारात ते गंभीर भाजले गेले. कुटुंबीयांनी व स्थानिकांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान त्यांची प्रकृती गंभीर होत गेली आणि अखेर त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून मद्यप्राशनामुळे होणाऱ्या अपघातांविषयी चिंता व्यक्त केली जात आहे.

# क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित करण्याचे निर्देश : मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त राज्यात विचारांचा महापूर आणण्याची तयारी सुरू झाली आहे. ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ या कालावधीत वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत हा मोठा निर्णय घेण्यात आला.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, फुले यांच्या कार्याचा प्रभाव पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक विभागाने किमान २ ते ३ ठोस कार्यक्रम राबवावेत आणि त्याचे नियोजन १५ एप्रिलपर्यंत सादर करावे, असे आदेश देण्यात आले.

**खानवडीपासूनच होणार भव्य सुरुवात**

फुले यांचे मूळ गाव खानवडी येथे नव्याने उभारलेल्या आधुनिक सुविधांनी सुसज्ज जिल्हा परिषद शाळेच्या लोकार्पणाने ११ एप्रिलला या वर्षाची धडाकेबाज सुरुवात



होणार आहे. ही शाळा सीबीएसई पद्धतीवर आधारित असल्याने ग्रामीण भागासाठी नवा आदर्श ठरणार आहे.

**फुले साहित्याचा जागतिक विस्तार**

फुले यांच्या साहित्याचा बहुभाषिक अनुवाद करण्यावरही भर देण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार देश-विदेशात अधिक प्रभावीपणे होणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या कार्यक्रमांमध्ये खासगी शाळांनाही सहभागी करून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

**मंत्रीमंडळाची 'टीम ॲक्शन' मोडमध्ये**

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री उपस्थित होते. सर्व विभागांनी आपापले नियोजन सादर करत कार्यक्रमांची रूपरेषा स्पष्ट केली.

# पाणीपट्टी वसुलीत उर्ध्व वर्धा प्रकल्प अव्वल

**अमरावती/प्रतिनिधीः-** पश्चिम विदर्भातील उर्ध्व वर्धा प्रकल्प सर्वात मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची निर्मिती सिंचन क्षमता ही ८५,००२ हेक्टर, तर जलासाठा ५६४.०५ दलघमी आहे. या प्रकल्पातून अमरावती व वर्धा तालुक्यामध्ये कालव्याद्वारे सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते. या प्रकल्पाने पाणीपट्टी वसुलीत अव्वल स्थान पटकाविले आहे.

सन २०२५-२६ या वर्षा करीता सिंचनासाठी २.१६४ कोटी रुपये वसुली करण्याचे उद्दिष्ट विभागाला देण्यात आले होते. सन २०१६ मध्ये उर्ध्व वर्धा प्रकल्प विभागाचे रुपांतरण सिंचन पाटबंधारे विभागामध्ये करण्यात आले. कामाचे नियोजन व सातत्याने करण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे थकित लाभधारकांना पाणीपट्टी भरण्यासाठी केलेल्या आवाहनामुळे या विभागाने सुमारे ०.७६ कोटी रुपये वसुली केली आहे.

# आसाममध्ये भाजप विजयाची हॅट्रिक करणार- पंतप्रधान

## गोगामुखच्या निवडणूक प्रचार सभेत केला दावा

**गुवाहटी/वृत्तसंस्था :** आसाममध्ये गेल्या १० वर्षा भाजपने चांगली विकास कामे केली आहेत. भाजपच्या कार्यकाळात राज्य प्रगतीपथावर आहे. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजप विजयाची हॅट्रिक करेल असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. राज्यातील गोगामुख येथे आज, बुधवारी निवडणूक प्रचार सभेला संबोधित करताना ते बोलत होते.

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, मागील दशकात भाजप सरकारने आसाममध्ये सेवा आणि सुशासन यांचा नवा अध्याय सुरू केला आहे. या काळात २२ लाखांहून अधिक गरीब कुटुंबांना पक्की घरे देण्यात आली आहेत. तसेच, समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आणि आदिवासींच्या हक्कांचे संरक्षण करण्यावर भर दिला. सुबनसिरी



जलविद्युत प्रकल्पामुळे राज्यातील पूरस्थितीवर नियंत्रण मिळवता येईल, असेही त्यांनी सांगितले. आसाममध्ये आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्याची क्षमता फक्त भाजप-नेतृत्वाखालील एनडीएकडे आहे. निवडणुकीनंतरची ही त्यांची पहिली सभा असून, मोठ्या प्रमाणात जमलेल्या जनसमुदायावरून भाजपच्या विजयाची खात्री असल्याचे त्यांनी नमूद केले. जनतेच्या आशीर्वादामुळे त्यांना पंतप्रधान म्हणून तिस-यांदा संधी मिळाली आहे. तसेच आसाममध्ये देखील घडेल. इथे देखील भाजप सरकार तिस-यांदा सत्तेत येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पूर्वी सर्वानंद सोनवाल आणि सध्या हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली असममध्ये विकास आणि सुशासनाचा नवा काळ सुरू झाला आहे. पूर्वी काँग्रेस अनेक वर्षे सत्तेत होती. परंतु, त्यांनी आसामच्या विकासाकडे दुर्लक्ष केले. ब्रह्मपुत्र नदीवर कमी पूल बांधले गेले, तसेच समाजात विभागणी निर्माण केली, असा आरोप मोदींनी केला. काँग्रेसवर कम्युनल व्हायोलन्स कायद्याच्या माध्यमातून मतपेटीचे राजकारण केल्याचा आरोप त्यांनी केला. हा कायदा बहुसंख्यांकांवर अन्याय करणारा होता, असे मोदी म्हणाले. आसामला नैसर्गिक संसाधनांची मोठी देणगी मिळाली आहे आणि आता राज्याला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही मोठे स्थान मिळणार आहे. लवकरच असममध्ये सेमीकंडक्टर प्लांट सुरू होईल, ज्यामुळे राज्य आधुनिक तंत्रज्ञानाचे केंद्र बनेल असा विश्वास व्यक्त केला. तसेच विकसित असम ते विकसित भारत हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी भाजपला निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एसटीच्या NCMC स्मार्ट कार्डचे लोकार्पण



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने विविध सामाजिक घटकांसाठी प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाउल उचलण्यात आले आहे. 'RuPay On-The-Go', NCMC सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आज करण्यात आले.

यावेळी अमृतमहोत्सवी ज्येष्ठ नागरिक श्री. रमेश ढावरे, तसेच सवलतधारक महिला संगिता पालकर व वर्षा कांबळे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या हस्ते NCMC स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्यासह सर्व कॅबिनेट मंत्री व एसटी महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला तसेच विविध सवलतधारक प्रवाशांना आधार क्रमांकाशी संलग्न NCMC स्मार्ट कार्ड वितरित करण्यात येणार आहे. या कार्डच्या माध्यमातून प्रवाशांना एसटी बस प्रवासातील सवलतींचा लाभ अधिक सुलभतेने मिळणार असून, प्रवास व्यवस्थापन अधिक डिजिटल व पारदर्शक होणार आहे.

सदर योजनेची अंमलबजावणी M/s. E-Infochips Technologies Ltd. आणि NSDL Payments Bank यांच्या संयुक्तविद्यमाने करण्यात येत असून, राज्यातील सर्व आगार व बसस्थानकांवर नोंदणी व वितरण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. याशिवाय, सुमारे ३ हजार अधिकृत केंद्रांवर नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.या स्मार्ट कार्डद्वारे प्रवाशांना वालेट टाप-अपची सुविधा उपलब्ध राहणार असून, किमान १०० पासून टाप-अप करता येणार आहे. कार्डधारकांना बसमधील ईटीआयएम मशीन, संकेतस्थळ, मोबाईल अप तसेच अधिकृत एजंटमार्फत टाप-अप करता येईल. नवीन NCMC कार्डची किंमत १९९ इतकी निश्चित करण्यात आली आहे.यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्याच्या एसटीसारख्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत डिजिटल क्रांती घडवून आणण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे प्रवाशांना सुलभ, सुरक्षित व पारदर्शक सेवा मिळेल आणि एसटी महामंडळाच्या कामकाजातही अधिक कार्यक्षमतेने सुधारणा होईल. या उपक्रमामुळे राज्यातील लाखो सवलतधारक प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, एसटीच्या सेवांचा वापर अधिक सोयीस्कर व आधुनिक पद्धतीने करता येईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

# मोबाईल नेटवर्कप्रमाणे बँक खात्याची पोर्टेबिलिटी करता येणार

## आरबीआयची मोठी तयारी लवकरच होणार अंमलबजावणी

**नवी दिल्ली //वृत्तसंस्था :** पेमेंट्स व्हिजन २०२८ अंतर्गत केंद्रीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) ग्राहकांना दर्जेदार बँकिंग सेवा मिळाव्यात यासाठी खास प्लॅन आखला आहे. आता ज्या बँका चांगली सेवा देणार नाहीत आणि सेवांच्या नावाखाली केवळ ग्राहकांकडून पैसे उकळतील, त्यांना धडा बसणार आहे. ग्राहकांना जर एखाद्या बँकेची सेवा आवडली नाही, तर तो ग्राहक दुस-या बँकेत खाते हस्तांतरीत करू शकणार आहे. त्याचा खाते क्रमांक बदलणार नाही. खाते क्रमांक जुनाच राहिल. बँकेचे नाव बदलेल. बँकेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि ग्राहकांची फसवणूक आणि पिळवणूक टाळण्यासाठी या सुधारणा करण्यात येणार आहे.आरबीआयने पेमेंट्स स्विचिंग सर्विस या नावाने एक प्रणाली विकसीत केली



आहे. ही प्रणाली एका प्लॅटफार्मप्रमाणे काम करेल. याठिकाणी ग्राहकांना त्यांच्या सर्व बँका एकाच ठिकाणी दिसतील. तर या ठिकाणी ते त्यांचे बँक खाते स्विच करू शकतील. ग्राहकांना बँक अकाउंट पोर्टेबिलिटी करता येईल. मोबाईल कंपनी जशी सध्या बदलता येत आहे, तसेच बँक बदलता येईल. बँक बदलानंतर त्याच्या खात्यावर कोणताही परिणाम होणार नाही. बँक खाते क्रमांक तोच असेल. त्याचे आर्थिक व्यवहार तसेच असतील. त्याच्या खात्यातील रक्कम तशीच असेल. खाते बदलताना त्याच्यावर कोणताही दंड अथवा इतर शुल्क आकारण्यात येणार नाहीत. अर्थात बँक खाते बदलले तरी संबंधित बँकेकडून कर्ज घेतले असेल अथवा इतर थकबाकी असेल तर तो व्यवहार पूर्ण करावा लागेल. अथवा परतफेडीची हमी द्यावी लागेल.तर दुसरीकडे आता परदेशी पैसा पाठवण्यासंबंधीचे जटिल नियम आणि जटिल प्रक्रिया पूर्णपणे दूर करण्यात येणार आहे. आता सीमे पार सहज आणि सोप्या रित्या पैशांची देवाण-घेवाण करता येईल. तर सेंट्रल बँक डिजिटल करन्सी सीबीडीसीच्या विस्ताराने पण परदेशात पैसा पाठवणे सोपे होईल.धनादेश प्रकरणातही मोठा बदल होणार आहे. आता ई-चेकचा पर्याय समोर येत आहे. सुरक्षा मानके आणि डिझाइन यावर काम सुरू आहे. लवकरच ग्राहकांना बँका ई-धनादेश देतील. त्यामुळे चेक बुकसाठी वाट पाहावी लागणार नाही. इलेक्ट्रिक धनादेशासाठी सुरक्षित प्रणाली विकसीत करण्यावर भर देण्यात येत आहे. त्यामुळे बँकांची, ग्राहकांची फसवणूक होणार नाही. व्यवहारही झटपट होतील आणि चेक बुकवरील खर्चही वाचेल.

# भंडा-यात पाण्यात बुडून दोन चिमुकल्यांचा मृत्यू

**भंडारा/प्रतिनिधी :** तुमसर तालुक्यातील रोंघा या गावांमध्ये ३१ मार्चपासून दोन मुलं बेपत्ता झाली होती. त्यांची रात्रभर शोधाशोध केल्या असता कुठेच ते सापडलेले नाही परंतु सकाळी एका छोट्याश्या गड्डुयामध्ये त्यांचे पार्थिव आढळून आले. मृतकाचे नाव चंद्रकांत रूपचंद कुंबरे (७) ,सामर्थ संजय उईके (६) असे आहे. काल गावा शेजारी असलेल्या छोट्याश्या खड्डुयात पाणी असल्याने आंघोळ करायला गेले होते. गावातील दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाला असल्याने गावात शोककळा पसरली आहे.

# भारत-पाक अटारी-वाघा सीमेवरील रिट्रीट सेरेमनीच्या वेळेत बदल

**चंदीगड/प्रतिनिधी :** भारत-पाकिस्तान अटारी-वाघा सीमेवरील रिट्रीट सेरेमनीच्या वेळेत बुधवारपासून बदल करण्यात आला आहे. देशाच्या विविध भागांतून दररोज हजारो लोक येथे येतात. या बदलामुळे, लोक वेळेवर पोहोचू शकतील आणि या अद्भुत सोहळ्याचा आनंद घेउ शकतील, अशी आशा आहे. बीटिंग रिट्रीट सेरेमनी



ही भारत आणि पाकिस्तानच्या सैनिकांद्वारे केली जाणारी एक विशेष परंपरा आहे, जी उत्साह, शिस्त आणि देशभक्तीचे प्रदर्शन करते. सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) जनतेला वेळेवर उपस्थित राहण्याचे आणि गैरसोय टाळण्यासाठी आपल्या जागा आगाउ आरक्षित करण्याचे आवाहन केले आहे.नवीन नियमांनुसार, रिट्रीट सेरेमनी आता सायंकाळी ५:३० वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालेल. यापूर्वी, रिट्रीट सेरेमनी सायंकाळी ५ वाजता सुरू होउन ५:३० वाजता संपत असे. हवामान आणि दिवसाच्या बदलत्या वेळा लक्षात घेउन प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. अधिका-यांच्या मते, अभ्यागतांना अधिक चांगला अनुभव देण्यासाठी आणि सुरक्षा व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वेळेतील हा बदल आवश्यक होता. माघारीची नवीन वेळ १ एप्रिलपासून लागू करण्यात आली आहे.

# पंतप्रधान, गृहमंत्र्यांनी डॉ. श्री श्री श्री शिवकुमार स्वामीगलू यांना वाहिली आदरांजली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज परमपूज्य डा. श्री श्री श्री शिवकुमार स्वामीगलू यांच्या जयंतीनिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. ते करुणा, नम्रता आणि मानवतेसाठी अखंड सेवाभावाचे मूर्तिमंत रूप म्हणून लोकांच्या सदैव स्मरणात राहतील, असे पंतप्रधानांनी नमूद केले आहे. स्वामीजींनी आपले संपूर्ण आयुष्य इतरांच्या उत्थानासाठी समर्पित केले. खरे मोठेपण हे दुस-यांच्या सेवेतच असते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले. शिक्षण, समाजकल्याण आणि अध्यात्म या क्षेत्रांतील त्यांचे योगदान अतुलनीय असून समाजावर त्याचा कायमस्वरूपी प्रभाव पडला आहे, असे मोदी यांनी नमूद केले. शिक्षण, सामाजिक कल्याण आणि अध्यात्म या क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानामुळे समाजावर दीर्घकालीन ठसा उमटला आहे. आजही त्यांचे जीवन असंख्य व्यक्तींना निःस्वार्थीपणा आणि सेवाभावाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देत आहे.



FILE PHOTO

पंतप्रधानांनी एक्स वर पोस्ट केलेल्या संदेशात म्हणाले की, त्यांच्या जयंतीनिमित्त परमपूज्य डा. श्री श्री श्री शिवकुमार स्वामीगलू यांना अभिवादन. ते करुणा, नम्रता आणि मानवतेसाठी अखंड सेवाभावाचे प्रतीक म्हणून सामूहिक लोकांच्या कायम स्मरणात राहतील. इतरांच्या उन्नतीसाठी समर्पित आयुष्य जगून त्यांनी दाखवून दिले की खरे महानत्व हे इतरांची सेवा करण्यात आहे. शिक्षण, समाजकल्याण आणि अध्यात्म क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानामुळे समाजावर दीर्घकालीन ठसा उमटला आहे. आजही त्यांचे जीवन असंख्य लोकांना निस्वार्थीपणा आणि सेवाभावाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देत आहे.

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी ही श्री श्री श्री शिवकुमार स्वामीजी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली.'एक्स वर पोस्ट केलेल्या एका संदेशात शाह म्हणाले की, श्री श्री श्री शिवकुमार स्वामीजी यांच्या जयंतीनिमित्त, अशा एका थोर महात्म्याला मी विनम्र अभिवादन करतो, ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य करुणा आणि शिक्षणासाठी समर्पित केले. त्यांच्या दैवी कृपेच्या आशीर्वादाने असंख्य लोकांच्या जीवनाचा कायापालट केला आहे. सिद्धगंगा मठाचा त्यांचा वारसा आपल्याला निस्वार्थपणे सेवा करण्याची प्रेरणा देत राहील.

# भारतीय संघ जुलैमध्ये झिम्बाब्वेचा दौरा करणार ; बीसीसीआयकडून संपूर्ण वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**भारतीय संघ यावर्षी जुलैमध्ये झिम्बाब्वेचा दौरा करणार असून, यजमान संघाविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. बीसीसीआयने बुधवारी भारताच्या झिम्बाब्वे दौ-याला दुजोरा दिला आणि वेळापत्रक जाहीर केले. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात २३ ते २६ जुलै दरम्यान तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाईल. तिन्ही सामने हरारे येथे खेळले जाणार आहेत.भारतीय संघाचे बहुतेक क्रिकेटपटू सध्या आयपीएल २०२६ मध्ये व्यस्त आहेत आणि त्यानंतरही त्यांना विश्रांतीसाठी वेळ मिळणार नाही. लीग संपल्यानंतर संघाला आंतरराष्ट्रीय मालिकांची मालिका खेळावी लागेल. अफगाणिस्तानविरुद्धची मायदेशातील मालिका आणि इंग्लंड आणि आयर्लंडच्या परदेश दौ-यानंतर, भारतीय संघ आता झिम्बाब्वे दौ-यावर जाणार आहे. बीसीसीआयने ही मालिका जाहीर केली आहे.गेल्या चार वर्षांतील भारताचा हा झिम्बाब्वेचा तिसरा दौरा असेल. यापूर्वी, संघाने २०२२ मध्ये तीन एकदिवसीय सामन्यांसाठी आणि त्यानंतर २०२४ मध्ये पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी झिम्बाब्वेचा दौरा केला होता. जुलैमध्ये होणा-या टी-२० मालिकेनंतर काही महिन्यांनी, भारताच्या यजमानपदाखाली दोन्ही देशांमध्ये एकदिवसीय मालिका खेळली जाईल. २००२ नंतर दोन्ही देश भारतात मालिका खेळण्याची ही पहिलीच वेळ असेल. आयपीएल संपताच, भारतीय संघ मायदेशात खेळल्या जाणा-या अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी आणि एकदिवसीय मालिकेची तयारी सुरू करेल. दोन्ही संघ एक कसोटी आणि तीन एकदिवसीय सामने खेळतील. यानंतर, संघ इंग्लंडला जाईल, जिथे ते तीन एकदिवसीय आणि एक टी-२० मालिका खेळतील. या दौ-यादरम्यान, भारतीय संघ झिम्बाब्वेला जाण्यापूर्वी एका टी-२० मालिकेसाठी आयर्लंडलाही जाईल.

# पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरवर धीम्या गतीने षटके टाकल्याबद्दल दंडात्मक कारवाई

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आयपीएल २०२६ मध्ये पहिल्यांदाच श्रेयस अय्यरवर दंड आकारून कठोर कारवाई केली आहे. मंगळवारी पंजाब किंग्सने आपला सामना जिंकला असला तरी, धीम्या गतीने षटके टाकल्याबद्दल पीबीकेएसचा कर्णधार श्रेयस अय्यरला ११ लाख रुपयांचा दंड भरावा लागला.आयपीएलच्या चौथ्या सामन्यात ही घटना घडली. पंजाब किंग्सचा सामना गुजरात टायटन्सशी झाला. सामन्यादरम्यान, पंजाब संघ निर्धारित वेळेत आपली षटके पूर्ण करू शकला नाही, जे आयपीएल नियमांचे उल्लंघन आहे. आयपीएलच्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे, 'या हंगामातील संघाचा हा पहिलाच गुन्हा होता आणि त्यामुळे कर्णधार येयस अय्यरला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.'आयपीएलमध्ये प्रत्येक संघाला निर्धारित वेळेत आपली षटके पूर्ण करणे आवश्यक असते. असे करण्यात अयशस्वी झाल्यास कर्णधाराला दंड भरावा लागतो. पहिल्या गुन्ह्यासाठी दंड १२ लाख रुपये आहे. वारंवार गुन्हा केल्यास अधिक कठोर दंड आकारला जातो. या प्रकरणात, अय्यरचा हा पहिलाच गुन्हा होता, त्यामुळे फक्त आर्थिक दंड आकारण्यात आला. षटकांचा वेग कमी ठेवण्याच्या दुस-या गुन्ह्यासाठी पंजाबच्या कर्णधाराला आणि संपूर्ण संघाला शिक्षा होईल. कर्णधाराचा दंड दुप्पट केला जाईल, तर संघातील उर्वरित क्रिकेटपटू आणि बदली क्रिकेटपटूंना ६,००,००० रुपये किंवा त्यांच्या सामना शुल्काच्या २५ऽ, यापैकी जी रक्कम कमी असेल, तो दंड आकारला जाईल.बीसीसीआयने आयपीएल २०२५ सुरू होणापूर्वी नियम शिथिल केले. षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल कर्णधारांवर बंदी घालणारा नियम काढून टाकण्यात आला. आता फक्त दंड आकारला जाईल. बैठकीत असे ठरले की, षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल कर्णधारांना डिमेरिट पाइंट्स आणि दंड दिला जाईल. केवळ गंभीर प्रकरणांमध्येच निर्बंध लादले जातील. लेव्हल १ च्या गुन्ह्यांसाठी सामना शुल्कात २५ ते ७५ऽ कपात केली जाईल, सोबतच डिमेरिट पाइंट्स दिले जातील, जे पुढील तीन वर्षांसाठी लागू राहतील. लेव्हल २ चे गुन्हे, जर खरोखरच गंभीर मानले गेले, तर चार डिमेरिट पाइंट्स दिले जातील. त्यात पुढे असे नमूद केले आहे की, प्रत्येक चार डिमेरिट पाइंट्ससाठी, सामनाधिकारी १०० टक्के दंड किंवा एक अतिरिक्तडिमेरिट पाइंटची शिक्षा देउ शकतात. या डिमेरिट पाइंट्समुळे भविष्यातील सामन्यावर बंदी येउ शकते, पण ओव्हरचा वेग कमी असल्याबद्दल सामन्यावर बंदी (तात्काळ) घातली जाणार नाही.

# सिलिंडर बुकिंगच्या फेक ओटीपीने बँक खाते होणार रिकामे

**नवी दिल्ली :** इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर सध्या देशात एलपीजी सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला असून अनेक शहरांमध्ये गॅससाठी लांबच लांब रांगा लागल्या आहेत. मात्र, सर्वसामान्यांच्या याच हतबलतेचा




फायदा आता सायबर भामट्यांनी घ्यायला सुरुवात केली आहे. गॅस सिलिंडरच्या बुकिंगच्या नावाखाली लोकांची वैयक्तिक माहिती आणि बँक खात्यातील पैसे लंपास केले जात असल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले आहेत. या वाढत्या फसवणुकीची दखल घेत केंद्र सरकारने आता नागरिकांसाठी महत्त्वाची ॲडव्हायजरी जारी केली आहे.इंडियन सायबर क्राईम कार्डिनेशन सेंटर नुसार, सायबर चोरटे सध्या लोकांच्या मोबाईलवर पॅनिक मेसेज पाठवत आहेत. तुमच्या सिलेंडरचे बुकिंग रद्द झाले आहे, त्वरित खालील लिंकवर क्लिक करून पुन्हा बुक करा किंवा पेमेंट करा आणि तात्काळ घरपोच डिलिव्हरी मिळवा अशा आशयाचे मेसेज पाठवून लोकांना जाळ्यात ओढले जात आहे. गॅसटंचाईमुळे घाबरलेले नागरिक घाईघाईत या लिंक्सवर क्लिक करतात आणि आपली गोपनीय माहिती चोरट्यांच्या हवाली करतात.

**कशी होतेय तुमची फसवणूक?**

१. फेक लिंक्स आणि ॲप्स

व्हाट्सॲप किंवा एसएमएसद्वारे बनावट वेबसाईटच्या लिंक्स पाठवल्या जातात, ज्या हुबेहूब गॅस कंपन्यांच्या वेबसाईटसारख्या दिसतात.

**२. क्यूआर कोड स्कॅम**

पेमेंट करण्यासाठी क्यूआर कोड पाठवला जातो, जो स्कॅन करताच तुमच्या खात्यातून पैसे वजा होतात.

**३. डिस्काउंटच्या आमिष**

गॅस टंचाईच्या काळात स्वस्त दरात सिलेंडर देण्याचे आमिष दाखवून लोकांकडून आगाउ रक्कम उकळली जात आहे.

# इस्त्रायलचा इराणच्या शिया मशिदीवर भीषण हल्ला युद्ध भडकण्याची चिन्हे; आतापर्यंत 8 जण ठार

**तेहराण :** मध्यपूर्वेतील युद्ध परिस्थिती दिवसेंदिवस भीषण होत चालली असून अमेरिका आणि इस्त्रायलनेइराणवर आपले हल्ले अधिक तीव्र केले. ताज्या घडामोडीत इस्त्रायलनेइराणच्या इस्फहान शहराला पुन्हा एकदा लक्ष्य करत मोठा ब?म्बहल्ला केला असून आतापर्यंत ८ जण ठार झाले आहेत. या युद्धाचा शेवट नेमका कधी आणि कसा होईल, याबाबत सध्या अनिश्चितता कायम आहे. याच पार्श्वभूमीवर इराणने इस्त्रायलवर गंभीर आरोप केले आहेत. अमेरिका आणि इस्त्रायलने जाझान शहरातील एका शिया मशि-दीवर ब?म्ब हल्ला केल्याचा इराणने दावा केला आहे. एकीकडे युद्धविरामाच्या अफवा पसरत असताना दुसरीकडे दोन्ही बाजूंनी हल्ल्यांचा वेग वाढला आहे. इराणने अमेरिका आणि इस्त्रायलवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. इराणच्या दाव्यानुसार, अमेरिका आणि इस्त्रायलने जाझान शहरातील एका शिया मशिदीला लक्ष्य केले आहे. या हल्ल्यात ८ नागरिकांचा मृत्यू झाल्याचे इराणने म्हटले आहे. प्रत्युत्तर म्हणून इराणकडूनही इस्त्रायली



आणि अमेरिकन तळांवर क्षेपणास्त्रे व ड्रोनचा वर्षाव केला जात आहे. इस्त्रायली आरोग्य मंत्रालयाने युद्धात होणा-या नुकसानीची ताजी आकडेवारी जाहीर केली आहे.इराणमध्ये गेल्या २४ तासांत १०४ लोक जखमी झाले असून त्यांना विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत जखमी झालेल्या इस्त्रायली नागरिकांची संख्या ६ हजार २८६ वर पोहोचली आहे. यापैकी १०० जणांवर अद्याप रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मध्य इस्त्रायलमध्ये नुकत्याच झालेल्या जीवितहानीचा आकडा यात अद्याप समाविष्ट करण्यात आलेला नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प बुधवारी संध्याकाळी प्राइम टाइममध्ये देशाला संबोधित करून इराण युद्धाबाबत महत्त्वाची माहिती देणार आहेत. मात्र, त्यापूर्वीच त्यांनी मित्रराष्ट्रांबाबत आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली आहे.ट्रम्प म्हणाले की, होर्मुझची सामुद्रधुनी खुली ठेवण्याची जबाबदारी केवळ अमेरिकेची नाही. जे देश तेलासाठी या मार्गावर अवलंबून आहेत, त्यांनी आपली जबाबदारी स्वतः पार पाडावी. अमेरिकेच्या युद्ध प्रयत्नांना पूर्ण पाठिंबा न देणा-या देशांवर ट्रम्प यांनी ताशेरे ओढले आहेत.



# 'ना रस्ता खुला करणार, ना चर्चा करणार...'

## होर्मुज संदर्भात इराणने अमेरिकेची हवा काढली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध आता पराकोटीला पोहोचले आहे. इराण तसूभरही मागे हटण्यास तयार दिसत नाही. आता इराणने अमेरिका आणि इस्त्रायलला थेट इशाराच दिला आहे. 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' अर्थात होर्मुजची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यास आणि कसल्याही प्रकारची चर्चा करण्यास इराणने स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. महत्वाचे म्हणजे, या संपूर्ण संघर्षाचे गंभीर परिणाम जागतिक तेल पुरवठा आणि अर्थव्यवस्थेवरही होताना दिसत आहेत. होर्मूझची खाडी आणि अमेरिकेच्या दाव्यासंदर्भात भाष्य करताना इराणच्या संसदेचे डेप्युटी स्पीकर म्हणाले, 'होर्मुज सामुद्रधुनी ना खुली होणार, ना अमेरिकेसोबत कुठल्याही प्रकारी चर्चा होणार. युद्ध, शांतता आणि चर्चेबाबतचे सर्वाधिकार केवळ इराणच्या सर्वोच्च नेत्यांकडे आहेत. त्यांच्याकडून चर्चेसंदर्भात अद्याप कुठल्याही प्रकारची परवानगी मिळालेली नाही.' इराणी संसदेने होर्मुझ सामुद्रधुनीच्या व्यवस्थापनासंदर्भात नवीन योजनेला मंजुरी -दरम्यान, इराणी संसदेने होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या व्यवस्थापनासंदर्भात एका नवीन योजनेला मंजुरीही दिली आहे, ज्यानुसार या महत्त्वाच्या जलमार्गातून जाणा-या जहाजांवर टोल आकारण्याचा प्रस्ताव आहे. अमेरिकेसोबतच्या चर्चेसंदर्भात इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनीही अमेरिकेसोबत कोणत्याही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष चर्चेचे वृत्त फेटाळून लावले आहे.

दरम्यान, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी इशारा दिला आहे की, सध्याची लष्करी कारवाई संपल्यानंतर होर्मुझची सामुद्रधुनी खुली राहील. इराणनला आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करावे लागेल. तसे झाले नाही तर, अमेरिका-समर्थित आघाडी हा मार्ग खुला राहील याची खात्री करेल.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## नक्षलवादाचा शेवट

नक्षलग्रस्त गडचिरोलीला आता नवीन ओळख मिळाली असून ती 'पोलादनगरी' म्हणून ओळखली जाणार आहे.देशाला विकासाकडून विनाशाकडे नेऊ पाहणारा नक्षलवाद संपुष्टात येण्याच्या मार्गावर असल्याचे दिलासादायक उद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काढले आहेत. मार्च २०२६ अखेर देश नक्षलमुक्त होईल, असे आश्वासन त्यांनी दिले होते आणि ते जवळजवळ पूर्ण केले आहे.नक्षलवादी गटांचा आदर्श सुभाषचंद्र बोस किंवा आदिवासींच्या प्रतिकार चळवळीतील देशी नेते नव्हते. त्याऐवजी त्यांनी माओ त्से तुंग यांच्यासारख्या परदेशातील क्रांतिकारी नेत्यांचे अनुकरण केले. त्यामुळे नक्षलवाद्यांची तुलना स्वातंत्र्यसैनिकांशी करणे गैर ठरते, हे शहा यांचे मत पटण्यासारखेच आहे. बिरसा मुंडा यांच्यासारखे झारखंडमधील स्वातंत्र्ययोद्धे हे वेगळे नेते होते. बिरसांना आपले वडील सुगन मुंडांचे जबरदस्तीने धर्मांतर केल्याबद्दल ख्रिस्ती मिशनऱ्यांचा व इंग्रजांचा मनस्वी राग येत असे. अशिक्षित आदिवासींवर इंग्रजांचे अत्याचार पाहून त्यांना धडा शिकवण्यासाठी बिरसा यांनी छोटा नागपूर क्षेत्रात जबरदस्त लढा उभारला. इंग्रजांनी त्यांना अटक केली व तुरुंगात अतोनात छळ केल्यानंतर दि. ९ जून १९०० रोजी त्यांचा रांची कारागृहात मृत्यू झाला; पण बिरसा यांना लोकांनी 'जननायक' हा किताब बहाल केला. १९७०च्या दशकात झारखंडमध्येच शिबू सोरेन हे आदिवासी नेते उदयास आले. त्यांचे वडील शिक्षक होते आणि त्यांची हत्या एका सावकाराने केली होती. शिबू यांनी आदिवासींना शिक्षित करण्याचे ठरवले. जमिनीची पाटी आणि त्यावर लिहायला दगडाची लेखणी, असे शिक्षण द्यायला सुरुवात केली. शिबू सोरेन या आदिवासींचे 'गुरुजी' बनले. आदिवासींच्या जमिनी हडप करून त्यावर सावकारांनी घेतलेली पिके कापून नेण्याची चळवळ शिबू यांनी सुरू केली. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी यांच्या न्याय्य हक्कांसाठी भारतात अनेक ठिकाणी लोकांनी जबरदस्त लढे उभारले; मात्र हे लढे या मातीतील होते. त्यामागे चिनी वा अन्य देशांतील नेत्यांच्या प्रेरणा नव्हत्या.भारतात नक्षलवादाची सुरुवात १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या गावातून झाली. चारू मुजुमदार आणि कनू सन्याल यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक आदिवासी आणि शेतकऱ्यांनी जमीनदारांविरुद्ध पुकारलेल्या सशस्त्र उठावातून या चळवळीचा उदय झाला. माओच्या विचारसरणीचा आधार असल्यामुळे त्यांना 'माओवादी' असेही म्हणतात; मात्र नक्षलवाद हा पहिल्यापासून हिंसकच होता. पश्चिम बंगालमागोमाग, बिहार, ओडिशा, आंध्र, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात ही चळवळ पसरली. या राज्यांमधील कायदा आणि सुव्यवस्था ढासळली होती आणि याचा परिणाम सुमारे १२ कोटी लोकांवर झाला. या संघर्षात जवळपास २० हजार तरुणांना आपला जीव गमवावा लागला, हे कटू वास्तव आहे. खासकरून आदिवासी वा दुर्गम पट्ट्यात रस्ते, शाळा, दवाखाने, इस्पितळे उभारताना नक्षलवाद्यांकडून अडचणी उत्पन्न केल्या जात होत्या. रस्त्यांवर सुरुंग पेरले जात होते. कारखान्यांसाठी जमिनी संपादन करू द्यायच्या नाहीत, उद्योगधंदे सुरू झाल्यास त्यांच्याकडून खंडणी मागायची, सरकारी अधिकाऱ्यांना धमकवायचे आणि पोलिसांवर सातत्याने हल्ले चढवायचे, हेच उद्योग वर्षानुवर्षे सुरू होते. लूटमार करून दारू वा अन्य चैनबाजीत पैसे उडवायचे, हाही काहींचा खेळ सुरू होता. लोकसभेत अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना नक्षलवाद संपुष्टात न येण्यामागे काँग्रेस व डावे पक्ष कारणीभूत असल्याची टीका शहा यांनी केली. काँग्रेसला १९७० नंतरच्या दशकांमध्ये हा प्रश्न का सोडवता आला नाही, हा सवाल आहेच; परंतु केवळ काँग्रेसलाच नव्हे, तर संबंधित राज्यांतील वेगवेगळ्या पक्षांनाही हा प्रश्न सोडवता आला नव्हता. अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारलादेखील या प्रश्नावर मात करता आली नव्हती, हेही लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय केंद्र आणि राज्ये यांच्यातील समन्वय पाहिजे तेवढा नव्हता. नक्षलवाद्यांमधील अपप्रवृत्तींमुळे त्यांच्याबद्दल जनतेत तिरस्कार निर्माण झाला आहे. एकेकाळी देशात क्रांती करू पाहणारे तरुण जेव्हा केवळ भष्ट व्यवहार करू लागले, जनतेचे शोषण करू लागले, तेव्हा त्यांच्याबद्दल घृणा निर्माण होऊ लागली. केंद्रीय गृह खात्यानेदेखील सुरक्षा दलांना सर्वप्रकारची साधनसामग्री पुरवली आणि नेटाने व सर्व सामर्थ्यानिशी नक्षलवाद्यांविरुद्ध कडक कारवाई केली. महाराष्ट्रातही माओवाद आता जवळपास संपुष्टात आला आहे. ही लढाई लढताना २४४ पोलिसांनी बलिदान दिले. त्यांच्या बलिदानाची दखल घेत आणि हे कठीण काम करणाऱ्या पोलिसांचे मनोबल वाढवण्यासाठी, ज्यांनी सी-६० फोर्समध्ये किमान तीन वर्षे सेवा बजावली आहे, त्या सर्वांना पदक देऊन सन्मानित करण्याचा स्वागतार्ह निर्णय देवेंद्र फडणवीस सरकारने घेतला आहे. गेल्या ऑक्टोबरात गडचिरोलीतील नक्षलवादविरोधी लढ्याला मोठेच यश मिळाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तब्बल ६० नक्षलवाद्यांनी आपली शस्त्रे खाली ठेवली होती. त्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या सीमेवर सक्रिय असलेला कुख्यात नक्षलवादी आणि नक्षल्यांच्या पॉलिटब्युरोचा सदस्य सोनू ऊर्फ भूपती याचाही समावेश होता. अनेक नक्षलवादी नेत्यांना घडवण्यात त्याची मोठी भूमिका होती. भूपतीने आपल्या इतर साथीदारांसह आत्मसमर्पण करण्याचा निर्णय घेतला होता. भूपतीच्या आत्मसमर्पणानंतर नक्षलमुक्त महाराष्ट्राच्या मोहिमेला खूपच बळ मिळाले. आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांच्या हातात मुख्यमंत्र्यांनी संविधानाची प्रतही सुपूर्द केली होती. त्यानंतर नक्षलवादी चळवळीची धुरा सांभाळणाऱ्या सीपीआय माओवादी या बंदी असलेल्या संघटनेचा सरचिटणीस थिप्पिरी तिरुपती ऊर्फ देवजी तसेच संग्राम १६ साथीदारांसह तेलंगणा पोलिसांसमोर शरण आले. यात केंद्रीय समितीचा सदस्य मल्लाराजी रेड्डीचाही समावेश होता. यामुळे नक्षलवाद्यांचा कणाच मोडला गेला असल्याचे अधोरेखित झाले. मूळचा करीमनगरचा रहिवासी असलेल्या देवजीवर महाराष्ट्र व तेलंगणासह विविध राज्यांत एकूण दहा कोटी रुपयांचे बक्षीस होते. नक्षलग्रत गडचिरोली आता पोलादनगरी म्हणून विकसित होत असून, तेथे स्थानिक तरुण-तरुणींना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ लागला आहे. हातात शस्त्र घेण्याऐवजी पुस्तक किंवा कॉम्प्युटर घेणे हाच प्रगतीचा खरा मार्ग आहे, हे सामान्यजनांच्या आता हळूहळू लक्षात येऊ लागले आहे.

# युद्धाचा वणवा जलसाठ्यांकडे...

**'आगामी महायुद्ध हे पाण्यावरून लढले जाऊ शकते' असे भाकीत मागील काळात सातत्याने कानी पडत असे. सध्या सुरू असलेल्या आखातातील युद्धादरम्यान या विधानाची प्रचीती येताना दिसत आहे. इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी नुकताच असा खळबळजनक आरोप केला आहे की, अमेरिकन हल्ल्यात होर्मुझ सामुद्रधुनीजवळील केशम बेटावर असलेले खारे पाणी गोड करण्याचे (डिसेलिनेशन) मुख्य संयंत्र पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. हे युद्ध केवळ दोन विचारसरणींमधील किंवा सत्ता संघर्षाचे राहिलेले नाही, तर ते नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विनाशाचे निमित्त ठरत आहे.**



इराणच्या अण्वस्त्रांवरून सुरू झालेला हा संघर्ष आता केवळ सीमेवरील चकमकीपर्यंत मर्यादित न राहता, मानवी अस्तित्वाचा पाया असलेल्या पाणीपुरवठा आणि त्याच्या सुरक्षा यंत्रणांच्या नाशापर्यंत पोहोचला आहे. इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी नुकताच असा खळबळजनक आरोप केला आहे की, अमेरिकन हल्ल्यात होर्मुझ सामुद्रधुनीजवळील 'केशम' बेटावर असलेले खारे पाणी गोड करण्याचे (डिसेलिनेशन) मुख्य संयंत्र पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. या एका हल्ल्याचा परिणाम इतका भीषण आहे की, परिसरातील सुमारे ३० गावांचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने बहरीनमधील जल शुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य केल्यामुळे आता हे युद्ध तेल आणि लष्करी तळांच्या पलीकडे जाऊन थेट पाण्यावर येऊन ठेपले आहे.

खाडी देशांमधील मोठी लोकसंख्या ही नैसर्गिक पाण्याच्या स्रोतांच्या अभावामुळे याच कृत्रिम प्रकल्पांवर अवलंबून आहे, त्यामुळे या केंद्रांना लक्ष्य करणे म्हणजे संपूर्ण नागरी वस्तीला मृत्यूच्या खाईत ढकलण्यासारखे आहे.भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी अनेक वर्षांपूर्वी एक भविष्यवाणी केली होती की, पुढचे जागतिक युद्ध हे पाण्यासाठी होईल. सध्या मध्य आशियामध्ये सुरू असलेली परिस्थिती पाहता हे विधान आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. आखाती देशांनी आता आपल्या तेल विहिरींपेक्षा या जलसंयंत्रांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यास सुरुवात केली असून या पेंद्रांभोवती आधुनिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन तैनात करण्यात आले आहेत. या प्रकल्पांना होणारी थोडीशी इजादेखील संपूर्ण देशाचे जनजीवन विस्कळीत करण्यास पुरेशी आहे. विशेषतः बहरीन, कतार आणि कुवेत यांसारख्या देशांकडे पाण्याचे पर्यायी स्रोत अत्यंत कमी असल्याने त्यांना या युद्धाचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. इराणसाठी हे युद्ध केवळ लष्करी नसून ते अस्तित्वाचे युद्ध बनले आहे, कारण त्यांच्या स्वतःच्या जलसाठय़ांवरही मोठे संकट आले आहे.

अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानवर केलेल्या रासायनिक 'टॉसिक बॉम्ब'च्या हल्ल्यामुळे तिथली स्थिती अत्यंत भयावह झाली आहे. या हल्ल्यात तेहरानमधील ३० मोठे जलसाठे निकामी झाले असून हवेत विषारी धूर पसरला आहे. या प्रदूषणामुळे शहरात 'ॲसिड रेन' म्हणजेच आम्ल पावसाची भीती निर्माण झाली आहे. नैसर्गिक जलाशयांच्या पृष्ठभागावर तेलाचा आणि रसायनांचा जाड थर जमा झाल्यामुळे ते पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. या संकटामुळे तेहरानमधील सुमारे ९० लाख नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी व्याकूळ झाले असून शहरात अघोषित संचारबंदी लागू करण्यात आली आहे. केवळ इराणच नाही, तर लेबनॉनमधील हिजबुल्लाच्या तळांवरदेखील अशाच प्रकारचे टॉसिक बॉम्ब टाकले जात आहेत, जे पिकांचा नाश करण्यासोबतच जमिनीखालील पाण्याचे साठे कायमचे दूषित करत आहेत.

सौदी अरेबिया, कुवेत, ओमान आणि कतार यांसारख्या देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा तेल असले तरी त्यांच्या अस्तित्वाचा आधार जल शुद्धीकरण संयंत्रे हाच आहे. या देशांतील ९० टक्के पिण्याचे पाणी समुद्राच्या खा?या पाण्यावर प्रक्रिया करून मिळवले जाते. एका जुन्या अमेरिकन राजनैतिक दस्तऐवजात असा इशारा देण्यात आला होता की, जर सौदी अरेबियातील 'जुबेल' जल पेंद्राला किंवा तिथल्या पाइपलाइनला हानी पोहोचली, तर राजधानी रियाधला अवघ्या सात दिवसांत रिकामे करावे लागेल. यावरून या देशांची पाण्याची गरज आणि त्यांची हतबलता लक्षात येते. खाडी देशांनी आपल्या तलावांमध्ये आणि पाणीपुरवठा साखळीत मोठी गुंतवणूक केली असली तरी युद्धाच्या काळात हे सर्व साठे असुरक्षित ठरत आहेत. या भीषण संकटाच्या काळात इस्रायलने मात्र जल व्यवस्थापनात स्वतःला जागतिक महाशक्ती म्हणून सिद्ध केले आहे. इस्रायलकडे समुद्राचे पाणी पिण्यायोग्य बनवण्याचे जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान आहे. त्यांनी केवळ कायमस्वरूपी प्रकल्पांवर विसंबून न राहता 'गेलमॉबाईल वॉटर फिल्ट्रेशन प्लांट' विकसित केले आहेत. हे संयंत्र म्हणजे एका ट्रकमध्ये बसवलेले फिरते शुद्धीकरण केंद्र असून ते कोणत्याही नैसर्गिक किं

जमिनीची नैसर्गिक रचना अशी असते की पावसाचे पाणी एका मर्यादेपर्यंतच जमिनीत मुरते. मात्र, अति उपसामुळे जमिनीखाली पोकळी निर्माण होत असून तिथे समुद्राचे खारे पाणी शिरू लागले आहे. यामुळे जमिनीतील गोडय़ा पाण्याचे साठे कायमचे खराब होत आहेत. जागतिक तापमानवाढीमुळे पश्चिम अंटार्क्टिकातील बर्फाचे थर वेगाने वितळत असून समुद्र पातळी वाढत आहे. याचा धोका केवळ बांगलादेश किंवा मार्शल बेटांनाच नाही, तर भारतातील मुंबईसारख्या महानगरांनाही आहे. वाढत्या समुद्र पातळीमुळे किनारपट्टीवरील निवासी भागांतील विहिरी आणि कूपनलिकांमध्ये समुद्राचे खारे पाणी मिसळत आहे. यामुळे भविष्यात या शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याचा भीषण दुष्काळ पडू शकतो. इराण आणि अमेरिका यांच्यातील या संघर्षामुळे किनारपट्टीवरील व खाडी देशांतील पिण्याच्या पाण्याचे संकट आता आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिले जात आहे. हे युद्ध केवळ दोन विचारसरणींमधील किंवा सत्ता संघर्षाचे राहिलेले नाही, तर ते नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विनाशाचे निमित्त ठरत आहे. जर ही परिस्थिती लवकर आटोक्यात आली नाही, तर भविष्यात शस्त्रास्त्रांपेक्षा जास्त मृत्यू हे तहानेमुळे होतील अशी चिन्हे दिसत आहेत. पाण्याच्या संकटामुळे जगाला आता जल संवर्धनाचे आणि शुद्धीकरणाच्या नवनवीन तंत्रज्ञानाचे महत्त्व नव्याने समजून घेण्याची वेळ आली आहे.

**राजीव मुळ्ये**

## आम्ही 'ट्रम्प' यांना ओळखत नाही...

इराणमधील अयातुल्ला अली खोमेनी ३ यांची राजवट उलथून टाकून तेथे अमेरिकाधार्जिण्या युवराज शाह यांची राजवट आणायची यासाठीच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान नेत्यानाहू यांनी संयुक्तपणे अचानक इराणबरोबर युध्द सुरू केले. युध्दाला प्रारंभ होताच अमेरिकन क्षेपणास्त्र हल्ल्यात खोमेनी ठार झाले पण आपण युध्द करताच इराणची जनता रस्त्यावर उतरेल आणि तिथली धर्मांध राजवट उलथून टाकेल या भ्रमात असलेल्या ट्रम्प यांना इराणी लष्कर आणि जनतेने जोरदार तडाखा देतानाच युध्दात या दोन्ही राष्ट्रांचा आक्रमकपणे प्रतिकार केला. आपल्या राष्ट्रवरचे आक्रमण मोडून काढण्यासाठी अमेरिकेच्या संरक्षणाच्या पंखाखाली असलेल्या सौदी अरेबिया, इराक, कुवेत, संयुक्त अरब अमिराती या राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर तेल शुध्दीकरण आणि तेल साठवण केंद्रांवर क्षेपणास्त्रांचे हल्ले चढवले. ३० दिवस उलटले तरी इराणने माघार तर घेतलेली नाहीच पण या युध्दात अमेरिका आणि इस्राईल या दोन्ही राष्ट्रांनाही जेरिला आणले आहे. एक महिना उलटूनही इराण ट्रम्प यांच्या धमक्यांना घाबरत तर नाहीच पण क्षेपणास्त्र आणि ड्रोनद्वारे तुफानी बाँबहल्ले करीत आपल्या लष्करी सामर्थ्याची प्रचिती घडवत आहे. युध्दविराम व्हावा, असे ट्रम्प यांना वाटते पण इराण मात्र ताठरपणे ट्रम्प यांनाच जोरदार आव्हाने देत असल्याने ट्रम्प यांची पुरती कोंडी झाली. हॉमुझची सामुद्रधुनी (खाडी) इराणने बंद केल्याने सारे जग या खाडीतून होणाऱ्या तेल पुरवठा खंडित झाल्याने संकटात सापडले तर अमेरिकेत महागाईचा भडका उडाला. सर्वसामान्य अमेरिकन जनतेला त्याच्या झळा बसू लागल्या. आपणच निवडूणन दिलेल्या या हुकूमशाह ट्रम्पमुळे आपल्या राष्ट्राचे नव्हे तर अमेरिकन लोकशाहीचे भवितव्य धोक्यात आल्याच्या जाणिवेने धोक्यात आल्याच्या अमेरिकन जनतेत ट्रम्प विरोधी असंतोष खदखदतो आहे. ट्रम्प विरोधी असंतोषाच्या ज्वालामुखीचा हा स्फोट दोन दिवसापूर्वी संपूर्ण अमेरिकेत झाला. अमेरिकेतल्या सर्वच्या सर्व ५० राज्यातली अमेरिकन जनता ३ हजार शहरात एकवटली. रस्त्यावर आली आणि 'नो किंग्स' आम्हाला राजा नको हा भसमासुर सत्तेवरून काढून टाका अन्यथा लोकशाहीचा गळा घोटला जाईल अशा घोषणा देत १ कोटी अमेरिकन जनतेने निदर्शने करीत हे शांततापूर्ण आंदोलन यशस्वी केले आहे. ट्रम्प यांनी अमेरिकन जनतेच्या भावना विचारात न घेता इराणच्या विरोधात सुरू केलेल्या या युध्दाने आधीच प्रचंड कर्जबाजारी आहेत !

KINGS असलेली अमेरिका आता पूर्ण अमेरिकन विचारवंत आणि जनतेला वाटते आहे. हे एवढे मोठे अतिविराट जन आंदोलन होवूनसुध्दा ट्रम्प यांनी मगरुरी काही कमी झाली नाही. इराणचा खातमा केल्याशिवाय आपण युध्द थांबवणार नाही. हे आंदोलन राष्ट्र विरोधी शक्तीनी आणि डाव्या विचारांच्या लोकांनी केल्याचा त्यांचा आरोप आहे. अमेरिकन जनतेत युध्दविरोधी भावना प्रचंड प्रमाणात निर्माण झालेल्या आहेत आणि ट्रम्प हे आपल्या या हुकूमशाही परराष्ट्र धोरणाने अमेरिका आणि अमेरिकन जनतेची पुरती वाट लावतील, असे जाहीर आरोप या निदर्शनाच्या वेळी करण्यात आले. सर्वसामान्य जनतेबरोबरच महिला, विद्यार्थी, विचारवंत, साहित्यिक या साऱ्यांनी या जनआंदोलनात सहभागी होवून, ट्रम्प यांच्या विरोधात एकवटून सामूहिक निषेध नोंदवला आहे. अमेरिकन जनता विरोधात आणि नाटो संरक्षण करारात सहभागही असलेले एकही युरोपियन राष्ट्र ट्रम्प यांना या युध्दात साथ द्यायला तयार नाही तर अमेरिका आपले संरक्षण करील या भरवश्यावर असलेल्या अरब राष्ट्रांना या युध्दाच्या झळा बसत आहेत आणि युध्दाचा वणवा अधिक असा भडकतो आहे. आम्हाला ट्रम्प नकोच, असे अमेरिकन जनताच संघटितपणे सांगू लागल्याने ट्रम्प आता जागतिक राजकारणात पूर्णपणे एकाकी पडले आहेत!

**श्रीहरी**

## ट्रम्पशाही विरोधात अमेरिकन जनता रस्त्यावर



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हुकूमशाही आणि युद्धखोर वृत्तीने संपूर्ण जग वैतागले आहे. आपल्या हेकेखोरापणामुळे संपूर्ण जगाला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प यांच्यावर जगभरातील जनता वैतागली आहे कारण त्यांनी ज्याप्रकारे इराणवर हल्ला करून संपूर्ण जगाला वेठीस धरले ते कोणालाही आवडले नाही. ट्रम्प यांच्या हुकूमशाही वृत्तीला आता त्यांच्या देशातील जनताही वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने दीड वर्षापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. कोणताही विचार न करता इराणवर हल्ला करण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयाचा निषेध करण्यासाठी अमेरिकेत लाखो लोक रस्त्यांवर उतरले अमेरिकेचा राष्ट्रध्वज उलटा करून नागरिकांनी ट्रम्प यांचा अनोख्या पद्धतीने निषेध केला. या आंदोलनाला आंदोलनकर्त्यांनी नो किंग्ज असे नाव दिले. आम्हाला राजा नको तर लोकशाही मानणारा राष्ट्राध्यक्ष हवा जो लोकशाहिवृत्तीने देशाचा कारभार करेल अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिले.

ट्रम्प यांची छबी विदुषकी रूपात दाखवून डोनाल्ड ट्रम्प चालते व्हा! अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिल्या. या आंदोलनात लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील लोक रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनात महिलांची संख्याही लक्षणीय होती. ट्रम्प यांनी कोणताही मागचा पुढचा विचार न करता इराणवर हल्ला केला. खामेनी यांची हत्या करून दोन चार दिवसात इराणवर सहज विजय मिळवू अशा थाटात इराणवर हल्ला करणाऱ्या ट्रम्प यांना महिना उलटून गेला तरी इराणवर विजय मिळवता आला नाही. इराणला शरण आणण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ट्रम्प यांच्यावरच आता युद्धातून माघार घेण्याची वेळ आली आहे. ट्रम्प यांच्यामुळे संपूर्ण जगात अमेरिकेची नाचक्की होत आहे ही बाब अमेरिकेच्या जनतेला आवडली नाही म्हणूनच ते ट्रम्प यांच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरत आहे अर्थात ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन लोक रस्त्यावर उतरण्याची ही पहिलीच वेळ नाही. वर्षभरापूर्वी स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली होती. त्या आंदोलनाला आंदोलकांनी गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले होते.शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनातही लाखो नागरिक रस्त्यावर जमले होते. त्यावेळी सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला होता. ते आंदोलन शांततेत पार पडले तरी त्या आंदोलनातही आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला होता. त्याआधीही अमेरिकन लोकांनी ट्रम्प यांच्याविरोधात रस्त्यावर उतरून असेच आंदोलन केले होते त्या आंदोलनाला हँडस ऑफ असे नाव दिले होते. त्या आंदोलनातही लोकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त करणाऱ्या घोषणा दिल्या होत्या.आताचे आंदोलनही त्याच धर्तीवर शांततेत पार पडत असले तरी लोक ट्रम्प यांच्या विरोधात तितकाच रोष व्यक्त करत आहेत. या आंदोलनाविषयी सांगताना आंदोलनकर्ते म्हणतात आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे.हे आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे आंदोलनकर्ते सांगत आहेत.या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला असून त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील हे आंदोलनही शांततेत पार पडत असल्याने कोणालाही अटक करण्यात आले नाही मात्र या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली आहे. ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार.

राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरुवातीला इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले याचा परिणाम जितका जगावर झाला तितकाच तो अमेरिकेवर देखील झाला. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती निर्माण झाली. ट्रम्प यांनी हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत. आता तर इराणवर हल्ला करून ट्रम्प यांनी अमेरिकन जनतेला महागाईच्या खाईत लोटले. ट्रम्प यांच्या या सर्व निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

**श्याम ठाणेदार**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अभिजित सावंत यांच्या सादरीकरणाने 'यवतमाळ महोत्सव २०२६'चा दिमाखात समारोप

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**यवतमाळ :** चार दिवसांची मरगळ अनुभवलेल्या 'यवतमाळ महोत्सव २०२६'ला अखेरच्या दिवशी इंडियन आयडॉल फेम गायक अभिजित सावंत यांच्या दमदार सादरीकरणाने उत्साहाची नवी उभारी मिळाली. त्यांच्या गाण्यांवर प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून कार्यक्रमाचा आनंद लुटला आणि महोत्सवाचा शेवट उत्साहपूर्ण वातावरणात झाला.राज्य शासनाच्या विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवाचा समारोप दिमाखात पार पडला. समारोपीय कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विकास मीना, नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, प्रकल्प संचालक आनंदराव पिंगळे, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सुनील सोसे, जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कविता महाजन, तहसीलदार डॉ. योगेश देशमुख, मुख्याधिकारी शुभम क्यातमवार आदी मान्यवर उपस्थित होते. महोत्सवात भरविण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनी, 'उमेद' अंतर्गत समृद्धी मिनी सरस प्रदर्शनी तसेच माविमच्या नवतेजस्विनी प्रदर्शनातून सुमारे अडीच कोटी रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिली. या प्रदर्शनांमध्ये कृषी उत्पादक कंपन्या, महिला स्वयं सहायता गटांचे ३०० हून अधिक स्टॉल्स तसेच ६० पेक्षा जास्त खाद्य स्टॉल्स उभारण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बासुरीवादक आकाश सैतवाल यांनी सुमधुर सादरीकरण केले. तसेच पाककला स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्टॉलधारकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते अभिजित सावंत यांचा सत्कार करण्यात आला.

---

तीन वाहने जप्त, आरोपी ताब्यात

## यवतमाळमध्ये वाहन चोरांचा पर्दाफाश!



■ जनमाध्यम प्रतिनिधी

**यवतमाळ :** जिल्ह्यात वाढत्या वाहन चोरीच्या घटनांवर आळा बसवण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेने विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या कारवाईत एका सराईत वाहनचोराला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून चोरीची तीन वाहने जप्त करण्यात आली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मयंक सुभाष पाईकराव (रा. मुलकी जांब रोड, यवतमाळ) हा प्रवासवन परिसरात चोरीचे वाहन विक्रीसाठी फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपीने आपल्या साथीदारासह वाहन चोरी केल्याची कबुली दिली. या कारवाईदरम्यान आर्मी रोड परिसरातून चोरीस गेलेले ओमनी वाहन तसेच इतर दोन दुचाकी (स्प्लेंडर व ज्युपिटर) असा एकूण तीन वाहनांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. जप्त करण्यात आलेल्या वाहनांची एकूण अंदाजे किंमत १ लाख १० हजार रुपये आहे. ही कारवाई गुन्हे प्रकटीकरण शाखा, अवधूतवाडी येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत जिंदमवार, पोलीस उपनिरीक्षक सुरज जगताप, एएस सुरेश मेश्राम व पोलीस हवालदार विशाल भगत बलराज शुक्ला पोलीस शिपाई मोहम्मद भगतवाले, राज कांबळे योगेश चोपडे नितीन कवडे यांनी कारवाई त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील वाहन चोरीच्या घटनांवर मोठ्या प्रमाणात आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत असून संबंधित पोलीस पथकाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

---

## कुटाराचा ढिग पेटविला



**यवतमाळ :** आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीच्या शेतात झाकून ठेवलेल्या कुटाराच्या ढिगाला आग लावली. या आगीत २५ हजारांचे कुटार जळून खाक झाले. ही घटना २१ मार्चला रात्री ८.३० ते २२ मार्चच्या सकाळी ७ वाजताच्या दरम्यान आर्णी तालुक्यातील शारी शिवारात घडली. हिरासिंग पांडू चव्हाण (५६) रा. शारी, ता. आर्णी असे फिर्यादीचे नाव आहे. तर वामन पांडू चव्हाण (५८), नितीन वामन चव्हाण (३५) दोन्ही रा. शारी अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी आर्णी पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

---

नितिन भूतडा, भाजपा जिल्हा समन्वयक

## काम करत आलोय, काम करत राहू

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**उमरखेड :** शहराच्या प्रभाग २ मधील प्रसिद्ध आणि प्राचीन सुफी संत हजरत तातार शाह बाबा दर्ग्याच्या सौंदर्यीकरण भूमिपूजन सोहळा आज स्थानिक आमदार किशनराव वानखेडे, भाजप जिल्हा समन्वयक आणि यवतमाळ जिल्ह्यातील लोकप्रिय नेते नितीन भुताडा व माजी नगरसेवक व युवा नेते मुजीब बागवान यांच्या हस्ते, दर्ग्याचे मुजावर अयाज बाबू यांच्यासमवेत पार पडला. यावेळी जिल्हा समन्वयक नितीन भूतडा म्हणाले, समाजासाठी काम करत आलोय, काम करत राहू, तसेच पंधरा दिवसात शहरातील ईदगाह परिसरात ५० लाखाच्या विकास कामच्या भूमिपूजन लवकरच होईल हे यावेळी ते म्हणाले ,सर्व मान्यवरांनी शहराच्या विकासात अशीच प्रगती होईल अशी आशा व्यक्त केली. माजी आमदार विजय खडसे, महेश कालेश्वरकर, नगरसेवक साजिद जागीरदार, वजाहत मुजावर ,निलोफर मॅडम, गाझी सर, सय्यद युसूफ सर, रज्जाक बाबू साहेब, शेख माजिद, नाहिद नवाब, न प सदस्य कोडगीरवार, गटनेते हडपकर ,नप सदस्य गुजरे सर, नप सदस्य गोपाल कलाने,पुंडलिक कुबडे ,हामिद खान, सय्यद सादिक, बाडू भट्टड़, वसीम भाई, रमेश चव्हाण,प्रभागातील सर्व नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

---

अनोळखी व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन

## देवधरी घाटात अपघातात इसमाचा मृत्यू

■ जनमाध्यम प्रतिनिधी
अरविंद तेलंगे




**राळेगाव :** राळेगाव तालुक्यातील वडकी–पांढरकवडा मार्गावरील देवधरी घाटात अज्ञात वाहनाच्या धडकेत एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे आवाहन वडकी पोलिसांनी केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पांढरकवडाकडून वडकीकडे पायी जात असताना संबंधित इसमाला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. अपघातात तो गंभीर जखमी झाला होता. स्थानिकांच्या मदतीने त्याला तातडीने उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३० वर्षे असून उंची सुमारे ५ फूट ४ इंच ते ५ फूट ५ इंच आहे. त्याची शरीरयष्टी सडपातळ असून वर्ण गोरा व केस काळे आहेत. अंगात कथ्या रंगाची काळ्या पट्ट्यांची टी–शर्ट, निळ्या रंगाची फॉर्मल पॅन्ट, गळ्यात निळ्या रंगाचा रूमाल, उजव्या हातात स्टीलचा कडा आणि कथ्या रंगाचा क्लिप असलेला बेल्ट अशी त्याची ओळख आहे.

या घटनेची नोंद वडकी पोलिस स्टेशनमध्ये दिनांक ३ मार्च २०२६ रोजी करण्यात आली आहे. सदर मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून, कोणास त्याबाबत माहिती असल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

---

## पांदन रस्ते क्लस्टर पद्धतीने राबविणार

आमदार राजू तोडसाम यांची घोषणा

■ जनमाध्यम प्रतिनिधी



**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यात मुख्यमंत्री पांदन रस्ते योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी केळापूर–घाटंजी मतदारसंघाचे आमदार राजू तोडसाम यांनी क्लस्टर पद्धतीचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी पांदन रस्ते हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असून, या माध्यमातून विकासासोबतच रोजगारनिर्मितीलाही चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

आमदार तोडसाम यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री व संबंधित विभागाकडे प्रत्येक मतदारसंघात पांदन रस्त्यांची कामे क्लस्टर पद्धतीने राबविण्याची मागणी केली आहे. या पद्धतीमुळे स्थानिक बेरोजगार युवक, लहान व मध्यम ठेकेदार तसेच तांत्रिक शिक्षण घेतलेल्या तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

यवतमाळ हा कृषीप्रधान जिल्हा असून येथे कापूस, सोयाबीनसारखी पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. मात्र मोठे उद्योगधंदे नसल्याने बेरोजगारीचे प्रमाणही अधिक आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक स्तरावरच कामांच्या संधी निर्माण करणे गरजेचे असल्याचे आमदार तोडसाम यांनी स्पष्ट केले. क्लस्टर पद्धतीमुळे कामांची गुणवत्ता सुधारेल, वेळेत कामे पूर्ण होतील आणि स्थानिक अर्थचक्राला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच मोठ्या ठेकेदारांसोबतच नवोदित व लहान ठेकेदारांनाही संधी देण्याची गरज अधोरेखित करत, शासनाने पुढाकार घेऊन युवकांना बांधकाम व इतर क्षेत्रातील परवाने मिळवून देण्यासाठी सहाय्य करावे, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, दैनिक जनमाध्यमशी बोलताना आमदार तोडसाम यांनी पांदन रस्ते क्लस्टर पद्धतीने राबविणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विकासाला गती मिळून शेतकरी व युवकांच्या हाताला काम मिळेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

---

## नगरपरिषद प्रशासन देवाला तरी घाबरेल काय ?: डॉ निरज वाघमारे

होम हवनातून देवांना घातले साकडे



**यवतमाळ :** नगर परिषदेमध्ये करोडो रुपयाची रोड व्हॅक्युम स्वीपर मशीन धुळ खात पडलेली आहे. नगरपरिषद प्रशासनाने या मशीनच्या माध्यमातून शहरातले रस्ते स्वच्छ व्हावेत या दृष्टीने वाहन खरेदी केले असले तरी आमचा प्रभाग स्वच्छ करण्यासाठी वारंवार मागणी करूनही वाहन उपलब्ध करून दिले जात नाही. नगरपरिषद प्रशासन कुंभकर्णी झोपेत असल्यामुळे हे बहुमूल्य वाहन इतर निरूपयोगी वाहनाच्या ताफ्यात धूळ खात पडलेले आहे. याचा कुठेही उपयोग होत नाही. भारतीय संविधानाच्या निर्देशानुसार ही नगरपरिषद काम करीत नसल्यामुळे आणि मनुवादी विचाराची सत्ता असल्यामुळे यवतमाळ नगर परिषदेचे गटनेता व नगरसेवक डॉ नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वात मनुवादी विचारसरणीला मान्य असलेली प्रतिकात्मक यज्ञ याग व पूजाअर्चा पुरोहिताच्या हस्ते करण्यात आली. किमान याला तरी नगरपरिषद प्रशासन भिक घालेल काय ? या उद्देशाने वंचित बहुजन आघाडीच्या वतीने त्या वाहनासमोर प्रतिकात्मक पूजाअर्चा व यज्ञ याग करून हनुमान जयंतीच्या निमित्ताने साकडे घालून नगर परिषदेची तक्रार हनुमानजीकडे करण्यात आली. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ.नीरज वाघमारे, महासचिव संजय इंगळे, शहराध्यक्ष प्रसन्नजीत भवरे, शहर महासचिव प्रमोद पाटील, नितेश पाटील, शैलेश भानवे, देवानंद लोणारे, केशव भागवत, गजानन कोकाटे, उत्तम कांबळे, रामदास वीर, अरविंद दिवे, केशव भागवत, संजय तेलतुंबडे, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी २ ते ८ एप्रिलदरम्यान 'महा–साधना सप्ताह'!

**यवतमाळ :** भारत सरकार, क्षमता विकास आयोग (उइउ) आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्र शासनाने साधना सप्ताह उपक्रम राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्यानंतर आता राज्यातही महा–साधना सप्ताह २ ते ८ एप्रिल या काळात आयोजित करण्यात आला आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत ८ लाख ८० हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी ७ दिवसांत किमान ४ तासांचे अभ्यासक्रम ळऋजढ कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत. यामुळे जवळपास ३५ लाखांहून अधिक वेळ अधिकारी आणि कर्मचारी ळऋजढ कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये राज्यातील ३६ जिल्हे, ३२ विभाग, आणि ६ विभागीय कार्यालये यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे असेल.

---

## चैत्र पौर्णिमेच्या यात्रेनिमित्त भाविकांचे हार्दिक स्वागत

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**पांढरकवडा :** तारापूर चैत्र पौर्णिमेनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या श्री हागोडबुआ देवस्थान, तारापूर येथील वार्षिक यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे तसेच भोई समाज बांधवांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात येत आहे. ही यात्रा दि. ३ एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

भोई समाज हा पारंपरिक व्यवसाय आणि समृद्ध संस्कृती जपणारा समाज म्हणून ओळखला जातो. विदर्भातील श्रद्धास्थान असलेल्या श्री हागोडबुआ देवस्थानाच्या यात्रेला दरवर्षी हजारो भाविक उपस्थित राहतात. पूर्वी ही यात्रा अत्यंत साध्या पद्धतीने भरत असे. त्या काळात यात्रेसाठी पायवाटा होत्या व बैलगाड्यांद्वारे भाविक येत असत. गावोगावी वास्तव्यास असलेले भोई समाज बांधव घट वाजत–गाजत यात्रेत सहभागी होत असत. ही जुनी परंपरा आजही जपली जात आहे.


ही यात्रा म्हणजे देवाच्या विवाह सोहळ्याचे प्रतीक असून, सर्व समाजातील भाविक या सोहळ्यात उत्साहाने सहभागी होतात. केवळ भोई समाजच नव्हे, तर परिसरातील इतर श्रद्धाळू देखील नदीकाठच्या या पवित्र स्थळी येऊन श्रद्धेने नतमस्तक होतात. पारंपरिक पद्धतीनुसार काही धार्मिक विधी, जसे बकरे व कोंबड्यांची बळी देणे, आजही पार पाडले जातात.

समाजातील विवाह सोहळे किंवा इतर धार्मिक कार्यक्रमांची सुरुवात श्री हागोडबुआ यांच्या आशीर्वादाने केली जाते. ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत टिकून राहावी, यासाठी नव्या पिढीला तिचे महत्त्व समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या यात्रेचे आयोजन श्री हागोडबुआ देवस्थान, तारापूर समितीच्या वतीने करण्यात आले असून अध्यक्ष कैलास नान्ने, उपाध्यक्ष लिंबाजी शिवरकर, सचिव प्रदीप भनारकर, कोषाध्यक्ष अमोल कार्लेकर तसेच सदस्य लक्ष्मण कारलुके, लक्ष्मण शिवरकर, रमेश शिवरकर, शेखर नान्हे, प्रकाश पारशिवे, गोपाल नान्हे, बंडू नान्हे, रुमेश शिवरकर, अर्जुन करलुके, संजय नान्हे, काशिनाथ पारशिवे, सुरेश कारलुके, चंदू कामतवार, गजानन शिवरकर आदी परिश्रम घेत आहेत. यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन परंपरेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

## परस्पर वाहन विकून फसवणूक



**यवतमाळ :** फिर्यादी व आरोपी या दोघांमध्ये वाहनासंदर्भातील करारनामा झाला. टाटा–२५१८ या १० चाकी वाहनाचे ४० हप्ते भरायचे होते. मात्र, अटींची पूर्तता न करता एमएच २४, जे ९८०८ हे वाहन विकून फिर्यादीचे फसवणूक केली. ही घटना २९ मार्च २०२५ ते २७ मार्च २०२६ च्या दरम्यान उमरखेड येथील महागाव रोडवरील जलीलखान गॅरेजवर घडली. मोहम्मद युनूस हुसेन (५७) रा. प्लॉट नं. ०४, रोहिली गल्ली सिटी, जि. संभाजीनगर असे फिर्यादीचे नाव आहे. तर अब्दुल रहीम परवेज अब्दुल गफ्फार (३५) रा. रचना ले–आऊट, पांढरकवडा असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी गुन्हे नोंदविले आहेत.

---

## हिवरी वनपरिक्षेत्रात 'मार्च समाप्तीची' मेजवानी!

■ जनमाध्यम प्रतिनिधी

**शोकाच्या पार्श्वभूमीवर स्नेहभोजनावर प्रश्नचिन्ह**

**यवतमाळ :** हिवरी वनपरिक्षेत्रात नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी घटने संपूर्ण वनविभाग हादरले होते. त्या घटनेला एक महिना ही उलटत नाही तर 'मार्च एण्डिंग'च्या निमित्ताने आयोजित स्नेहभोजन कार्यक्रम आयोजित करून अनेकांच्या दुःखांवर मीठ चोळल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.यामुळे वनवतुळांत तीव्र चर्चा रंगली आहे. मनपूर नियतक्षेत्रातील वनअग्नीत वनपाल विजय सिंगनजुडे यांचा झालेला मृत्यू अद्याप ताजा असतानाच हा कार्यक्रम झाल्याची बाब अनेकांच्या भावनांना ठेच देणारी ठरत आहे. ६ मार्च रोजी कक्ष क्र. ४९५ मध्ये लागलेल्या भीषण आगीवर नियंत्रण मिळिवताना वनपाल विजय सिंगनजुडे यांनी जीवाची पर्वा न करता प्रयत्न केले. मात्र आवश्यक साधनसामग्रीच्या अभावामुळे ते गंभीर जखमी झाले आणि उपचारादरम्यान १४ मार्च रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात आली होती.या घटनेनंतर काही दिवसांतच हिवरी वनपरिक्षेत्रात 'मार्च एण्डिंग'च्या निमित्ताने एका शासकीय निवासस्थानी कर्मचाऱ्यांसोबत स्नेहभोजन आयोजित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. शासकीय परिसरात अशा प्रकारचे आयोजन करण्यासाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. वन विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या मते, शोककाळात अशा प्रकारचा कार्यक्रम घेणे योग्य नसून, यामुळे विभागातील संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेषतः शहीद वनपालाच्या घटनेनंतर लगेचच हा प्रकार घडल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, याबाबत यवतमाळचे उपवनसंरक्षक धनंजय वायभासे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, शासकीय आवारात अशा प्रकारचे कार्यक्रम होत असतील तर तो गंभीर विषय असून, चौकशीअंती योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित प्रकरणाची माहिती घेण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.एकूणच, हिवरी वनपरिक्षेत्रातील या घटनेमुळे प्रशासनातील शिस्त, संवेदनशीलता आणि जबाबदारी या मुद्द्यांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

---

## रेतीतस्करीचा ट्रक पकडला

**यवतमाळ :** बाभूळगाव तालुक्यात रेतीतस्करांचा प्रचंड धुमाकूळ सुरू आहे. दरम्यान महसूल व पोलीस यंत्रणा चुटपूट कारवाया करीत आहेत. त्यातूनच २८ फेब्रुवारीला रात्री ९ वाजता तालुक्यातील मंगरूळ येथे एमएच ३६, एफ ३४६१ या क्रमांकाच्या रेती भरून जाणारा ट्रक ग्राम महसूल अधिकारी महिलेने पकडला. स्वाती सिमोन धुळे (४३) ग्राम महसूल अधिकारी, मंगरूळ, ता. बाभूळगाव रा. शिरभाते प्लॉट, बांगरनगर, यवतमाळ असे फिर्यादीचे नाव आहे. तर कार्तिक विनोद जाधव (४०) रा. गळव्ही, ता. बाभूळगाव असे गुन्हे दाखल झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी बाभूळगाव पोलिसांनी गुन्हे नोंदवून तपास चालविला आहे.

# राज्य सरकारच्या पवित्र पोर्टलमधील नियमांमध्ये बदल

## आठ हजार जागांवर शिक्षक भरती होणार

**अमरावती/का.प्र.**

राज्य सरकारने विविध सरकारी विभागांमधील पदांसाठी एका मोठ्या भरती मोहिमेची घोषणा केली आहे. शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा होत असताना, शिक्षण विभागातील ८,००० पदांसाठी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. ही भरती 'पवित्र' पोर्टलद्वारेही केली जाते आणि त्याच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत, त्यामुळे राज्यातील शिक्षक भरतीसाठी अर्ज करणाऱ्यांसाठी ही माहिती अत्यंत महत्त्वाची आहे.

शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी आहे. जिल्हा परिषदा आणि खाजगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांची अनेक रिक्त पदे लवकरच 'पवित्र' पोर्टलद्वारे भरली जाणार आहेत.शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंग देओल यांनी नुकत्याच झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत ही माहिती दिली. खाजगी शिक्षण संस्थांमधील रिक्त जागांची माहिती मागासलेल्या संस्थांना देण्यात यावी. वर्गखोली आणि विभागीय आयुक्तांच्या कार्यालयाकडून एक रोस्टर तयार करणे आवश्यक आहे. ही माहिती प्रमाणित झाल्यानंतरच पोर्टलद्वारे नेमणुकांना मंजुरी दिली जाईल.हे केवळ होली पोर्टलच्या माध्यमातूनच दिले जाईल आणि या पदांना भविष्यात शासकीय मान्यता दिली जाईल. भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

**महत्त्वाचे बदल; राज्याच्या पवित्र वेबसाइटमार्फत शिक्षक भरती**

भरती प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत, ज्यामध्ये उमेदवारांना जास्तीत जास्त ५० जागांसाठी त्यांची पसंती नोंदवणे बंधनकारक करणे, पात्रता आणि बुद्धिमत्ता चाचणीसाठी अर्ज करण्याच्या अंतिम तारखेनुसार उमेदवाराच्या वयाची गणना करणे, शिफारशीसाठी उमेदवाराचे पात्रता आणि बुद्धिमत्ता चाचणीचे गुण फक्त एकदाच वैध असणे बंधनकारक करणे आणि बनावट प्रमाणपत्रांची शक्यता दूर करणे यांचा समावेश आहे.

**कमाल ५० प्राथमिक क्रम**

जर एखाद्या उमेदवाराला निवड प्रक्रियेत पुन्हा सहभागी व्हायचे असेल, तर त्याला किंवा तिला नव्याने परीक्षा द्यावी लागेल. उमेदवार त्यांच्या पात्रतेनुसार, मुलाखतीसह आणि मुलाखतीशिवाय,या दोन्ही प्रकारच्या निवडीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व प्राथमिक रँकसाठी पात्र असतील. तथापि, उमेदवाराला त्यांच्या सोयीनुसार जास्तीत जास्त ५० प्राथमिक रँक नोंदवण्याची परवानगी असेल. पहिल्या ते पाचव्या प्रवर्गासाठी, इंग्रजी माध्यमातून सेमी-इंग्रजी विषयांची व्यावसायिक पात्रता पूर्ण करण्याची अट निश्चित करण्यात आली आहे. जर त्या सामाजिक प्रवर्गासाठी असे उमेदवार उपलब्ध नसतील, तर रिक्त पदांसाठी नवीन जाहिरात प्रसिद्ध केली जाईल. ज्या उमेदवारांनी इंग्रजी माध्यमातून पात्रता पूर्ण केलेली नाही, अशा उमेदवारांसह, केवळ तेच उमेदवार पात्र असतील ज्यांच्याकडे १२वी विज्ञान किंवा बीए, एमए इंग्रजी किंवा एमएससी पदवी आहे.

## जिल्ह्यात शिवभोजनाकरिता मिळाले अडीच कोटी

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात सध्या २४ ठिकाणांवरून शिवभोजनाची सुविधा दिली जात आहे. या शिवभोजनाचे तीन महिन्यांपासून रखडलेले अडीच कोटींचे अनुदान झाले आहे. त्यामुळे या योजनेला आणखी चालना मिळाली आहे.

जिल्ह्यात बेघर, गरीब व इतर ठिकाणी कामांवरील मजुरांकरिता शासनाकडून केवळ १० रुपयांत शिवभोजनाची योजना सुरू करण्यात आली. यापूर्वी जिल्ह्यात ३७ शिवभोजनाचे स्टॉल ठिकठिकाणी लावले जात होते. मात्र, कालांतराने यातील १३ स्टॉल बंद पडल्याने आता २४ स्टॉल सुरू आहे. यामध्ये अमरावती शहरात ९ तर ग्रामीण भागात १५ ठिकाणी केवळ १० रुपयांत शिवभोजन दिले जाते. मात्र, शासनाकडून शिवभोजन संचालकांना शहरी भागाकरिता प्रतिव्यक्ती ४० तर ग्रामीण भागाकरिता २५ रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र, गत तीन महिन्यांपासून शासनाकडून सदरचे अनुदान रखडले होते. अखेर मार्च एण्डिंगच्या तोंडावर अडीच कोटींचा निधी शिवभोजनाकरिता प्राप्त झाला आहे. त्यामुळे लवकरच शिवभोजन धारकांना सदरचा निधी वितरित केल्या जाणार आहे. या शिवभोजनात दोन पोळी, भाजी आणि भात दिले जाते.

सिलिंडर गॅसच्या तुटवड्याचाही या शिवभोजनावर परिणाम होत असून त्यांना सिलिंडर वापरण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी देखील होत आहे. त्यामुळे सिलिंडर गॅसअभावी आता शिवभोजन अडचणीत येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## तिवसा हद्दीत १० वर्षीय मुलावर अनैसर्गिक कृत्य

### आरोपीस अटक ; पोस्को ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल

**तिवसा/वार्ताहर**

पोलीस स्टेशन हद्दीतील एका ५३ वर्षीय आरोपीने इयत्ता चवथ्या वर्गात शिकणाऱ्या १० वर्षीय मुलावर वारंवार अनैसर्गिक कृत्य केले.माणुसकीला काळिमा फासणारी ही घटना उघडकीस येताच एकच खळबळ उडाली. आरोपीने केलेल्या कृत्यामुळे अख्खा तालुका हादरून गेला असून याप्रकरणी तिवसा पोलिसांनी आरोपीवर पोस्को कायद्या अंतर्गत विविध गुन्हे दाखल करून अटक केली आहे.

संजय काजळकर(वय ५३) असे आरोपीचे नाव आहे.तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत आरोपी राहत असून त्याच परिसरात पीडित १० वर्षीय मुलगा राहतो.पीडित बालकावर २० ते २७ मार्च दरम्यान दोनदा आरोपीने अनैसर्गिक कृत्य केले.२० मार्च रोजी आरोपी हा चक्कीवर जात असताना त्याने पीडित बालकास लाडीगोडीने सोबत घेतले व भाडयाच्या राहत्या खोलीत त्यावर अनैसर्गिक कृत्य केले.त्यानंतर २७ मार्च रोजी देखील सदर पीडित बालक हा खेळायला जात असताना पुन्हा एकदा आरोपीने त्यास सोबत नेऊन अनैसर्गिक कृत्य केले.

२० ते २७ मार्च च्या कालावधीत दोनदा पीडित १० वर्षीय मुलावर अनैसर्गिक कृत्य केल्याची बाब समोर येताच पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पीडित बालक व त्याचे फिर्यादी वडील यांना प्रकरणाबाबत विचारपूस केली असता ही बाब उघडकीस आली.आरोपीने केलेले कृत्य हे माणुसकीला काळिमा फासणारे असल्याने याप्रकरणी फिर्यादी पीडित बालकाच्या वडिलाच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून आरोपी संजय काजळकर यास तातडीने अटक करून त्यावर पोस्को ॲक्ट नुसार विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांच्या नेतृत्वात उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय, पीएसआय भागानगरे,महिला पोलीस अधिकारी विद्या कळसे,एपीआय तुळजेवार करीत आहे.

■ सदर प्रकरणी आम्हाला परिसरातून माहिती मिळाली, त्यानुसार आम्ही गुप्तता ठेवून याबाबत पुढाकार घेत पीडित व फिर्यादीशी संपर्क साधून गांभीर्याने तपास केला,याप्रकरणी आरोपीस तातडीने अटक केली,पोस्को ॲक्टनुसार गुन्हे दाखल केले.आज आरोपीला पोलीस कोठडीसाठी न्यायालयात हजर करणार असून पुढील तपास सुरू आहे.अश्या प्रकारची घटना आणखी कुठे घडली असेल तर त्यांनी पोलिसांना माहिती देऊन सहकार्य करावे.

**- गोपाल उपाध्याय**
पोलीस निरीक्षक, तिवसा

## भगवान महावीरांच्या शोभायात्रेने दुमदुमली नांदगाव खंडेश्वर नगरी

### इतर समाज बांधवांनी सहभागी होत दिला एकतेचा संदेश

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

संपूर्ण विश्वाला अहिंसेची शिकवण देणारे जैन धर्मियांचे २४ वे तिर्थंकर श्री १००८ भगवान महावीर स्वामी यांचा २६२५ वा जन्मकल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकल जैन समाज आयोजित या कार्यक्रमांमध्ये नांदगाव खंडेश्वर येथील श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर येथे सकाळी ७ वाजता भगवंताचा अभिषेक पार पडला. त्यानंतर शहरात भगवान महावीरांची शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये लहान मोठ्या सर्वांनी उत्साहात भगवान महावीरांचा जयघोष देऊन संपूर्ण नांदगाव खंडेश्वर नगरी दुमदुमून गेली होती.



शोभायात्रेत बँड, डिजे, भजनासह रथामध्ये भगवंताच्या फोटोंने शोभायात्रा भव्यदिव्य दिसत होती. जैन मंदिर, भगतसिंग चौक, सुभाष चौक, शिवाई चौक, बुधवारा चौक, आझाद चौक मार्ग क्रमण करीत शोभायात्रा जैन मंदिर येथे पोहचली. त्यानंतर मंदिरामध्ये सर्वांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच सायंकाळी ७ वाजता जैन स्थानक येथे सुमारे १ तास नमोकार महामंत्राचा जप करण्यात आला. त्यानंतर जैन मंदिर येथे भगवान महावीरांची महाआरती करित कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमांमध्ये सकल जैन समाजासह इतर समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

राम मेघे अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी

## 'डिपेक्स २०२६'राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत मिळवले दैदीप्यमान यश

**अमरावती/का.प्र.**

व्ही व्हाय डब्लू एस च्या प्रो. राम मेघे अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयाच्या बडनेरा येथील विद्यार्थ्यांनी या कालावधीत छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथील एम आय टी कॅम्पसमध्ये आयोजित 'डिपेक्स २०२६' या राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक कौशल्याची चुणूक दाखवून दिली आहे. जि पी एस आणि जी एस एम तंत्रज्ञानावर आधारित महिला सुरक्षा उपकरण' (वूमेन सेफ्टी डिव्हाईस बेस्ड ऑन जिपीएस आणि जीएसएम तंत्रज्ञान) असे शिर्षक असलेल्या या प्रकल्पाचे नेतृत्व तृतीय वर्ष विद्यार्थी आवेझ खा यांनी केले. त्यांना विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या द्वितीय वर्षातील अभय दुर्गे आणि कार्तिक पुरम यांनी सहकार्य केले. या प्रकल्प संघाला प्रा. वाय. पी. खडसे यांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद ए. बारहाते



यांनी या प्रकल्प संघातील विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पी. ठाकरे,डॉ. अमित व्ही. मोहोड यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.तसेच, व्ही व्हाय डब्लू एस चे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदयजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंहजी चौधरी आणि कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी,पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड व प्रा. गजाननजी काळे यांनीही या गुणवंत विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाचे कौतुक केले.

## कवी घनशाम सावरकर यांच्या 'बाप वाट पाही' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

### चैत्रपालवी कविसंमेलनात वऱ्हाडी कवितेची उधळण



**अंजनगाव सुर्जी /वार्ताहर**

तालुक्यातील कोकर्डा येथील मूळ रहिवासी आणि साहित्यात 'शब्दशाम' या नावाने परिचित असलेले कवी घनशाम सुधाकर सावरकर यांच्या 'बाप वाट पाही' या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच भुसावळ येथे मोठ्या थाटात पार पडला. त्यांचे आधी एक लळा कवितेचा हा कवितासंग्रह महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी प्रकाशित केला आहे. सोबतच त्यांची गुजरातच्या अभ्यासक्रमात कविता समाविष्ट झाली आहे. तसेच अनेक राज्यस्तरीय साहित्यिक आणि शैक्षणिक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. कोकर्डा गावच्या या सुपुत्राने जळगाव जिल्ह्यातही साहित्याची मोहोर उमटवल्याने संपूर्ण अमरावती जिल्ह्यात आणि तालुक्यात त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

भुसावळ येथील 'प्रतिष्ठा महिला मंडळ' आयोजित 'चैत्रपालवी' या भव्य बहुभाषिक कविसंमेलनात राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री नामदार संजयभाऊ सावकारे यांच्या शुभहस्ते आणि साहित्य क्षेत्रातील अनेक दिग्गजांच्या साक्षीने या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. या शानदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अंबरनाथचे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. किसन वराडे हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुषमा खानापूरकर आणि स्वागताध्यक्षा म्हणून मंडळाच्या अध्यक्षा रजनी सावकारे उपस्थित होत्या.कवी घनशाम सावरकर हे मूळचे कोकर्डा (जि. अमरावती) येथील शेतकरी कुटुंबातील असून सध्या ते जळगाव जिल्ह्यातील टहाकळी (ता. भुसावळ) येथे जि.प. शाळेत प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या संग्रहात शेतकरी बापाची पावसासाठीची तडफड आणि ग्रामीण कष्टकरी जीवन अतिशय प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. विशेष म्हणजे या पुस्तकाला अमरावतीचेच ज्येष्ठ समीक्षक डॉ. सतीश तराळ यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे.कविसंमेलनात कवी घनशाम सावरकर यांनी आपल्या 'बाप वाट पाही' या शीर्षक कवितेने शेतकरी बापाची वेदना मांडून श्रोत्यांना अंतर्मुख केले. तर लगेचच 'रोडगेयची पंगत' ही अस्सल वऱ्हाडी विनोदी कविता मंचावर सादर करून संपूर्ण सभागृहात हास्याचे फवारे उडवले. त्यांच्या या अस्सल वऱ्हाडी बाजाला आणि सादरीकरणाला खान्देशच्या रसिकांनी प्रचंड दाद दिली.सोहळ्याला भुसावळच्या उपनगराध्यक्षा शैलजा नारखेडे, प्रा. डॉ. रश्मीजी शर्मा, प्रा. संध्या महाजन आणि जयश्री काळवीट यांची प्रमुख उपस्थिती होती.

## कंत्राटी शिक्षकांच्या बेमुदत कामबंद आंदोलनाचा आज तिसरा दिवस

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने मेळघाट कंत्राटी शिक्षक कृती समितीच्या वतीने जि.प.समोर३० मार्चपासून सुरु असलेल्या बेमुदत कामबंद व धरणे आंदोलनास भेट देऊन जाहीर पाठींबा देण्यात आला.

३० मार्चपासून मेळघाट क्षेत्रात कार्यरत कंत्राटी शिक्षक आपल्या विविध न्याय मागण्याच्या संबंधाने जि.प.अमरावती समोर बेमुदत



कामबंद आंदोलन करीत आहेत. मेळघाटसारख्या अति दुग्रम भागात हे शिक्षक कंत्राटी म्हणुन मानधनावर काम करत आहे.त्यांनी सेवेत नियमित करण्याची रास्त मागणी केली आहे.त्यांच्या मागण्या तात्काळ मार्गी लागाव्या म्हणून जिल्हा परीषद यांनी शासनाकडे शिफारस करावी अशी भूमिका यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जि.अमरावती च्या वतीने मांडण्यात आली.यावेळी अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष) राजेश सावरकर (राज्य प्रसिद्धी प्रमुख) व शैलेंद्र स.दहातोंडे (जिल्हासरचिटणीस)उपस्थित होते.आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी दहा शिक्षक साखळी उपोषणात सहभागी झाले आहे.या मध्ये रितेश शिंद,अविनाश उदापुरे,सागर सुर्यवंशी, विशाल हगवणे,राहुल सोनार,मंगेश आठवले,सिमा बानो शाहा,प्रियंका चोपडे,सरिता राऊत,दिपक मेमणकर यांचा सहभाग आहे.आंदोलनाला अमरावती लोकसभा संघाचे खासदार बळवंत वानखडे,अखिल महाराष्ट्र संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कीरण पाटिल,संतेदू अभ्यंकर,समाज कल्याणचे ज्ञानबा कुंड,मंगेश खेरडे,दत्ता भेले,रविकीरण सदानशिव,मुरलिधर डहाने यांनी भेट देऊन आंदोलनाला पाठींबा दिला.

## ग्रामीणमध्ये १६०० परवानाधारकांकडून होणार केरोसीनचे वाटप

**अमरावती/का.प्र.**

देशात इंधनाची टंचाई बघता केरोसीनचा पर्याय देण्यात आला आहे. आता शासनाकडून प्राधान्य व अंत्योदय कार्डधारकांना केरोसीन वाटप केले जाणार आहे. याकरिता १५७१ किरकोळ परवानाधारक व ७० हॉकर्स अशा १६४१ परवानाधारकांकडून केरोसीनचे वाटप केले जाणार आहे.

जिल्ह्यात शासनाकडून केरोसीनचा पुरवठा बंद होता. काही वर्षांपूर्वी याकरिता अधिकृत परवानाधारकांकडून घरपोच केरोसीन दिले जात होते. मात्र, सध्याची इंधनाची उपलब्धता बघता आता ग्रामीण भागात केरोसीन देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. जिल्ह्यात १६५ किलोलिटर केरोसीनची गरज असताना शासनाकडून सध्या १०८ किलोलिटर केरोसीन मंजूर केले आहे. याचा पुरवठा अंत्योदय आणि प्राधान्य गटातील रेशनधारकांना केल्या जाणार असून यामध्ये आदिवासी, पारधी बेडे व बंजारा समाजाची वस्ती आदी ठिकाणी केरोसीन वाटपाला प्राधान्य देण्याचे निर्देश शासनाकडून देण्यात आले आहे. जिल्ह्यात केरोसीन साठ्याबाबत अद्याप कोणत्याच प्रकारचे नियोजन नसल्याने सद्यस्थितीत १५७१ किरकोळ विक्रेते व ७० हॉकर्स यांच्या माध्यमातून केरोसीन वाटपाचे नियोजन पुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. हा पुरवठा केवळ ग्रामीण भागात केल्या जाणार आहे. अमरावती शहरासह नगरपरिषद, नगरपंचायतीस्तरावर केरोसीन वाटप केले जाणार नसल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी दिली.



## संक्षिप्त

### नरसम्मा महाविद्यालयामध्ये पदवी वितरण



**अमरावती**-श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किरण नगर येथे पदवीवितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .राजेश चंदनपाट तर उद्घाटक म्हणून संजय तराळ, संचालक डॉट कॉम प्रायवेट लिमिटेड, अमरावती तसेच प्रमुख अतिथी म्हणून अमित देशमुख, संगाबाअवि सिनेट सदस्य या मान्यवरांची उपस्थिती होती. याप्रसंगी मंचावर संगाबाअवि व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. विद्या शर्मा, महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास समितीचे प्रमुख डॉ. दिनेश सातंगे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. चंद्रशेखर सावरकर, माजी विद्यार्थी समिती समन्वयक प्रा. डॉ. ए .यु. बाजपेयी, यांची उपस्थिती होती. पदवी वितरण सोहळ्यासाठी महाविद्यालयातील डीन म्हणून प्रा. डॉ. राजश्री काशीकर , कला शाखा, प्रा. निखील मोहोड, वाणिज्य शाखा , प्रा. नरेन्द्र जाठे विज्ञान शाखा व प्रा. डॉ. दिनेश निकाळजे (पदव्युत्तर) शाखा यांनी जबाबदारी सांभाळली .प्रास्ताविक प्रा. डॉ. पंकजा इंगळे व आभार प्रदर्शन प्रा डॉ. दिनेश सातंगे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजना मध्ये समिती सदस्य प्रा. कल्याणी मालघुरे प्रा. ममता पोहोकार, प्रा. कोमल गुप्ता,सुखदा देशपांडे,रक्षित खानिवाले व इतर सदस्यांनी महत्वपूर्ण भूमिका पार पाडली.


### गौरी धोटेचा सत्कार

**अमरावती**-येथील प्रवीण नगरची सुकन्या आणि जिद्दी कुस्तीगीर गौरी वसंत धोटे हिने सोलापूर येथे पार पडलेल्या वरिष्ठ महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत ७२ किलो वजन गटात कास्यपदक पटकावून अमरावती जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या देदीप्यमान यशाबद्दल ब्रह्मांडनायक सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने तिचा स्मृतिचिन्ह आणि वृक्ष देऊन गौरव करण्यात आला. यावेळी तिला स्मृतिचिन्ह आणि पर्यावरणाचा संदेश देणारे 'झाड' भेट देऊन सन्मानित करण्यात आले. खेळाडूंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही काळाची गरज असल्याचे भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. वैभव बनकर, उपाध्यक्ष मयूर डांगे, सचिव स्वप्नील तायडे, कोषाध्यक्ष राहुल मानकर, विश्वस्त निलेश राऊत, प्रशांत भड, रामदास राऊत, सागर तायडे, रामकृष्ण देशमूख, मंगेश कविटकर, सदस्य अंकित गाडगे, छोटू देशमूख, बंडू कथिलकर, सुभाष राऊत, नयन कथिलकर आदी उपस्थित होते.



### अमोल चौकडे यांना तिफण कृषी गौरव पुरस्कार

**चांदूर रेल्वे**-कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय व विशेष कार्य केल्याबद्दल तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिनस्त सहाय्यक कृषी अधिकारी पदावर कार्यरत असलेले अमोल ज्ञानेश्वर चौकडे यांना तिफण फाउंडेशन आणि सहाय्यक कृषि अधिकारी फेसबुक पेज यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय तिफण कृषी गौरव पुरस्कार २०२५ पुणे येथे प्रदान केला जाणार आहे. तिफण फाउंडेशनचे समन्वयक अनंत देशमुख यांनी अधिकृत पत्राद्वारे या पुरस्काराची घोषणा केली. कृषी विकासासाठी सातत्यपूर्वक व परिणामकारक कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला.दरवर्षी जिल्ह्यातील विशेष कार्य करणारे कर्मचारी व अधिकाऱ्यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे.त्यांच्या कार्यपद्धतीतील पारदर्शकता नियोजनबद्धता आणि शेतकरी हिताचा दृष्टिकोन यामुळे कृषी क्षेत्रात सकारात्मक परिवर्तन घडून आला आहे. यासर्व योगदानाची दखल घेऊन तिफण फाउंडेशनने कृषी गौरव पुरस्कार २०२५ चौकडे यांना जाहिर करण्यात आला. पुरस्काराचे हे पहिले वर्ष असून पुढील काळातही कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अधिकारी, कर्मचाऱ्यांना नियमितपणे सन्मानित करण्यात येईल अशी माहिती फाउंडेशनचे संस्थापक सुखदेव जमदाडे यांनी दिली.



# बेरोजगारी? नव्हे, व्यवस्थेची दिवाळखोरी !

**देशात आज सुमारे ४० टक्के पदवीधर तरुण बेरोजगार आहेत. त्यात २० ते २९ वर्षे वयोगटातील ६.३ कोटी पदवीधरांपैकी १.१ कोटी तरुणांना रोजगार नाही. अर्थव्यवस्थेच्या फुगीर आकड्यांना टाचणी लावणारी ही आकडेवारी नुकतीच अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या 'स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२६' अहवालातून समोर आली. या समस्येचे कारणे आणि ती सोडवण्यासाठीचे दिशादर्शन...**

काही गोष्टींची आपल्याला इतकी सवय होवून जाते की, त्या मोठ्या समस्या आहेत, त्यांचे गंभीर आणि दूरगामी परिणाम आहेत; पण त्या सोडविणे शक्य आहे, याची संवेदना आणि बुद्धीच हरवून जाते.याला 'सामान्यीकरण' किंवा इंग्रजीमध्ये 'नॉर्मलायझेशन' असे म्हणतात. उदाहरणार्थ भारतात प्रत्येक रिकाम्या आणि मोकळ्या जागेत कचऱ्याचे ढीग असणारच. लोकलमध्ये श्वास गुदमरेपर्यंत गर्दी असणारच इत्यादी.काोणत्याही समस्येपेक्षादेखील जास्त गंभीर गोष्ट असते, ती तिचे सामान्यीकरण.

तीच आता भारतात बेरोजगारीबाबत झाली आहे. विशेषतः पदवीधरांच्या बेरोजगारीबाबत.सध्या इराणवर अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यामुळे सुरू असलेल्या युद्धपरिणामांची चर्चा सुरू आहे. युद्धामुळे भारताची निर्यात-आयात तसेच देशातील इंधनाच्या किंमती यावर अत्यंत विपरित परिणाम होतील, हे तर स्पष्ट आहे. त्यामुळे एकूणच औद्योगिक क्षेत्रातील मंदीची शक्यता असल्याने बेरोजगारीदेखील वाढेल, असे या समस्येचे सामान्यीकरण केले जाण्याची शक्यता आहे.

परंतु, देशातील बेरोजगारीची समस्या ही तत्कालिक नाही, किंबहुना ती मुख्य समस्या नसून एका मोठ्या व्यवस्थात्मक अरिष्टाचे लक्षणमात्र आहे, हे समजावून घ्यावे लागेल.असे का आणि कसे ते पाहू. त्यासाठी प्रथम ही बेरोजगारी कशाला म्हणतात आणि ती आहे तरी किती हे समजले पाहिजे.इथे रोजगार याचा अर्थ, उत्पन्न मिळविण्याच्या अपेक्षेने पुरविलेली कोणतीही सेवा किंवा श्रम. त्यामध्ये नोकरी, व्यापार-उद्योगसंचालन, शेती इत्यादी सर्व प्रकारची कार्यें येतात. रिक्षावाल्यापासून ते सर्वोच्च व्यवस्थापकापर्यंत आणि पथारीवाल्यापासून ते मोठ्या उद्योगपतींपर्यंत सर्वांचा समावेश 'रोजगार असणारे' या सदरात होतो. बेरोजगार म्हणजे जे रोजगार शोधत आहेत, पण त्यांना तो काही विशिष्ट कालावधीपर्यंत मिळू शकत नाही, असे लोक. आता हा कालावधी किती समजला जातो, याची तांत्रिकता विस्तारभयास्तव बाजूस ठेवू. जर एखाद्याला रोजगार नसेल, आणि तो शोधतदेखील नसेल, तर त्याला बेरोजगार असे समजले जात नाही.

भारतामध्ये १५ ते ६५ हे काम करण्यायोग्य वय आहे. या वयातील संपूर्ण लोकसंख्येच्या संदर्भाने पाहिले, तर भारतात बेरोजगारीचे प्रमाण सुमारे ५.६ टक्के होते .(पीरिऑडिक लेबर फोर्स, सर्वे जून २०२५). मात्र त्याच वेळी १५ ते २९ या युवा वयोगटामध्ये १४ टक्के म्हणजे सुमारे ५ कोटी युवक बेरोजगार होते. हे आकडे अपवादात्मक नाहीत. वर्ष आणि महिना बदलला तरी या संख्येमध्ये फार तर अर्धा किंवा एक टक्क्याचा फरक पडू शकतो.

शिक्षणामुळे माणसाची रोजगारक्षमता वाढते, असे म्हणले जाते. जेवढे शिक्षण अधिक तेवढी बेरोजगारीची शक्यता कमी, असे वाटते. परंतु प्रत्यक्षात असे दिसते की, २० ते २९ वयोगटातील पदवीधरांचा विचार केला, तर त्यातील ४० टक्के पदवीधर बेरोजगार होते. या वयोगटातील एकूण बेरोजगार १०० समजले तर त्यातील ६७ टक्के बेरोजगार होते. (स्टेट ऑफ वर्किंग इन इंडिया २०२५ अहवाल- अझीम प्रेमजी विद्यापीठ ).सर्व आकडेवारीचा सारांश सांगायचा तर, युवा वयोगटात देशातील सुमारे २७ टक्के लोकसंख्या म्हणजेच ३७ कोटी लोक आहेत. भारतात विविध अहवालांनुसार सुमारे पाच कोटी युवा बेरोजगार आणि सुमारे १ कोटी १० लाख इतके पदवीधर बेराजगार २०२३ या वर्षात होते.

**समस्येचे बदलते गंभीर स्वरूप**

युवा वयोगटातील पदवीधरांमध्ये बेरोजगारांचे मोठे प्रमाण ही भारतातील गेली ४० वर्षे असणारी समस्या आहे, हे खरे. पण म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे अत्यंत धोकादायक आहे. कारण ती गेल्या काही वर्षांत संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या ही समस्या गंभीर स्वरूप धारण करते आहे. उदाहरणार्थ, १९८३ मध्ये एकूण युवा बेरोजगारांपैकी (२० ते २९ वयोगट), फक्त १३ टक्के बेरोजगार हे पदवीधर होते. तर तेच प्रमाण आज ६७ टक्के इतके झाले आहे. १९८३ मध्ये या बेरोजगार पदवीधरांपैकी बहुतेक पदवीधर हे समाजातील उच्च किंवा मध्यम उत्पन्नगटातील असल्याने ते पदवीनंतर त्यांना हवी असणारी संधी मिळेपर्यंत थांबू शकत होते, आता तसे नाही.

समाजातील तळाच्या स्तरापर्यंत उच्च शिक्षणाची संधी पोचल्यामुळे तेथून येणाऱ्या पदवीधरांची संख्या खूप वाढली आहे. शिवाय त्यावेळी पदवीपर्यंतचे शिक्षण हे सरकारी खर्चावर असल्याने स्वस्त होते. मात्र गेल्या २० वर्षांत माध्यमिक पासून उच्च शिक्षणापर्यंतच्या खासगीकरणामुळे शिक्षणावर गरीबांनादेखील कराव्या लागणाऱ्या खर्चामध्ये कित्येकपटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे जे गरीब पदवीपर्यंत पोचून शिक्षण घेतात. त्यांना तात्काळ रोजगाराची नितांत गरज असते. पण या बहुतेक खासगी शिक्षणसंस्थांचा दर्जा अत्यंत खालावला आहे. त्यामुळे, तसेच आर्थिक व्यवस्थात्मक कारणांमुळे पदवीनंतर ४ वर्षे थांबूनदेखील त्यांना रोजगार मिळू शकत नाही.सामाजिक-मानसिकदृष्ट्या विचार केला, तर ही बाब अत्यंत दुःखदायक नव्हे तर चिंताजनक ठरते.

आता हे लक्षात घ्यावे लागेल की, बेरोजगारीची समस्या ही केवळ काही व्यक्तींची 'आर्थिक' समस्या नाही, केवळ युवकांची तर नाहीच नाही. देशासाठी ती सार्वत्रिक अरिष्टाची आणि सामाजिक अधःपतनाची सुरुवात आहे. युवकांना अर्थहीनतकडे नेणारी कोंडी आहे. कारण माणसाचे नागरिकत्व आणि मनुष्यत्व ज्या दोन गोष्टींनी निश्चित होते, त्यातील पहिली आहे शिक्षण आणि दुसरी आहे, रोजगाराची संधी.

**ही तर आर्थिक दिवाळखोरी**

भारतासारख्या देशाच्या दृष्टीने विचार केला तर बेरोजगारीची समस्या इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि तीदेखील दीर्घकाळ असणे, याचा आपण देश म्हणून विचार केला, तर आपली सर्व व्यवस्था पूर्ण अपयशी ठरत असल्याचा निर्णायक पुरावाच आहे. बेरोजगारी ही आकाशातून पडलेली नैसर्गिक आपत्ती नाही.



विकास शिक्षण आणि रोजगार हे सर्व घटक एकत्र न आणू शकणाऱ्या शासनाची आणि आर्थिक सामाजिक व्यवस्थेची ती निर्मिती आहे. एका बाजूला किमान ७० टक्के लोकसंख्येच्या पिण्यायोग्य पाणी, अन्न वस्त्र निवारा, यादेखील गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. जगण्यायोग्य शहरे, गावे नाहीत. वने नामशेष होत आहेत. शहरात नद्यांची गटारे बनविली जात आहेत. तर ग्रामीण भागात त्या कोरड्या ठाक बनल्या आहेत. आरोग्य, शिक्षण इत्यादी किमान मानवी गरजांची पूर्तता होत नाही. मात्र दुसरीकडे सर्व जनतेच्या या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी नैसर्गिक साधनांची उपलब्धता आहे. तिसरीकडे या नैसर्गिक साधनांवर काम करण्यासाठी मनुष्यशक्ती उपलब्ध आहे. पण तरीदेखील यांची सांगड आपण घालू शकत नाही. हीच या देशाची मुख्य समस्या आहे.

**स्पर्धा परीक्षा-एक सामूहिक भानामती !**

स्पर्धा परीक्षा म्हणजे शेकडो तहानलेल्या लोकांसाठी एक पाण्याचे पिंप आणि चार ग्लास ठेवून, त्यांची मजा बघण्याचा प्रकार आहे. १० लाख परीक्षार्थींमधून १००० जणांची निवड, म्हणजे १००० युवक युवतींमधून एकजण निवडणार. ही स्पर्धा नव्हे, संघटितपणे केलेली चेष्टाच आहे. गावाकडचे हजारो युवक युवती आपापल्या घरातील दोन-तीन एकराची जमीन गहाण ठेवून, परंपरागत घरे विकून कसे तरी पोट भरून, क्लासेसच्या एक एक लाख रुपयांच्या फीज भरत आहेत. या स्पर्धा परीक्षांमध्ये ३-४ वर्षे घालत आहेत. कोणी प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण होऊन मुख्य परीक्षेतून परत आला, तर पुन्हा पायथ्यापासून सुरुवात करतो आहे. ९९९ जणांच्या पदरात अखेरीस काय? तर आपण अपात्र असल्याचा एक शिक्का. पाठीवर निराशेचे एक कुबड !! जे लपविता येत नाही आणि कशाचे आहे, हे उघडपणाने सांगतादेखील येत नाही.

ही परिस्थिती बदलण्यासाठी म्हणून काहींच्या मुठी वळतात खऱ्या, पण उंच आकाशापर्यंत आपले हात पोचत नाहीत, असे दिसले की, त्याच मुठींच्या मागची मनगटे चावत युवक-युवती निराश होऊन नशीबाला दोष देतात. किंवा द्वेषाचा कारखाना चालविणाऱ्या एखाद्या जाती-धर्माच्या संघटनेचे गिऱ्हाईक बनतात. फेसबुक सोशल मीडियावर जीव खाऊन, शिवीगाळ करून हिंसक लेखन करून आपल्या नैराश्याला वाट करून देतात.

**विकास-शिक्षण-कौशल्य-रोजगार यांचा तुटलेला सांधा**

देशातील सद्य परिस्थितीमध्ये मुख्य मुद्दा असा आहे की, शिक्षण, विकास आणि रोजगार या तीन प्रक्रियांचा कोणताही परस्पर समन्वयच घातला गेलेला नाही. त्यामुळे हे तीनही घटक आपापल्या दिशेने भटकत जात आहेत. सर्वात पहिले म्हणजे विकासाची तर जबाबदारीच सरकारने खासगी क्षेत्रावर टाकली आहे. देशाचे आर्थिक नियोजन ही संकल्पनाच हद्दपार केली आहे. दुसरीकडे शिक्षण ही जणू काही एखादी बाजारात खरेदी करायची आणि उपयोग करून घेण्याची कपड्यासारखी खासगी वस्तू असल्याचे सरकारने ठरविले आहे. याला अनुसरून तेथे नफा तत्त्वावर बाजारीकरणाचे राज्य आहे. भारतातील विकास-शिक्षण-रोजगार यांच्या आवश्यक अशा सांध्याचा काहीही विचार न करता अत्यंत नियोजनशून्य तऱ्हेने आणि आता तर खासगी शिक्षणसम्राटांच्या सोयीने शिक्षणाचे हे वस्त्र विणले जात आहे. त्यावर परिस्थितीचे पाणी पडताच त्याचे पायपुसणे झालेले आहे. शिवाय एकूण शिक्षणाचा दर्जा चांगला नाही. विश्वासार्हदेखील नाही. भारतातील अभियांत्रिकी महाविद्यालयतून जे अभियंते बाहेर पडत आहेत, त्यांच्यापैकी बहुतेक पदवीधरांना आवश्यक ते तांत्रिक व्यावसायिक शिक्षणच मिळालेले नसते, असे मत औद्योगिक व्यवस्थापनांकडून व्यक्त केले जात आहे.तिसरीकडे रोजगार मिळणे ही देखील युवक किंवा विद्यार्थ्यांची खासगी जबाबदारी (नशीब) असल्याचे समजले गेले आहे. त्यामुळे त्याबाबत सरकारची कोणतीही जबाबदारीच नाही, अशी अधिकृत धारणा झाली आहे.

**नव्या दृष्टिकोनाची गरज**

बेरोजगारीची समस्या ही सर्वांत मोठी मानवी, आर्थिक आणि राजकीय समस्या आहे. बेरोजगारी ही आपल्या न वापरलेल्या क्षमतांची बेरीज असून, तिचा सांधा आपले पर्यावरण, नैसर्गिक संसाधने आणि मानवी-सामाजिक गरजांशी घालणे हे आव्हान आहे, अशा दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे. असे पाहिले तर, समस्येचे रूपांतर क्षमतेमध्ये आणि निरुपायचे रूपांतर शक्यतेमध्ये झाल्याचे दिसून येईल. अशा दृष्टीने विचार करून देशाच्या संपूर्ण राजकीय अर्थव्यवस्थेचे जनकेंद्री पुनर्आखणी करावी लागेल. त्यासाठी सर्व परंपरागत पूर्वग्रह आणि संकुचित द्वेष-दंगे, भंपक दिखाऊ बनावट वादांच्या चिखलातून बाहेर पडून विचार करावा लागेल.

**-अजित अभ्यंकर**

# हनुमान जयंती की जन्मोत्सव?



चैत्री पौर्णिमेला हनुमान जयंती सर्वत्र उत्साहात साजरी केली जाते.हनुमंतरायांचा जन्म त्रेता युगात चित्रा नक्षत्रावर चैत्र पौर्णिमेला सकाळी ६:०३ वाजता झाला.भारतीय कालगणनेनुसार हनुमंतरायांच्या जन्माला साधारण एक कोटी पंच्याऐंशी लक्ष अठ्ठावन्न हजार एकशे तेरा वर्ष झाल्याचे मानले जाते.यंदा हनुमान जयंती गुरुवार २एप्रिल २०२६रोजी आहे.इतक्यात काही वर्षात दरवर्षीच हनुमान जयंती आली की हनुमान जयंती नाही तर हनुमान जन्मोत्सव म्हणा असे विचार माध्यमांवर येतात.त्यावर चर्विचर्वण होते.अनेक जण कुठलाही तार्किक विचार न करता सवयीप्रमाणे व्हॉट्सअप ,फेसबुकवर तो मुद्दा सर्वत्र बिनधास्त प्रसारित (फॉरवर्ड )करतात .त्यामुळे मुद्दे बिम्बविण्यात बऱ्याच अंशी सफलताहीं मिळते.

जयंती नव्हे जन्मोत्सव सांगणारे हा तर्क देतात की जयंती मृत व्यक्तिची किंवा मृत महापुरुषांची केली जाते.भगवान हनुमान हे चिरंजीव आहेत.त्यामुळे त्यांचा मृत्यू झालाच नाही.म्हणून हनुमंतरायाचा जन्मदिवस हा जयंती म्हणू नका तर जन्मोत्सव म्हणा.असे प्रतिपादन त्यांच्याकडून केले जाते.याउलट जन्मोत्सव हा केवळ शब्दच्छल असून हिंदू धर्मियांना संभ्रमात टाकण्याची कृती आहे.अनेको वर्षापासून अनेको देवदेवतांची जयंती साजरी केली जाते.त्यात चिरंजीव देवताही येतात. याशिवाय प्रत्येक जन्म उत्सवाची सांगता पारण्याने होत असते. जन्मोत्सवाचे पारणे योग्य वाटत नसुन पारणे जयंतीचेच संयुक्तिक वाटते.

म्हणून हा बुद्धिभेद आणि वृथा वाद असल्याने हनुमान जयंती च म्हणा असे एक मत आहे.

हिंदू धर्मात सप्त चिरंजीव मानले जातात.

**अश्वत्थामा,बलिर्व्यासो,**
**हनूमांश्च बिभीषणः।**
**कृपः परशुरामश्च ,**
**सप्तैते चिरजीविनः !!**

म्हणजे अश्वत्थामा, बळीराजा,महर्षि व्यास,भगवान हनुमान, बिभीषण, कृपाचार्य आणि भगवान परशुराम हे सात चिरंजीव आहेत. त्यांना मृत्यु आलेलाच नसल्यामुळे त्यांचे अस्तित्व आजही भुतलावर आहे. रामायणातही भगवान हनुमानाच्या मृत्यूचा कुठेच उल्लेख नाही उलट काही रामायणात हनुमंतराय सितामातेच्या शोधात अशोकवाटीकेत गेले असता आनंदीत होऊन सीतामातेने 'चिरंजीवी भव'हा आशिर्वाद दिल्याचे वर्णन आहे.भगवान हनुमान साक्षात रुद्राचे अवतार महारुद्र आहेत. सितामाईचा आशिर्वाद संधी समजून रामनाम प्रचारप्रसार करण्याचे ध्येय ठेऊन चिरंजीव हनुमानजी भूतलावर आजही कार्य करीत आहेत.अनेकांना याची अनुभूती रामनाम संकीर्तनात येते.म्हणूनच सर्व रामायण कथा,संकीर्तनात हनुमंतरायाचे विशेष आसन मांडले जाते.

खरंतर तो परब्रह्म परमात्मा गुणत्रयातीत ,अवस्थात्रयातीत ,देहत्रयातीत ,कालत्रयातीत आहे.हनुमंतादी ही सर्व त्या अरूपाची रुपे आहे.'नातुडे मुख्य परमात्मा म्हणोनी करावी लागे प्रतिमा'हे शाश्वत सत्य आहे.तार्किकच विचार करायचा असेल तर आपण भगवान गणेश जयंती, भगवान परशुराम जयंती, भगवान वेदव्यास जयंती,भगवान हनुमान जयंती साजरी करतो.जसे भगवान हनुमान चिरंजीव आहेत तसेच भगवान परशुराम आणि भगवान व्यासही चिरंजीव आहेत. पण अक्षय्य तृतीयेला जन्मोत्सव साजरा करतांना आपण 'परशुराम जयंती'म्हणूनच मोठ्या धुमधडाक्यात साजरी करतो. चिरंजीव म्हणून स्थान असलेले भगवान व्यास.गुरुपौर्णिमेला व्यास जयंती तर सर्वत्र श्रद्धायुक्त अंतःकरणाने साजरी होते.

भगवान गणेशाची जयंती आपण पत्रिका वाटून लोकोत्सव म्हणून साजरी करतो. भगवान गणेश तर साक्षात परब्रह्म स्वरूप जन्म मृत्यूच्या पलिकडले आहेत.याव्यतिरिक्त भगवान मार्कंडेय जयंती मोठ्या उत्साहात दक्षिणभारतात साजरी होते. ते मार्कंडेय देखिल चिरंजीव मानले जातात.या शिवाय कूर्म जयंती, वराह जयंती,नृसिंह जयंती ,वामन जयंती, मत्स्य जयंती, कल्की जयंती ,या देवता अवतारांची जयंती आपण साजरी करतोच.यातील कल्की अवताराचे प्रयोजन तर पुढे आहे.जे जन्मालाही आले नाहीत त्यांचीही जयंती साजरी केली जाते.

याशिवाय शनी जयंती,दत्त जयंती, कालभैरव जयंती ,नारद जयंती आपण साजरी करतो.ही सर्व त्या निर्गुण निराकाराची सगुण साकार रुपे आहेत.आपण रथ सप्तमी म्हणतो ती सूर्यजयंती किंवा अर्क जयंती म्हणूनच अनेक ठिकाणी साजरी होते.सुर्यनारायण भगवान तर प्रत्यक्ष नित्य दर्शन देणारी साकार देवता आहे.यासोबतच हिंदू धर्मात अनुसूया जयंती, सरस्वती जयंती, अन्नपूर्णा जयंती, गीताजयंती ,नर्मदा जयंती ,गायत्री जयंती ,लक्ष्मी जयंती ,गंगा जयंती ह्या जयंती हीं आपण साज-या करतोच.हे सर्व तर आजही साक्षात आहेत.या देवतांच्या जन्माच्या कथा आहेत पण त्यांच्या निर्वाण कथा नाहीत किंवा गंगा,नर्मदा यांच्या निर्वाण कथा कशा असतील.तरीही त्यांची जयंती भव्य प्रमाणात साजरी होतेच.यातील दोनचार नावे सोडले तर इतर सर्वच जयंत्या म्हणून प्रचलित आहेत.असो.

खरं तर सर्व देवता जन्ममृत्यूच्या पल्याड असून 'एकोहं बहुस्याम'परब्रह्म परमात्म्याची ती लिला आहे.माझ्या दृष्टीने जन्मोत्सव आणि जयंती दोन्हीही एकच. हनुमान जयंती म्हणा किंवा जन्मोत्सव पण महारूद्र मारुतीरायाची पुजा रोजच करा नसता निदान हनुमान जयंतीच्या दिवशी तरी श्रद्धेने पुजा नक्कीच करा.हनुमंतरायाची साधना महत्वाची व्यर्थ वाद दुय्यम आहे.अनेक अरिष्ट दूर करणारे ,संकटमोचक हनुमान आपल्या अर्चनेचा भाग असावा.जयंती,जन्मोत्सव हा वृथा वाद आहे.'कलौ कलहः प्रियः'म्हणजे कलियुगात वृथा वाद प्रिय वाटतो.माणसे पुजा कमी आणि वाद अधिक करतात.पण तो टाळून मतितार्थ महत्वाचा समजायला हवा .

थोडक्यात जयंती म्हणा की जन्मोत्सव.यात व्यर्थ वेळ घालविण्यापेक्षा आर्त भावाने त्या परमेश्वराची अर्चना महत्वाची.

कलियुगात हनुमंतरायाची मनोभावे प्रार्थना निश्चित फलदायी आहे.हे उघड प्रतिज्ञापत्र.जयंती म्हणा की जन्मोत्सव.दोन्हीचा अर्थ आणि फळ सारखेच!


**बुधा वदति जयंत्युत्सवः ,**
**मेधा वदति जन्मोत्सव !**
**जन्मदिन इत्येव अर्थंच ,**
**द्वयोरपि समं फलं !!**

चला तर व्यर्थ वाद टाळूया आणि महारुद्र हनुमान नित्यनेमाने पूजू या.आपले शरीर,मन ,मस्तिष्क आणि मनगट सुदृढ,सक्षम आणि समर्थ राहिले पाहिजे हा हनुमंतरायाचा आदर्श घेणे महत्त्वाचे ! हनुमान जयंती म्हणा नाहीतर हनुमान जन्मोत्सव म्हणा ! वृथा वाद कसले करता? तूर्तास इतकेच !

**विद्यावाचस्पती प्रा. दिलीप जोशी,** वाशीम.
मो.९८२२२६२७३५

## हनुमान चालीसा:जीवन सकारात्मक करणारा मंत्र

ऋषी-मुनींनी आणि संतांनी देवी-देवतांची स्तुती करण्यासाठी अनेक स्तोत्रे रचलेली आहेत. केवळ स्तुती करणे हा या स्तोत्रांचा उद्देश नसून, विशिष्ट लयीत आणि योग्य उच्चारांनी म्हटलेल्या स्तोत्रांमुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि मनःशांती मिळते.त्यांपैकीच एक म्हणजे संत श्री गोस्वामी तुलसीदास यांनी रचलेली श्री हनुमान चालीसा!




श्री हनुमान चालीसा अवधी भाषेत रचलेली आहे. 'चालीसा' म्हणजे चाळीस चौपद्या असलेली स्तुती! या प्रत्येक चौपदीत श्री हनुमानजींचे गुण, पराक्रम आणि भक्तीचे महत्त्व वर्णन केलेले आहे. दररोज हनुमान चालीसा पठण केल्याने मनाला शांती मिळते, भीती नष्ट होते आणि नकारात्मकता दूर होते. श्री हनुमान हे संकटमोचन आहेत;त्यामुळे संकटांचा सामना करण्याचे बळही या पठणातून मिळते.

श्री हनुमान चालीसेतील प्रत्येक ओळ आपल्यात धैर्य निर्माण करते आणि संयम बाळगायला शिकवते. 'सब पर राम तपस्वी राजा' आणि 'भूत पिशाच निकट नाही आवे'या ओळी मन सकारात्मक ठेवण्यास सहाय्य करतात.आजच्या धावपळीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात अंतर्मनाची शांती मिळवण्यासाठी भावपूर्ण आणि अर्थ समजून हनुमान चालीसेचे पठण दररोज करायला हवे. नियमित पठणामुळे मन स्थिर राहते, आत्मविश्वास वाढतो आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक होतो.येत्या श्री हनुमान जयंतीपासून दररोज हनुमान चालीसा पठण करण्याचा संकल्प करून आपले जीवन सकारात्मक बनवू या.

**डॉ.स्वाती देशमुख**

## आयुर्वेद ,अध्यात्म आणि हनुमंताचा आदर्श

आधुनिक विज्ञानयुगात आपण ॲलोपॅथीवर भर देतो, कारण त्याने आपल्याला तात्काळ बरे वाटते; पण आपल्या ऋषीमुनींनी सांगितलेले आयुर्वेद आपण विसरलेलो आहोत.आपल्याला आयुर्वेद व अध्यात्म दोन्हीही आत्मसात करण्याची गरज आहे.आपल्याला हनुमंतांनी संजीवनीच्या माध्यमातून आयुर्वेदाचे महत्त्व स्पष्ट करून सांगितले आहे. आत्ताची परिस्थिती पाहता, आपणही आवश्यक अशा आयुर्वेदिक वनस्पती घरी लावून त्याचा उपयोग करून घेऊ शकतो.उदा. अडुळसा, पुदिना, तुळस, कोरफड, गवती चहा , आलं, हळद यांसारख्या वनस्पती आपण सहज घरी लावू शकतो. या वनस्पती केवळ औषधी गुणांनी



समृद्ध नसून, आपले आरोग्य नैसर्गिक पद्धतीने टिकवून ठेवण्यास मदत करतात

रावणाशी युद्ध सुरू असताना मेघनादाने लक्ष्मणावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या हृदयावर बाण चालवला व लक्ष्मण मूर्छित झाले. रामचंद्र फार दुःखी झाले की, आता लक्ष्मणाला कोण वाचवेल?तेव्हा सुशेण वैद्य समोर आले व म्हणाले, 'रामा, चिंता करू नको. आपल्याकडे संजीवनी बूटी ही वनस्पती आहे; पण ती खूप दूर आहे. सूर्योदयाच्या आधी द्रोणागिरी पर्वतावर जाऊन ती आणली, तरच लक्ष्मणाचे प्राण वाचू शकतील'जवळच उभे असलेले हनुमान पुढे आले. ते प्रभू रामचंद्रांसमोर उभे राहून म्हणाले, 'प्रभू, मला आज्ञा द्यावी.' आज्ञा घेऊन 'जय श्रीराम' म्हणत ते द्रोणागिरी पर्वताकडे उड्डाण केले पर्वतावर अनेक दिव्य वनस्पती असल्यामुळे संजीवनी बूटी कोणती, हे हनुमंताला कळेना; तेव्हा त्यांनी संपूर्ण पर्वतच उचलून सुशेण वैद्यांकडे आणला. सुशेण वैद्यांनी संजीवनी बूटीचा लेप लक्ष्मणाला लावला व काही क्षणांतच लक्ष्मण उठून बसले.म्हणून येथे आयुर्वेदाचे महत्व अधोरेखित होते.

**रमा देशमुख**

## हनुमान भक्त समर्थ रामदास स्वामी यांची शिकवण

समर्थ रामदास स्वामी हे महाराष्ट्रातील थोर संत, समाजसुधारक आणि 'राष्ट्रसंत' म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या कार्यातून भक्ती आणि शक्तीचा अपूर्व संगम घडवून आणला. 'दासबोध' आणि 'मनाचे श्लोक' यांसारख्या साहित्यातून त्यांनी समाजाला व्यवहारज्ञान, नीतिमत्ता आणि मनःशांतीचा मार्ग दाखवला. 'आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थविवेका' असे सांगून त्यांनी संसाराकडे दुर्लक्ष न करता अध्यात्म साधण्याचा संदेश दिला. तरुणांना शारीरिकदृष्ट्या सुदृढ करण्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी हनुमानाची मंदिरे आणि व्यायामाच्या शाळा स्थापन केल्या, ज्यातून त्यांनी पारतंत्र्याच्या काळात स्वराज्य स्थापनेसाठी लागणारी 'बलोपासना' आणि 'संघटना' शिकवली.

आजच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या युगात समर्थांच्या विचारांची नितांत गरज आहे. आधुनिक काळात जेव्हा नैराश्य आणि मानसिक अस्थिरता वाढत आहे, तेव्हा त्यांचे 'मनाचे श्लोक' मानसिक नियंत्रणासाठी अत्यंत प्रभावी ठरतात. त्यांची 'प्रयत्नवादी' वृत्ती आजच्या स्पर्धात्मक जगात तरुणांना जिद्द आणि चिकाटी शिकवते. थोडक्यात, समर्थांचे विचार हे केवळ आध्यात्मिक नसून ते जीवन जगण्याची एक समृद्ध कला आहेत.

**आल्हाद माळगांवकर**

# पेव्हर ब्लॉक कामात 'गोडबंगाल' : शासनाच्या कोट्यवधींच्या निधीवर डल्ला ?

## पातुर तालुक्यातील धक्कादायक प्रकार; निकृष्ट कामे, टक्केवारीचा खेळ आणि दडपशाहीचे आरोप

**■ प्रतिनिधी | खेट्री ■**

पातुर पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या पेव्हर ब्लॉक कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता, भ्रष्टाचार आणि संगनमताचा 'गोडबंगाल' सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. शासनाकडून लाखो रुपयांचा निधी मंजूर होत असताना प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाची कामे करून उर्वरित रक्कम हडपण्याचा प्रकार सर्रास सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांमधून होत आहे.




अंदाजपत्रकानुसार दर्जेदार कामे होणे अपेक्षित असताना अभियंते आणि ठेकेदार यांच्या मिलीभगतीमुळे नियमांना हरताळ फासला जात असल्याचे दिसून येते. कमी खर्चात काम उरकून अधिक रकमेची देयके काढण्याचा 'फॉर्म्युला' राबविला जात असल्याने शासनालाच मोठा आर्थिक फटका बसत आहे.

पेव्हर ब्लॉक कामे ही कमी खर्चात आणि जलद पूर्ण होणारी असल्याने यामध्ये 'कमिशन' आणि 'टक्केवारी'चा खेळ मोठ्या प्रमाणात चालतो, अशी चर्चा ग्रामीण भागात उघडपणे होत आहे. मंजुरीपासून ते बिल मंजुरीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर टक्केवारी वाटली जात असल्याचा गंभीर आरोप होत आहे. दरम्यान, या प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे तक्रार करणाऱ्यांवरच दबाव टाकण्याचा प्रकार. संबंधितांविरोधात आवाज उठवणाऱ्यांना दडपण्याचा प्रयत्न होत असल्याने सर्वसामान्य नागरिक पुढे येण्यास घाबरत आहेत. परिणामी, भ्रष्टाचाराचे जाळे अधिकच घट्ट होत असल्याचे चित्र आहे.

३० मार्च रोजी या मुद्द्यावरून पातुर पंचायत समिती कार्यालयातच दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची घटना घडली. कामाच्या मंजुरी व अंमलबजावणीतील वाद इतका टोकाला गेला की, कार्यालयच 'आखाडा' बनल्याचे चित्र निर्माण झाले. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी केलेल्या पेव्हर ब्लॉक कामांची प्रत्यक्ष पाहणी केल्यास मोठ्या प्रमाणात गैरप्रकार उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी ब्लॉकची जाडी, दर्जा आणि बेस तयार करण्याचे निकष पूर्ण न केल्याची तक्रार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उच्चस्तरीय समिती गठीत करून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी, दोषींवर कडक कारवाई करावी आणि शासनाच्या निधीची लूट थांबवावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

**पंचायत समिती कार्यालय बनले 'आखाडा'!**

पेव्हर ब्लॉक कामांतील गैरप्रकारांवर आवाज उठवणाऱ्यांवर दडपशाही केली जात असल्याचा आरोप आहे. याच मुद्द्यावरून ३० मार्च रोजी पातुर पंचायत समिती कार्यालयात दोन गट आमनेसामने येत हाणामारी झाली. प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळेच अशा घटना घडत असल्याची टीका होत असून, तातडीने कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# मूर्तिजापूर बाजार समितीत 'माती'चा महाघोटाळा!

## १६०० पोत्यांत धान्याऐवजी माती; शेतकऱ्यांच्या धान्यावर दरोडा

**■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■**

कृषी उत्पन्न बाजार समिती, मूर्तिजापूर येथे तब्बल १६०० पोत्यांमध्ये धान्याऐवजी माती भरून ठेवण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने संपूर्ण तालुका हादरला आहे. शेतकऱ्यांच्या घामाच्या कष्टांवर माती टाकणारा हा संगनमताचा काळाबाजार असल्याचा आरोप होत असून, या प्रकरणामुळे बाजार समितीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



बाजार समितीत शेतकरी मोठ्या विश्वासाने आपले धान्य विक्रीसाठी आणतात. मात्र, त्या धान्याच्या जागी माती भरलेली पोती साठवली जात असल्याचा प्रकार समोर आल्याने शेतकऱ्यांचा विश्वासच डळमळीत झाला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार घडत असताना समितीचे सचिव आणि संचालक मंडळ नेमके काय करत होते, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकरणातील सर्वात मोठे कोडे म्हणजे मातीने भरलेली पोती बाजार समितीत आली कशी? कोणी ती आणून ठेवली? आणि त्या पोत्यांतील मूळ धान्य नेमके कुठे गायब झाले? या सर्व प्रश्नांची उत्तरे अद्याप अस्पष्ट असून, संपूर्ण व्यवहारात मोठ्या रॅकेटचा संशय व्यक्त केला जात आहे.

व्यवहाराच्या साखळीत शेतकरी, अडते, व्यापारी आणि समिती प्रशासन यांचा सहभाग असतो. त्यामुळे इतका मोठा घोटाळा कोणाच्या तरी संगनमताशिवाय होऊच शकत नाही, अशी चर्चा रंगत आहे. काही अडत्यांना याची कल्पना असूनही त्यांनी मौन का बाळगले, यावरही संशय व्यक्त होत आहे. या प्रकरणात सध्या केवळ एका आरोपीला अटक करण्यात आली असून, इतर संबंधित अद्याप फरार आहेत. त्यामुळे तपासाच्या गतीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. या महाघोटाळ्यामुळे संतप्त शेतकरी आणि नागरिकांकडून संपूर्ण प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि कठोर चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. दोषींवर कडक कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी एकमुखी मागणी होत आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून संपूर्ण यंत्रणा तपासण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

**सचिव-संचालकांवर संशयाचे सावट**

बाजार समितीत नियमित तपासणीची यंत्रणा असताना हा प्रकार उघडकीस येईपर्यंत कोणतीही कारवाई का झाली नाही? की जाणीवपूर्वक डोळेझाक करण्यात आली? सचिव आणि संचालक मंडळाच्या भूमिकेवरही आता बोट ठेवले जात आहे.

# पातूरचे तहसीलदार शेतकऱ्यांच्या बांधावर

## गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी; मदतीचे आश्वासन

**■ प्रतिनिधी | खेट्री ■**

पातूर तालुक्यात ३० मार्च रोजी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. उमरा, पांगरा, सस्ती आदी भागांमध्ये पिकांची नासधूस झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर पातूरचे तहसीलदार राहुल वानखेडे यांनी महसूल विभागाच्या पथकासह बाधित भागांना भेट देत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली.



तहसीलदार वानखेडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत परिस्थितीचा आढावा घेतला. पिकांचे झालेले नुकसान नोंदवून त्याचा सविस्तर अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्यात येणार असून, शासनाकडून तातडीने मदत मिळवण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, गेल्या चार ते पाच वर्षांपासून सततच्या अवकाळी पावसासह विविध नैसर्गिक संकटांचा फटका बसत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. बँका व सावकारांच्या कर्जफेडीचा ताण वाढलेला असतानाच पुन्हा गारपिटीने पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत व योग्य नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.

# कर्ता हनुमान मंडळाच्या शिवपूराण कथेची मिरवणूक

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

स्थानीय डाबकी रोड परिसरातील कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने सुरू असलेल्या शिवपुराण कथेची बुधवारी दाबकी रोड परिसरात भव्य दिंडी काढण्यात आली.अनेक भजनी मंडळे व महिला दिंड्या या मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या.यावेळी शिव पुराण ग्रंथाची पालखी सजविण्यात येऊन या पालखीची मिरवणूक परिसरात काढण्यात आली.ही पालकी गुरुदेव नगर,अर्बन कॉलनी,अक्षय इमारत,रानडे गल्ली,मल्हार हॉटेल चौक,प्रिया टॉवर,मेहरे बिल्डींग मार्गे जिजामाता चौक,संभाजी चौक मार्गे कर्ता हनुमान मंदिरात येऊन येथे या दिंडीचे पूजन व सामूहिक फुगडी व आरतीने समापन करण्यात आले.यावेळीं परिसरातील अनेक वस्त्यात महिलांनी ठीक- ठिकाणी रांगोळ्या काढून या पालखी दिंडीचे उस्फुर्त स्वागत केले.यावेळी दिंडीतील वारकऱ्यांचे अनेक महिलांच्या वतीने पादप्रक्षालन करण्यात येऊन प्रसाद वितरीत करण्यात आला. कार्यक्रमाचा प्रारंभ कर्ता हनुमान मंडळाचे अध्यक्ष सुभाषमामा म्हैसने यांच्या सपत्नीक पालकी पूजनाने करण्यात आला.या पालकी मिरवणुकीत हनुमान मंडळाचे अध्यक्ष सुभाष म्हैसने, माजी नगरसेविका सौ मंगला म्हैसने, विठ्ठलराव चिकटे, वसंत जायदे, शरद कोकाटे, विलास आगरकर, गजानन धरमकर, अनिल गावंडे, चंद्रकांत ताठे, प्रभाकर ठाकरे, संजय देशमुख, वसंत माळी, संजय वैद्य, संतोष जाधव, सचिन तायडे,संजय बहाळ, उजाडे,रमेश येरेकर, निखिल नहाटे, प्रल्हाद शेळके, महादेव खडसाडे,भागवत गिरी, राजू टेकाडे,शंकरराव देशमुख, लक्ष्मण मोरे, गजानन चिपडे आदी उपस्थित होते.

# सरपंचांचे 'प्रशासक' स्वप्न धुळीस मिळाले!

## हायकोर्टाचा झटका; पातूर तालुक्यात २३ ग्रामपंचायतींवर पुन्हा 'अधिकारी राज'

**■ प्रतिनिधी | खेट्री ■**

पातूर तालुक्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर सरपंचांनाच प्रशासक म्हणून बसवण्याचा शासनाचा निर्णय न्यायालयाने धडक निर्णय देत अक्षरशः उधळून लावला आहे. सरपंचांना प्रशासक करण्याच्या आदेशावर शिक्कामोर्तब होईल, या अपेक्षेवर पाणी फेरत न्यायालयाने तो आदेश थेट रद्द केला असून नव्याने प्रशासक नेमण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे तालुक्यातील तब्बल २३ ग्रामपंचायतींवर आता पुन्हा 'प्रशासक राज' येणार आहे.

शासनाने यापूर्वी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नेमण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयावर आक्षेप घेत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने शासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत सरपंचांना प्रशासक म्हणून नेमण्याचा निर्णय कायद्याच्या कसोटीवर टिकत नसल्याचे स्पष्ट केले. परिणामी, हा आदेश रद्दबातल ठरवत नव्याने प्रशासक नेमण्याचे आदेश देण्यात आले.

या निर्णयामुळे पातूर तालुक्यातील २३ सरपंचांचे 'प्रशासक' होण्याचे स्वप्न एका झटक्यात कोलमडले आहे. स्थानिक पातळीवर यामुळे मोठी राजकीय खळबळ उडाली असून अनेक ठिकाणी याचे पडसाद उमटत आहेत. काही सरपंचांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली असली तरी ग्रामस्थांमध्ये मात्र समाधानाची भावना दिसून येत आहे. दरम्यान, न्यायालयाच्या या आदेशाचे ग्रामस्थांनी स्वागत करत पारदर्शक कारभाराची अपेक्षा व्यक्त केली आहे. 'स्वतंत्र आणि निष्पक्ष प्रशासन मिळावे' हीच ग्रामस्थांची प्रमुख मागणी असून आता अधिकाऱ्यांच्या नियुक्तीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लवकरच संबंधित विभागाकडून प्रशासक म्हणून अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार असून तालुक्यातील कारभार पुन्हा प्रशासनाच्या हाती जाणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात गावपातळीवरील निर्णय प्रक्रियेत मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.


### जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क स्तर बाळापुर बालापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/६२/२०२६
सुधाकर मोतीराम डंडे वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : २२-०४-२०२६

**अर्जदार :** १. सुधाकर मोतीराम हंडे वय अं ७४ वर्ष धंदा शेती २. ज्योती संजय घाटोळ वय अं ४६ वर्ष धंदा घरकाम ३. दिपक सुधाकर हंडे वय अं ४३ वर्ष धंदा शेती सर्व रा. वाडेगांव ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत रुखमिना सुधाकर हंडे या दिनांक ०५.१२.२०२५ रोजी मौजे वाडेगांव ता.बाळापूर जि. अकोला येथे मरण पावल्या. वरील नमूद अर्जदार यांना मयत रुखमिना सुधाकर हंडे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २२.०४.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २४.०२.२०२६ रोजी माझे सहीने व कोटांच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३०२/२०२६ — प्रोसेस नं.३११०/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ — दिनांक : ०९/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रेखा कृष्णराव इंगळे २. ऋषिकेश कृष्णा इंगळे दोघेही रा. मु. गोपालखेड, पोस्ट गांधीग्राम, ता. जि. अकोला. ३. सौ. गायत्री शुभम पवार रा. कांचन लाँड्री जवळ, राहुल नगर, पोस्ट अमरावती कॅम्प, अमरावती. ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कृष्णा महादेव इंगळे
**पत्ता :-** रा. मु. गोपालखेड, पोस्ट गांधीग्राम, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कृष्णा महादेव इंगळे यांचे दि. २७/१०/२०२५ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४९०/२०२६ — प्रोसेस नं.४२२०/२०२६
चौ.ता. ०२/०५/२०२६ — दिनांक : २५/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती सुलभा दिनकर कुलकर्णी रा. मधुमालती अपार्टमेंट, मोहिते प्लॉट, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. प्रशांत दिनकर कुलकर्णी रा. जी- ५०४, श्रृंगार रेसिडेन्सी, नंदानी-२, व्ही.आय.पी. रोड वेसु, अभवा, सुरत, गुजरात. ३. श्रीकांत दिनकर कुलकर्णी रा. फ्लॅट नं. ५, पहिला मजला, बिल्डिंग नं. ए-६, उत्कर्ष नगर सोसायटी, गाडीतळ, हडपसर, पुणे. ४. शशीकांत दिनकर कुलकर्णी रा. फ्लॅट नं. ए ८०२, ८वा मजला, आर. के. स्पेक्ट्रा, पाटील नगर, बावधन, पाषाण पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिनकर रामकृष्ण कुलकर्णी
**पत्ता :-** रा.मधुमालती अपार्टमेंट, मोहिते प्लॉट, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिनकर रामकृष्ण कुलकर्णी यांचे दि. ०२/०३/२०२६ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र. ७२७/२०२६ — नेमता तारिख :- १३.०४.२०२६
चौकशी क्रमांक :- ०६/२०२६ कलम 50A(I) नुसार जाहिर नोटिस
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम 50A(I)
**न्यासाचे नाव :-** श्री. महाकाली मंदीर मोठी उमरी, अकोला.ए. १८६२

**अन्वये अर्जदार :-** १) श्री रविंद्र मधुकर नालट. २)श्री.धनंजय महादेव सोनटक्के ३) श्री. जितेश अजाबराव ढवळे ४) श्री. सुनील विनायक राठोड ५) श्री. रूपेश गणेश वासनकर ६) श्री. मयुर हिंम्मतराव नालट ७)श्री.विनोद गजाननराव नालट

**विरूध्द**

**गैरअर्जदार :-** १. श्री. मधुकर राजाराम नालट - मयत २. श्री. विनोद पुंडजित्रलक चोपडे- मयत

१) सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसदवारे कळविण्यात येते की, श्री. महाकाली मंदीर मोठी उमरी, अकोला.ए. १८६२ या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्य रितीने चालावा या द्रष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

२) हयाअर्थि या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजनेविषयी काही निवेदन/हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन/ हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देउन मुंबई सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज धर्मादाय उप आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा.

तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक -१२ / ०३ / २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४६५/२०२६ — प्रोसेस नं.४०५०/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ — दिनांक : २३/०३/२०२६

**अर्जदार :** १.१. राजू राजाराम खंडारे रा. भिम नगर, बोरगांव मंजू, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. श्रीमती जईबाई राजाराम खंडारे रा. भिम नगर, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. २. सुरेश राजाराम खंडारे रा. भिम नगर, वार्ड नं. २, बुलढाणा, ता. जि. बुलढाणा. ३. सतिष राजाराम खंडारे रा. भिम नगर, वार्ड नं. २, बुलढाणा, ता. जि. बुलढाणा. ४. सौ. सिमा समाधान वाकोडे रा. निसर्ग कॉलनी, पेठे नगर च्या मागे, संभाजी नगर, ता. जि. संभाजीनगर.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजाराम रामजी खंडारे
**पत्ता :-** रा. बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजाराम रामजी खंडारे यांचे दि. ०५/०६/२०१० रोजी राहते घरी बोरगाव मंजू, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११७/२०२६ — प्रोसेस नं.३४८/२०२६
चौ.ता. ०२/०५/२०२६ — दिनांक : ३०/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती देवकी सुखदेव होपाल वय ९० वर्षे, धंदा - घरकाम अर्जदार क्र. १ रा. कारला बु., ता. तेल्हारा, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. .१ चे पती मयत नामे सुखदेव तुकाराम होपाल हे दि. २३/१०/२०२२ रोजी मौजे कारला, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०२/०५/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४३२/२०२६ — प्रोसेस नं.३६४१/२०२६
चौ.ता. २९/०४/२०२६ — दिनांक : १६/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती अन्नपूर्णा प्रल्हाद धनवे २. सौ. लता संतोष वैराळे रा. छोटी उमरी, विठ्ठल फैल, उमरी प्र, अकोला, ता. जि. अकोला. ३. गोकुळ प्रल्हाद धनवे ४. सौ. मंदा अनिल शिखारे रा. विवेकानंद नगर, लाखाडा, वाशिम ता. जि. वाशिम. ५. सौ. उषा सचिन होरे रा. अग्रवाल प्लॉट, हनुमान नगर, लहान उमरी, उमरी प्र, जठारपेठ, अकोला, ता. जि. अकोला. ६. शाम प्रल्हाद धनवे क. १, २ व ६ रा. संत रोहीदास महाराज चौक, भौरद, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रल्हाद राहू धनवे
**पत्ता :-** रा. संत रोहीदास महाराज चौक, भौरद, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रल्हाद राहू धनवे यांचे दि. ०८/११/२०२५ रोजी भौरद, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२२५/२०२५ — प्रोसेस नं.४३०९/२०२६
चौ.ता. २९/०४/२०२६ — दिनांक : ३०/०३/२०२६

**अर्जदार :** १. पदमिनी राजेश काळे २. जय राजेश काळे ३. गौरी राजेश काळे सर्व रा. शिवाजी महाराज पुतळ्या समोर, खडकी. बु., पो. गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजेश संभाजीराव काळे
**पत्ता :-** रा. शिवाजी महाराज पुतळ्या समोर, खडकी. बु, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजेश संभाजीराव काळे यांचे दि. २०/०८/२०२० रोजी राहत्या घरी, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२१/२०२६ — प्रोसेस नं.३४०/२०२६
चौ.ता. ०४/०५/२०२६ — दिनांक : ३०/०३/२०२६

**अर्जदार :** १. कैलास शामलाल अग्रवाल वय ४६ वर्षे, धंदा-खाजगी व्यवसाय २. अनुराधा शामलाल अग्रवाल वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम ३. निता मनोज डागा वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम ४. टिना प्रविण भुतडा वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम अर्जदार क्र. १ व २ रा. वार्ड नं. ३, राम मंदिराजवळ, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क्र. ३ रा. प्रथमेश अपार्टमेंन्ट, दशहरा मैदानाजवळ, दुर्गा विहार, अमरावती, ता.जि. अमरावती. अर्जदार क्र. ४ रा. जैन मंदिर रोड, जुना घाटे शास्त्री वार्डा नं. २६, आर्वी, ता. आर्वी, जि. वर्धा (महाराष्ट्र)

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालय वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १,३ व ४ चे वडील व अर्जदार क्र. २ चे पती मयत नामे शामलाल रूपचंद अग्रवाल हे दि. २६/११/२०२१ रोजी मौजे हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मयत झालेले आहेत त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०४/०५/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ३०/०३/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा


जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ११९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# 'कॅच द रेन' स्पर्धेत आष्टीची तेजस्विनी ठरली तृतीय



**आष्टी/जनमाध्यम**
भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या 'कॅच द रेन' अभियानांतर्गत वर्धा जिल्ह्यात आयोजित चित्रकला स्पर्धेत आष्टी येथील हुतात्मा राष्ट्रीय विद्यालयाची विद्यार्थिनी तेजस्विनी सुरेश मडावी हिने तृतीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे विद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा आणि नायरा एनर्जी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने जलशक्ती अभियान २०२५-२६ अंतर्गत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. 'पाऊस जेव्हा आणि जिथे पडेल, तेव्हा तो साठवा' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये जलसंधारणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश होता.स्पर्धेतील बक्षीस वितरण समारंभ नुकताच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा येथे पार पडला. प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बिलखोडे, उपक्रम समन्वयक डॉ. उर्मिला हाडेकर, डॉ. सीमा पुसदकर, डॉ. सोनारे, डॉ. मडावी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत तेजस्विनीला प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.या स्पर्धेत 'वृक्ष लागवड व संवर्धन', 'जलसाक्षरता', 'पर्यावरण रक्षण' आणि 'पाणी प्रदूषण व आरोग्य' या विषयांवर विद्यार्थ्यांनी चित्रांद्वारे प्रभावी संदेश दिले. तेजस्विनीने आपल्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्राने परीक्षकांची मने जिंकत तृतीय क्रमांक मिळवला.तिच्या या यशाबद्दल हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष राहुलभाऊ ठाकरे, उपाध्यक्ष डॉ. किशोर गंजीवाले, सचिव विनायकरावजी होले, सहसचिव भरतभाऊ वणझारा, कोषाध्यक्ष शंकरराव नागपुरे, सदस्य राजाभाऊ सव्वालाखे व अर्पित मालपे यांनी अभिनंदन केले. तसेच मुख्याध्यापक पी. जी. नाकतोडे, शिक्षिका विना तांबस्कर, पर्यवेक्षक सुनील ईखार व शिक्षकवृंदांनी तिचे कौतुक केले.या स्पर्धेसाठी तिला कला शिक्षक संजय चाफले यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशामुळे आष्टी परिसरात तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# सोलरचा फायदा की धोका : ओल्या हाताने स्पर्श ठरू शकतो जीवघेणा



**साहूर/जनमाध्यम**
राज्य शासनाच्या 'मागेल त्याला सौर ऊर्जा कृषी पंप' योजनेमुळे ग्रामीण भागात सौर ऊर्जेचा वापर झपाट्याने वाढत असताना सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर अपघात होऊ शकतात, असा इशारा महावितरणतर्फे देण्यात आला आहे. विशेषतः सोलर प्रणाली सुरू असताना ओल्या हाताने किंवा खराब वायरला स्पर्श केल्यास करंट लागण्याचा धोका वाढतो, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

साहूर परिसरात महावितरणचे कनिष्ठ अभियंता विनोद नरड यांच्या मार्गदर्शनाखाली सौर ऊर्जा प्रकल्प मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहेत. सोलर पॅनलवर पडणाऱ्या सूर्यकिरणांमुळे दिवसा थेट विद्युत ऊर्जा निर्माण होते. ही ऊर्जा इन्व्हर्टरद्वारे वापरासाठी उपलब्ध केली जाते. त्यामुळे सोलर पॅनल कार्यरत असताना करंटचा धोका कायम असतो. अभियंता नरड यांनी दिलेल्या माहितीनुसार, सौर पॅनलवर धूळ किंवा कचरा साचल्यास त्याची कार्यक्षमता कमी होते. मात्र, पॅनल स्वच्छ करताना योग्य वेळ आणि पद्धत पाळणे अत्यंत आवश्यक आहे. दिवसा साफसफाई केल्यास करंट लागण्याची शक्यता असते. त्यामुळे पॅनलची स्वच्छता पहाटे किंवा सूर्यास्तानंतर करावी, असा सल्ला देण्यात आला आहे.तसेच, वायरिंगमध्ये दोष असल्यास किंवा केबल उघडी पडल्यास अपघाताचा धोका वाढतो. त्यामुळे वायरची नियमित तपासणी करून खराब भाग त्वरित बदलणे आवश्यक आहे. योग्य अर्थिंग नसल्यास सोलरच्या धातूच्या भागांमध्येही करंट येऊ शकतो. त्यामुळे अर्थिंगची खात्री करून घेणे गरजेचे आहे.ओल्या हाताने किंवा ओल्या जमिनीवर उभे राहून सोलर उपकरणांना स्पर्श करणे टाळावे. काम करताना रबरी हातमोज्यांचा वापर करावा. दोन सोलर पॅनल जोडल्याने निर्माण होणारे उच्च व्होल्टेज अधिक धोकादायक ठरू शकते, याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी.साहूर व परिसरातील शेतकरी आणि घरगुती सोलर ग्राहकांनी सोलर प्रणाली वापरताना सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# व्यावसायिकांना एलपीजी पुरवठा सुरू करा

## खा.अमर काळे यांची सरकारकडे मागणी

**वर्धा/जनमाध्यम**
देशात गॅस मुबलक अशी ग्वाही देणाऱ्या सरकारच्या दाव्याला प्रत्यक्षात फाटा देत राज्यात व्यावसायिकांना एलपीजी सिलेंडरचा पुरवठा बंद करण्यात आल्याने हॉटेल, खानावळी आणि कॅटरिंग व्यवसाय अक्षरशः कोलमडले आहेत. हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात आला असताना शासन मात्र गप्प बसल्याचा आरोप होत आहे.

२० मार्च २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकामुळे छोट्या-मोठ्या व्यावसायिकांवर गॅसचा घाला घालण्यात आला. परिणामी अनेकांनी व्यवसाय बंद करण्याची वेळ ओढवली आहे. कामगार, कारागीर यांचे रोजगार हिरावले गेले असून त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीचे संकट घोंगावत आहे.दरम्यान, या जळत्या प्रश्नाची अखेर खासदार अमर काळे यांनी दखल घेतली. व्यावसायिकांच्या डोळ्यातील अश्रू पाहून त्यांनी तात्काळ जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी संपर्क साधत परिस्थितीची माहिती घेतली. त्यानंतर अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना थेट पत्र पाठवून 'व्यावसायिकांना तात्काळ गॅस द्या अशी ठाम मागणी केली.परंतु, खासदारांच्या या आक्रमक भूमिकेनंतरही शासनाकडून कोणतीही हालचाल दिसून येत नाही. पेट्रोल पंपांवर रांगा, गॅस एजन्सीसमोर गर्दी या तिहेरी संकटात सर्वसामान्य नागरिक भरडला जात असताना मौन अधिकच खटकणारे ठरत आहे.

# दोन अल्पवयीन बहिणींचा बालविवाह थांबविण्यात यश

## महिला व बाल विकास विभाग व स्वयंसेवी संस्थेची सतर्कता

**वर्धा/जनमाध्यम**
सुकळी बाई येथे दोन अल्पवयीन बहिणींचा बाल विवाह होत असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास प्राप्त झाली होती. महिला व बालविकास कार्यालय तसेच स्वयंसेवी संस्थेच्या सतर्कतेमुळे हे बालविवाह थांबविण्यात आले आहे.

बालविवाहाची माहिती प्राप्त होताच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मनिषा कुरसंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सावंगी पोलिस स्टेशनच्या पोलिस निरिक्षकांना माहिती देण्यात आली. बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, सहाय्यक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी, अंगणवाडी सेविका यांनी बालिकेच्या जन्म नोंदणीचा तपास घेतला असता सदर बालिका १८ वर्षाच्या आत असल्याचे दिसून आले. हा बालविवाह हनुमान मंदिर देवस्थान, सुकळी बाई येथे सुरु असल्याची माहिती मिळाल्यामुळे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महेश कामडी यांनी पोलिस विभागाचे तत्काळ सहकार्य घेवून विवाहस्थळी भेट दिली.



यावेळी पोलिस उपनिरिक्षक युवराज राठोड यांच्या सहकार्याने आकोलीचे ग्रामपंचायत अधिकारी प्रविण आत्राम व सुकळी बाईचे योगेश घुगे तसेच चाईल्ड लाईनचे प्रकल्प समन्वयक आशिष मोडक, सुरज वानखेडे, माधुरी शंभरकर, जयश्री निवल, आकोली येथील रंजना गोमासे व सुकळी बाई येथील मीरा वरठी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर नम्रता खैरकार, पोलिस कर्मचारी शरद धोगडे, पोलिस पाटील देवराज करलूके, आकाश सोनुले, विलास भेंडे, ग्रामिण मुक्ती समस्या ट्रस्टचे प्रतिनिधी संतोष ढोणे, वैभव भांदकर, स्वराज मित्र संस्थेचे धनराज कोल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने सदर बालविवाह थांबविण्यात आला.ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मुलगा व मुलीचे आई वडील आणि इतर नातेवाईक यांना विवाहस्थळी मुलींचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्याशिवाय विवाह करणार नाही, असा जबाबनामा लिहून घेतला. यासोबतच मुलीचा विवाह १८ वर्षाच्या आत करण्याचा प्रयत्न केला तर बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, अशी ताकीद देण्यात आली.सदर बालिकेला ग्रामपंचायत अधिकारी यांच्या माध्यमातून बाल कल्याण समिती येथे सादर करण्याबाबत बालिकेच्या आई व वडीलांना सांगितले. गावामध्ये बाल विवाह होत असल्यास गावातील नागरीकांनी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, पोलिस विभाग यांना माहिती द्यावी असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मनिषा कुरसंगे यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### गळफास घेत दोघांची आत्महत्या

**वर्धा-**जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. पुलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुरदगाव (बेलसरे) येथे केशव देवराव भलावी (७५) यांनी घराजवळील गोठ्यात गळफास घेत आत्महत्या केली. ते दीर्घकाळ पोटाच्या आजाराने त्रस्त होते, अशी माहिती समोर आली आहे. दरम्यान, वडनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोंडुडा येथे सूरज हरिदास वरभे (३६) यांनी राहत्या घरी गळफास घेत जीवन संपवले. घटनास्थळी पोलिसांना एक चिठ्ठी आढळून आली. सूरज यांना दारूचे व्यसन व यकृताचा आजार असल्याची माहिती मिळाली आहे. दोन्ही प्रकरणांचा तपास पोलिस करीत आहेत.

### प्रतिबंधित तंबाखू, सिगारेट जप्त

**वर्धा-**भामटीपुरा येथील एका किराणा दुकानावर छापा टाकून पोलिसांनी प्रतिबंधित सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले. या कारवाईत सुमारे ६४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुप्त माहितीनुसार पोलिसांनी ही कारवाई केली.

### रेती तस्करांवर कारवाई; २२.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**देवळी-**येथील लक्ष्मी टाऊन परिसरात पोलिसांनी रेती तस्करीविरोधात धडक कारवाई करत २२ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गस्तीवर असताना पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार नाकेबंदी करून वाहनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान एका ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात रेती आढळून आली.
संबंधितांकडे वाहतुकीसाठी आवश्यक परवाना नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी ट्रक व इतर साहित्य जप्त केले. या प्रकरणी अमोल नारायण चौधरी, नितीन मधुकर येटरे तसेच ट्रक मालक कातिक लीलाधर देशमुख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू असून अशा प्रकारच्या बेकायदेशीर वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कारवाई सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# पवनूर येथे आजपासून चैत्र नवरात्र उत्सवाचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**
तालुक्यातील पवनूर (आंजी मोठी) येथील जागृत देवस्थान पाताल माता गडावर यंदाही चैत्र नवरात्र उत्सव व गळ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव २ एप्रिल ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे.



उत्सवाची सुरुवात २ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता वैशाख स्नान, अभिषेक, घटस्थापना व अखंड ज्योत प्रज्वलनाने होणार आहे. हा विधी पंडित अरुणराव वडनेरकर यांच्या हस्ते पार पडणार आहे. नवरात्र काळात दररोज रात्री ८ वाजता गोंधळ, जागरण व भजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.५ एप्रिल रोजी 'अंध कल्याण संघ, अमरावती' यांच्या वतीने 'सुरसंगीत सदाबहार भक्तीगीत' हा विशेष कार्यक्रम सादर केला जाणार आहे. ६ एप्रिल रोजी मंदिर व रथाची सजावट केली जाईल. ७ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता देवी भजन व सुगम संगीतानंतर भव्य शोभायात्रा व रथयात्रेला प्रारंभ होईल. सायंकाळी ५ वाजता घट विसर्जनाने उत्सवाची सांगता होणार आहे.उत्सवानिमित्त ७ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. हेडगेवार रक्तकेंद्र, नागपूर व श्री गुरुदेव आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, मोझरी यांच्या सहकार्याने हे शिबिर होणार आहे.या उत्सवाचे आयोजन समस्त ग्रामस्थ पवनूर यांच्या वतीने करण्यात आले असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# पळसगाव बाईत पक्ष्यांसाठी जीवनदायी जल-चारा क्रांती

**चानकी कोपरा/जनमाध्यम**
उन्हाळ्याच्या झळा अंगावर कोसळत असताना, तापमानाने चाळिशी पार केली असताना जिथे माणूसही सावलीच्या शोधात भटकतो, तिथे निःशब्द जीव असलेले पक्षी कसे तग धरत असतील याच वेदनेला स्पर्श करत पळसगाव बाई ग्रामपंचायतीने एक हृदयस्पर्शी आणि अनुकरणीय उपक्रमराबवला आहे. पक्ष्यांसाठी पाणी आणि चाऱ्याची जिवंत वव्यवस्था गावातील झाडांच्या फांद्यांवर मडक्यांचे छोटे छोटे जीवनकुंभ लटकले आहेत. कुठे पाण्याने भरलेले, तर कुठे धान्याने सजलेले या




मडक्यांमधून तहानलेल्या चिमण्या, कबुतरे, बुलबुल, मैना यांना नवजीवन मिळत आहे. उन्हाच्या दाहकतेत हा उपक्रम म्हणजे जणू निसर्गासाठी उभा केलेला जलमहोत्सवच!

ग्रामपंचायतीचे प्रशासक लवणे आणि ग्रामसेवक धीरज शिरभाते यांनी सांगितले. पक्ष्यांशिवाय पर्यावरण अपूर्ण आहे. त्यांचे रक्षण करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. या जाणिवेतूनच गावभर मडक्यांची साखळी उभी राहिली आहे.या उपक्रमाची खरी ताकद म्हणजे सर्वांचा सहभाग ग्रामपंचायत कर्मचारी, स्वयंसेवक, शिक्षक, विद्यार्थीष्ठ अगदी महिलांनीही आपल्या घरासमोर पाण्याची भांडी ठेवत या मोहिमेत हातभार लावला आहे.प्रशांत बुरले, फेसर शेख, महेंद्र भट, रोशन वाणी, रुपेश मून, योगेश देवतळे आणि मिशन समृद्धीच्या वैशाली गोल्हर यांनी मेहनतीने मडक्यांची निर्मिती केली,छिद्रे पाडून, दोऱ्यांनी बांधून, पक्ष्यांसाठी सुरक्षित आश्रय तयार केला.विशेष म्हणजे, नवरात्रातील अखंड ज्योतीची मडकी जपून ठेवून त्याचाच पुनर्वापर करण्यात आला, पर्यावरणपूरकतेचा सुंदर आदर्श आज गावात एक वेगळंच चित्र दिसत आहे,झाडांवर चिवचिवाट घुमतोय, पाण्यावर गर्दी होतेय, आणि माणूस-निसर्ग यांचं नातं पुन्हा जिवंत होत आहे.ज्येष्ठ नागरिकांच्या आठवणींना उजाळा मिळतोय पूर्वी अंगणात पाण्याची भांडी ठेवायचोष्ठ आता ग्रामपंचायतीने ती परंपरा पुन्हा जिवंत केली.ग्रामपंचायतीने या उपक्रमाचा विस्तार करण्याचा निर्धार केला असून प्रत्येक नागरिकाने आपल्या घराजवळ पक्ष्यांसाठी पाणी ठेवावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. पळसगाव बाईचा हा उपक्रम केवळ एक कृती नाही, ती संवेदनशीलतेची हाक आहा, हा संदेश आहे. निसर्ग वाचवायचा असेल, तर प्रत्येक जीवाशी नातं जोडावं लागेल.

# खडकीत रामजन्मोत्सव भक्तिभावात साजरा

**सेलू/जनमाध्यम**
तालुक्यातील खडकी येथील संकटमोचन हनुमान मंदिरात रामनवमी उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रामजन्मोत्सव सोहळ्याने परिसर भक्तिमय झाला होता.



सकाळी मंदिराचे पुजारी नरेश तिवारी महाराज यांच्या हस्ते प्रभू श्रीरामचंद्र यांच्या मूर्तीचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर मंदिराचे अध्यक्ष केसरीचंद खंगारे यांच्या हस्ते पूजा-अर्चा व आरती पार पडली. या वेळी उपस्थित भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने सहभाग नोंदविला.गुढीपाडव्यापासून सुरू असलेल्या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रामनवमीच्या दिवशी सकाळी ६.३० वाजल्यापासून राम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांच्या मूर्तींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. अंतरगाव येथील भजन मंडळाने सादर केलेल्या भजन कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.उत्सवानिमित्त आयोजित महाप्रसादाचा शेकडो भाविकांनी लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष केसरीचंद खंगारे, सचिव श्रीकृष्ण भंडारे, सरपंच राजेश लोणकर, संजय सोनटक्के, सुधाकर भंडारे, प्रेमदास परतेकी, छाया धुर्वे व सुनील नखाते यांनी परिश्रम घेतले.रामनवमीचे औचित्य साधून मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची गर्दी उसळली होती. देवस्थानतर्फे आयोजित महाप्रसादाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**पत्ता सार्वजनिक न्यास नोदणी कार्यालय वर्धा**
**राजेश नरहरझोट्टीवार यांची इमारत, दुसरा माळा,**
**हिरो शोरुमच्या मागे, मोहन नगर, नागपुर रोड, वर्धा**

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक ९३ । २६ कलम १९
**अर्जदार : वनिता विलास सुटे**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोदणी क्रमांक भिमाई बुध्द विहार समिती क्षिरसमुद्र ता. सेलु. जि वर्धा
सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की. धर्मादाय उपआयुक्त सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था
अधिनियम, १९५०चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निदीष्ठ केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकिची आहे काय?
(अ) जंगम मिळकत ५५००/- वनिता विलास सुटे यांच्याकडे जमा आहे
स्थावर मिळकत (वर्णन) निरंक
सदरच्या चौकशी प्रकणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसावे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व नोदणी अर्जाचा निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील
हि नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांचि शिक्यानिशी आज दिनांक २७.०३.२०२६ रोजी दिली
**अधिक्षक**
**(न्यास शाखा) सार्वजलिक न्यास नोदंणी कार्यालय. वर्धा विभाग वर्धा**

**पत्ता सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय वर्धा राजेश नरहरशेट्टीवार याची इमारत, दुसरा माळा, हिरो शोरुमध्या मागे, मोहन नगर, नागपुर रोड, वर्धा**

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज कमांक -७८/२६ कलम १९
**अर्जदार : श्री वृषभ जयदेव भिमटे**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोदंणी क्रमांक: श्रीकृष्ण दत्त मंदिर समिती लसनपूर ता. समुद्रपूर जि, वर्धा
सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त ।सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था
अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये स्वालील मुद्यावर चौकशी करणार आहेत
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तिवात आहे काय ? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दीष्ठ केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकिची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत ३५००/- सचिव यांच्याकडे जमा आहे
स्थावर मिळकत (वर्णन)-निरंक
सदरच्या चौकशी प्रकणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार जाही तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व जोदणी अजवि निकालाबाबत योग्य ते आदेश देते जातील
हि नोटीस माझे सहीनिशी व मा सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा यावे शिक्यानिशी आज दिनांक २५/०३/२०२६ नी दिली
**अधिक्षक**
**(न्याय शाखा) सार्वजनिक न्यास**
**नोदणी कार्यालय, वर्धा विभाग वर्धा**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.
ज्याअर्थी, श्री. निलेश धिरज मांगले, रा.पांजरा (बोथली) ता.आबा जि. वर्धा यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, पांजरा (बोथली) येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या जन्म-मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, जन्माचे पुरावे, शैक्षणिक पुरावे, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह सचिव तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, पांजरा (बोथली) ता. आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.
त्याअर्थी, श्री.निलेश धिरज मांगले, रा.पांजरा (बोथली) ता. आधी जि. वर्धा यांच्या विलंबाने जन्माच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
**(हरीश काळे)**
**तहसिलदार आर्वी**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १२५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**
**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# पाणीपट्टी वसुलीत उर्ध्व वर्धा प्रकल्प अव्वल

अमरावती/प्रतिनिधीः- पश्चिम विदर्भातील उर्ध्व वर्धा प्रकल्प सर्वात मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची निर्मिती सिंचन क्षमता ही ८५,००२ हेक्टर, तर जलासाठा ५६४.०५ दलघमी आहे. या प्रकल्पातून अमरावती व वर्धा तालुक्यामध्ये कालव्याद्वारे सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते. या प्रकल्पाने पाणीपट्टी वसुलीत अव्वल स्थान पटकाविले आहे.

सन २०२५-२६ या वर्षा करीता सिंचनासाठी २.१६४ कोटी रुपये वसुली करण्याचे उद्दिष्ट विभागाला देण्यात आले होते. सन २०१६ मध्ये उर्ध्व वर्धा प्रकल्प विभागाचे रुपांतरण सिंचन पाटबंधारे विभागामध्ये करण्यात आले. कामाचे नियोजन व सातत्याने करण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे थकित लाभधारकांना पाणीपट्टी भरण्यासाठी केलेल्या आवाहनामुळे या विभागाने सुमारे ०.७६ कोटी रुपये वसुली केली आहे.

तसेच या प्रकल्पामधून बिगर सिंचनासाठी पाणी उचल करणाऱ्या सर्व यंत्रणांना मार्च २०२६ पुर्वी थकबाकीचा भरणा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. बिगर सिंचनासाठी ४० कोटी उद्दिष्टांपैकी ५०.७५ कोटी रुपयांची विक्रमी वसुली झाल्याची माहिती कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत यांनी दिली. सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी मिळून सुमारे ५१.५१ कोटी रुपये सर्वाधिक वसुलीच्या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे. इतिहासामध्ये प्रथमच मोठ्या प्रमाणात सिंचन पाणीपट्टी वसुली झाली आहे.

उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिक्षक अभियंता मनिष राजभोज यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. यामुळे १२२.१७ टक्के उद्दिष्ट गाठले आहे. सर्व वसुलीच्या मोहीमेमध्ये बिगर सिंचन पाणीपट्टी वसुलीचे योगदान महत्वाचे आहे. या मोहीमेत सहभागी सर्व उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, कालवा निरिक्षक, मोजणीदार, दप्तर कारकुन व तसेच सर्व क्षेत्रीय तथा विभागीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

## कॉंग्रेस सरचिटणीस एड.दिलीप एडतकर यांचा राजीनामा

अमरावती/प्रतिनिधीः- कॉंग्रेस चे सरचिटणीस एड. दिलीप एडतकर यांनी कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना ईमेल पाठवून राजीनामा दिला आहे. त्यांनी अचानक दिलेल्या राजीनाम्यामुळे चर्चांना उधाण आले आहे. वरिष्ठांना दिलेल्या ई-मेलमध्ये त्यांनी सांगितले की आतापर्यंत ते निष्ठेने पक्षासोबत जुडलेले होते. मागितले नसताना पार्टीने त्यांना सरचिटणीस पदाची जबाबदारी दिली त्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. मी इमाने इतबारे जबाबदारी पार पाडली आहे. यापुढे प्रदेश कॉंग्रेस सरचिटणीस या नाममात्र पदाला



चिटकून राहणे मला शक्य नाही. सबब प्रदेश सरचिटणीस पदाचा राजीनामा स्वीकारावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे. राजीनामाचा ई-मेल त्यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, माजी मंत्री यशोमती ठाकूर, डॉ.सुनील देशमुख यांना सुद्धा पाठविला आहे.

## जाहीरनामा

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार **अवधुत देवमन पर्वतकर,** रा.उमरी ईतबारपूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती यांनी मौजा ईटकी, ता.दर्यापूर येथील गट क्र. ३०६, क्षेत्र ०.४१ हे.आर, पो.ख.०.०२ हे.आर. या शेतजमिनीच्या गाव नमुना ७ च्या इतर अधिकारातील स.प.बाज्या सोना याने गणपत नंदी याजपासून स.नं.९९/४ हा सन ५१-५२ सालाने वाहिल्यामुळे त्यांचा शेतावर सन ५५-५६ सालापर्यंत वाहण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. ही नोंद कमी करणेबाबत विनंती अर्ज कार्यालयात सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरुन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे, मौजा ईटकी, ता.दर्यापूर येथील गट क्र.३०६, क्षेत्र ०.४१ हे.आर, पो.ख.०.०२ हे.आर या शेतजमिनीच्या गाव नमुना ७ च्या इतर अधिकारातील स.प.बाज्या सोना याने गणपत नंदी याजपासून स.नं.९९/४ हा सन ५१-५२ सालाने वाहिल्यामुळे त्यांचा शेतावर सन ५५-५६ सालापर्यंत वाहण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. ही नोंद कमी करणेबाबत जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास अथवा प्रकरणात काही म्हणावयाचे असेल तर त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणणे सादर करावे. अन्यथा ०७ दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच प्रकरणात कोणालाही काही म्हणावयाचे नाही असे गृहित धरुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल.

स्वाक्षरी/-
तहसीलदार, दर्यापूर

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्याची भरारी

### -१ हजाराहून अधिक प्रकरणांना मंजुरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्याने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या कामगिरीमुळे राज्याच्या प्रगती अहवालात जिल्ह्याचा ठसा उमटला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने १ हजार ५५ प्रकरणांना मंजुरी देऊन जळगाव, कोल्हापूर, नाशिक आणि सांगली यासारख्या जिल्ह्याच्या पंगतीत स्थान मिळविले आहे.

जिल्ह्यात योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. यात एकूण ४ हजार १८४ अर्ज प्राप्त झाले. अर्जाची छाननी करून ३,६९१ प्रकरणे बँकेकडे कर्ज मंजुरीसाठी पाठविण्यात आली. यातील १ हजार ५५ प्रकरणे मंजूर करण्यात आली. ग्रामीण आणि शहरी प्रगतीमध्ये क्षेत्रनिहाय प्रगतीचा विचार करता, ग्रामीण भागातून ६६९ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे, तर शहरी भागातील ३८६ तरुणांना योजनेचा लाभ मिळाला आहे. ग्रामीण भागात अधिक प्रकरणे मंजूर झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती मिळत आहे.योजना राबविताना महत्त्वाच्या पैलूवर जिल्हा प्रशासनाने लक्ष केंद्रीत केले. प्रामुख्याने महिला सक्षमीकरणात महिला उद्योजकांवर विशेष भर देण्यात आला. यासाठी एकूण ६३३ महिलांची प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. यातून महिला आणि ग्रामीण युवकांना प्राधान्य देण्यात आले. एक जिल्हा एक उत्पादन उपक्रमात कापड उद्योग क्षेत्रातील ३०६ प्रकरणांना मंजुरी मिळाली आहे.मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात अधिकाधिक कर्जप्रकरणे मंजूर व्हावीत, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रयत्न केले. यात दर महिन्याला बँक व्यवस्थापकांची बैठक घेऊन कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच कर्ज प्रकरणे मंजूर करणाऱ्या बँकांच्या शाखेला भेट देऊन प्रक्रियेविषयी माहिती घेतली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्थानिक उद्योगांना चालना देणे, स्वयंरोजगार निर्मिती, बँकांमार्फत सुलभ कर्ज प्रक्रिया आणि विशेषतः युवक व महिलांना प्राधान्य देणे या चतुःसूत्रीवर भर देण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती

## निविदा सूचना

**(e-mail: amravati.ee@mahapwd.gov.in)**

**प्रेस नोटीस पृ.क्र. ३१६३/ निली / २०२५-२०२६ / दिनांक २७.०३.२०२६**

कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, अमरावती, हे खालील कामाच्या मोहोरबंद निविदा **ब-१** प्रपत्रामध्ये महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन मागवित आहे. निविदा विषयी तपशिल **www.mahapwd.com** पोर्टलवर **Pay PWD Online** सबपोर्टलवर पहावयास मिळेल व **e-Payment Gateway** निविदा शुल्क भरुन कोरी निविदा प्रपत्र डाऊनलोड करावी. **www.mahapwd.com** या पोर्टलवरुन निविदा खरेदी केल्यानंतर खरेदी केल्याची पावती सह लिफ़ाफ़ा क्र. १ मध्ये निविदेत नमुद केलेले दस्तावेज सादर करणे बंधनकारक राहील. व कोरे निविदा प्रपत्र **Online** खरेदी केल्यावर निविदा प्रपत्राच्या प्रती काढुन **(Tender Print Out)** व्यवस्थीत बाईंडींग करुन व निविदा प्रपत्रात आवश्यक त्या ठीकाणी देकार भरुन स्वतःची व साक्षीदाराची स्वाक्षरी करुन निविदेत नमुद केल्या प्रमाणे सिलबंद लिफ़ाफ़ा क्र.२ मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | नवसारी प्रभागातील पंजाबराव देशमुख कॉलनीतील योगेश पिठे यांच्या मागील नालीचे बांधकाम करणे. | ८.३६ |
| २ | प्रभाग क्र. ११ हमालपुरा शिक्षक बँकेमागील नालीचे बांधकाम करणे. | ८.३६ |
| ३ | प्रभाग क्र. १७ मधील सिद्धेश्वर हाऊसिंग सोसायटी येथील रस्त्याचे बांधकाम करणे. | ८.३६ |
| ४ | प्रभाग क्र. १७ अंतर्गत गोविंद शांती विहार येथे कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. | ८.३६ |
| ५ | प्रभाग क्र.३ प्रभागातील संत गुलाबबाबा कॉलनी येथील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ८.३६ |
| ६ | नवसारी प्रभागातील मोहन नगर येथील देशमुख ते रीग रोड पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ८.३६ |
| ७ | प्रभाग क्र.३ नवसारी श्री. साईबाबा मंदिर जलपुर्ती कॉलनी विद्युत नगर येथे ओटा व शेड बांधकाम करणे. | ८.३६ |
| ८ | प्रभाग क्र.३ नवसारी राजमंगल कॉलनी येथे गार्डनचे सौंदर्याकरण व विविध ठिकाणी लोखंडी बेंचेस बसविणे. | ५.७६ |
| ९. | प्रभाग क्र.३ नवसारी एकविरा विद्युत कॉलनी मधील पाजनकर ते वाकोडे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ८.३६ |

**हया निविदा बाबत तपशिल येणे प्रमाणे आहे.**

**कोरे निविदा प्रपत्र डाऊनलोड करण्याचा कालावधी**

दिनांक - ०२/०४/२०२६ पासुन ०९/०४/२०२६ वेळ २३.०० वाजेपर्यंत.

**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ**

दिनांक - १३/०४/२०२६ पुवी / त्यादीवशी १७.०० वाजता पर्यंत का. अ.सां.बां. विभाग अमरावती, कार्यालयात.

**अटी व शती :-**

**१) खालील कारणांमुळे आपली निविदा रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवले आहे.**

१) निविदा प्रपत्राची सुस्पष्ट न दिसणारी प्रत २) अपुर्ण निविदा प्रपत्र (पान कमी असलेले) ३) निविदा प्रपत्रामध्ये कंत्राटदारांकडुन छापील मजकुरा मध्ये खोडतोड व बदल करणे. ४) निविदे सोबत जोडण्यात येणारे आवश्यक कागदपत्र राजपत्रीत अधिका-याकडुन साक्षांकीत न केलेले कागदपत्र व अपुर्ण कागदपत्रे ५) निविदा खरेदी केल्यानंतर खरेदी केल्याची पावती निविदे सोबत सादर न करणे. ६) निविदेच्या लिफ़ाफ़्यावर कामाचे संपुर्ण नाव व कंत्राटदाराचे संपुर्ण नांव व पत्त्यासहीत व स्वाक्षरी न केलेले लिफ़ाफ़े, इत्यादी. (टिपः स्टॅपल केलेले लिफ़ाफ़े स्विकारण्यात येणार नाही व सिलबंद निविदा सादर करणे करीता लिफ़ाफ़े विभागामार्फ़त पुरविण्यात येणार नाही.)

२) निविदा विषयक सर्व साक्षांकीत कागदपत्रे लिफ़ाफ़ा क्र. १ मध्ये सादर करावे व लिफ़ाफ़ा क्र.२ मध्ये देकाराची ब-१ निविदा प्रपत्र सादर करावी.

३) कोणतेही कारणास्तव काम रद्य झाल्यास त्या कामाची कोरे निविदा प्रपत्राची रक्कम परत केल्या जाणार नाही. किंवा इतर कामावर वळती करता येणार नाही.

**वि.मा.का/अम./जाहि./२ .... २०२५-२०२६**

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती,**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. २३९/२०२६ ने.ता.२९.०४.२०२६

**अर्जदार -** १. श्रीमती सुनिता रामकृष्ण गोलाईत
वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे पती **नामे रामकृष्ण नारायणराव गोलाईत** हे दि.**०३.१०.२०२५** रोजी **अंबाडा**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. अर्जदार ही मयताची एकमेव कायदेशीर वारस आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ३०.०३.२०२६ शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५

## तहसिलदार चांदूर बाजार यांचे कार्यालय

**क्र. प्रस्तु-१/अ.का./जाहीर नोटीस प्रसिध्द/कावि-६१३/२०२५ दि.१८.०७.२०२५**

## जाहीर नोटीस

ज्याअर्थी या महसुल न्यायालयात रा.मा.क्र./ /५९(२९)/ कोंडवर्धा/२०२४-२५ प्रकरणात अर्जदार **श्री.महादेवराव शामरावजी बोबडे व ईतर-०६,** रा.कोंडवर्धा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे शेत मौजा कोंडवर्धा सर्व्हे नं.१२०, क्षेत्र १.२९ हे.आर., आकार ६..७५ रु.पैसे या शेताच्या ७/१२ वरील साधे कूळ रामचंद्र तुकाराम डोंगरे रा.कुऱ्हा, दि.१९५१ पासून ही नोंद कमी करुन मिळण्याबाबतचे प्रकरण या महसूल न्यायालयात दाखल केले आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक १८.०७.२०२६

शिक्का **स्वा/-**
**तहसीलदार, चांदूर बाजार**

## JOB JOB JOB

सिर्फ Tally नही Real Accounting सिखो
(100%) Practical Accounting Course
Tally + GST + TDS + Income Tax
(New Batch Starts 1st April)
**--Contact--**
**Deepak Sir**
(कॉमर्सवाला)
**9518319182**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५७०/२०२६
**रमेशराव व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.०७.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rameshrao Mahadeorao Lanjewar, Age 70 Yrs. Occu.: Labourer
2. Kavita Avinash Sonvane, Age 44 Yrs. Occu.:Housewife R/o Pohara Bandi, Tq.Chandur Rly. Dist.Amravati.
3. Vijay Rameshrao Langewar, Aged 42 Yrs. Occu.: Labourer
4. Deepak Rameshrao Lanjewar, Aged 40 Yrs. Occu.: Labourer
5. Sagar Rameshrao Lanjewar, Age 36 Yrs. Occu.: Labourer Appli.No.1, 3, 4 & 5 R/o Near Nag Baba Mandir, Mahajan Pura, Dattu wadi, Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गोदावरी रमेशराव लांजेवार** हे दिनांक 12.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रमेशराव व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रमेशराव व ईतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६०७/२०२६
**जयश्री व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.०६.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Jayshri Wd/o Anilrao Deshmukh, Age 54 Yrs. Occu.: Household
2. Devashri D/o Anilrao Deshmukh, Age 25 Yrs. Occu.: Education R/o Shilangan Road, Deshpande Wadi, Amravati.
3. Sandhya W/o Narendra Deshmukh, Age 68 Yrs. Occu.: Household R/o Bhuteshwar Chouk, Deshpande Wadi, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शकुंतलाबाई पांडुरंग देशमुख** हे दिनांक 05.06.2003रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **जयश्री व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **जयश्री व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६३०/२०२६
**छाया व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.१०.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Chhaya Sanjay Kitukale, Age 51 Yrs. Occu.: Household
2. Sidhhi Rajesh Aware, Age 24 Yrs. Occu.: Education R/o Shilangan Road, Deshpande Wadi, Amravati.
3. Riddhi Rajesh Aware, Age 17 Yrs. Occu.: Labour All R/o Tuljagir Wada, Near Kalaram Mandir, Sarafa, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गोविंदराव लालाजी आवारे आणि उमाबाई गोविंदराव आवारे** हे अनुक्रमे दिनांक **२०.०१.१९९७ व १८.१०.२०२०** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **छाया व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **छाया व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**क्र. रामाक्र/३६/एमआरसी-८१/नेरपिंगळाई/२०२५-२०२६**

## जाहीरनामा

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **सागर भाष्करराव राऊत,** रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे आजी नामे **सरस्वती मोतीरामजी राऊत** यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत नेरपिंगळाई ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.कार्यालय, नेरपिंगळाई येथील जन्म/ मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २५.०२.२०२६

शिक्का **स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.४८१/२०२६
**पुष्पा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२२.०४.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. पुष्पा ज्ञानेश्वर मेहरे, वय ६९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. इंद्रजीत ज्ञानेश्वर मेहरे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - नोकरी
३. गजानन ज्ञानेश्वर मेहरे, वय ४३ वर्षे, व्यवसाय - नोकरी
तिघेही रा.कठोरा रोड, समता कॉलनी, नानीबाई बी.एड.कॉलेज जवळ व्ही.एम.व्ही.अमरावती
४. स्वेता मनिष मसाने, वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.प्लॉट नं.२७-ए, घर नं.९, श्री.वरद गणेश को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लि., पारिजात नगर एन-४, सिडको औरंगाबाद

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत ज्ञानेश्वर किसनराव मेहरे** यांचे दिनांक **१२.०२.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार पुष्पा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पुष्पा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**३०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५३४/२०२६
**आशा व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.०४.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Asha Vasantrao Patil, Age 79 Yrs. Occu.: Household
2. Ashish Vasantrao Patil, Age 51 Yrs. Occu.: Service
3. Vaishali Nilesh Wankhade, Age 50 Yrs. Occu.: Household All R/o Plot No.25, Shrimangal Colony, Behind Harsharaj Colony, V.M.V.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **वसंत उर्फ वसंतराव एकनाथ पाटील (वसंत एकनाथ अरमल)** हे दिनांक 01.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **आशा व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **आशा व ईतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४०७/२०२६
**श्री.रोषण -विरुध्द- निरंक**
पुढील ता.१६.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Roshan Yadav Dharmale, Age 37 Yrs. Occu.: Pvt. Work R/o Laghuwetan Colony, Near Congress Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **यादवराव त्र्यंबकराव धर्माळे** हे दिनांक 26.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **लता यादवराव धर्माळे** ही दिनांक **२१.०२.२००२** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **रोषण विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रोषण विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५०२/२०२६
**शिल्पा व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२४.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shilpa Shashikant Makhe, Age 65 Yrs. Occu.: Household R/o Laxmi Vihar, Ganesh Colony, Shilangan Road, Amravati.
2. Sau.Madhura Harshad Palasapure, Age 42 Yrs. Occu.: Household R/o Gitai Nagar, Sathavane Layout, Wardha
3. Vishank Shashikant Makhe, Age 30 Yrs. Occu.: Service R/o Laxmi Vihar, Ganesh Colony, Shilangan Road, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शशिकांत जयकुमार मखे** हे दिनांक 03.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शिल्पा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शिल्पा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## गाजीपूर अवैध उत्खनन प्रकरण

# ४८ कोटींचा दंड 'फाईलमध्ये कैद'

## अकोट महसूल यंत्रणा नेमकी कोणाच्या दबावाखाली?

**शासनाचे महसूल उद्दिष्ट धुळीस, अधिकाऱ्यांचे मौन आणि राजकीय भूमिकांवर प्रश्नचिन्ह**

**- तलाठी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत संगनमताचा संशय**

**आमदार प्रकाश भारसाकळे यांची भूमिका साशंक; खदान माफियांवर मौन का?**

**समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ मध्ये झालेल्या अवैध गौण खानिज उत्खनन प्रकरणात जवळपास ४८ कोटी रुपयांचा दंड प्रलंबित असताना, अकोट महसूल विभाग आणि खनीकर्म यंत्रणेची भूमिका आता गंभीर संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. शासन सध्या महसूल वसुलीचे आक्रमक उद्दिष्ट निश्चित करून राज्यभर मोहीम राबवत असताना, अकोटमध्ये मात्र कोट्यवधींची दंडाची रक्कम वर्षानुवर्षे 'फाईलमध्येच कैद' राहिल्याचे चित्र समोर आले आहे.

सदर प्रकरणात सुरुवातीला सुमारे ६४ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. मात्र, अपील आणि पुनर्मोजणीच्या प्रक्रियेनंतर ही रक्कम कमी होऊन सुमारे ४८ कोटींवर आली. एवढ्या मोठ्या दंडाची वसुली करणे ही महसूल व खनीकर्म विभागाची प्राथमिक जबाबदारी असताना, प्रत्यक्षात वसुलीबाबत कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. उलट, नोटिसा, अपील, पुनर्मोजणी आणि डिमांड नोटीस या कागदी प्रक्रियेतच प्रकरण फिरत राहिले आहे.

राज्य शासन महसूल वाढविण्यासाठी जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करून अधिकारी वर्गाला सक्तीचे निर्देश देत असताना, अकोटमध्ये मात्र या उद्दिष्टाच्या कितीतरी पट अधिक दंडाची रक्कम प्रलंबित आहे. जर या प्रकरणातील दंडाची वसुली प्रभावीपणे करण्यात आली, तर शासनाच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांची भर पडू शकते अशी चर्चा प्रशासन वर्तुळातच सुरू आहे. मात्र, प्रत्यक्षात ही रक्कम वसूल करण्याबाबत कोणतीही इच्छाशक्ती दिसत नसल्याचे वास्तव समोर येत आहे.

यासंदर्भात अकोट तहसीलदार यांच्याशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न करण्यात आला. अनेक वेळा फोन करूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. एवढ्या गंभीर आर्थिक प्रकरणावर जबाबदार अधिकाऱ्यांनी मौन बाळगणे हेच संशय निर्माण करणारे ठरत असून, 'तहसीलदारांना पत्रकारांची एलर्जी आहे का?' असा सवाल संतप्त नागरिकांकडून विचारला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात अधिक गंभीर आरोप पुढे येत आहेत. तलाठी, मंडळ अधिकारी ते वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांपर्यंत काहींचे 'हात ओले' असल्यामुळेच दंड वसुलीची प्रक्रिया मुद्दाम लांबवली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अन्यथा, एवढ्या मोठ्या रकमेची वसुली इतक्या प्रदीर्घ काळासाठी प्रलंबित राहणे अशक्य असल्याचे जाणकारांचे मत आहे. 'फाईल फिरतेय, पण पैसा येत नाही' ही परिस्थिती प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे.

विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी अवैध उत्खनन उघड झाले, त्या परिसरात संबंधित फर्मचा व्यवसाय अद्यापही सुरू असल्याचे वास्तव प्रशासनाच्या दाव्यांना छेद देणारे आहे. नियमांचा उघडपणे भंग होत असताना देखील महसूल व खनीकर्म विभागाने कठोर कारवाई न केल्याने खदान माफियांचे मनोबल वाढत असल्याचे चित्र आहे. शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असताना प्रशासनाची निष्क्रियता अधिकच खटकणारी ठरत आहे.

एकूणच, गाजीपूर अवैध उत्खनन प्रकरण हे आता केवळ महसूल वसुलीचे प्रकरण राहिले नसून, प्रशासनिक उदासीनता, संभाव्य संगनमत आणि राजकीय भूमिकांवरील प्रश्नचिन्हे यांचा गुंता बनला आहे. शासनाच्या महसूल धोरणाला हरताळ फासणाऱ्या या प्रकरणात आता वरिष्ठ स्तरावरून ठोस आणि कठोर हस्तक्षेप होणे अत्यावश्यक बनले आहे. अन्यथा, ४८ कोटी रुपयांचा हा दंड 'कागदोपत्री'च राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### ■ आमदारांची भूमिका साशंक?

अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात स्वतःची बदनामी झाल्याचा दावा करत पत्रकारांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव दाखल करत आक्रमक भूमिका घेतली होती. मात्र, त्याच आक्रमकतेने आपल्या मतदारसंघातील या कोट्यवधींच्या अवैध उत्खनन प्रकरणावर त्यांनी का भूमिका घेतली नाही? महसूल अधिकाऱ्यांची बैठक घेऊन दंड वसुलीबाबत सक्तीचे आदेश का दिले जात नाहीत? खदान माफियांविरोधात स्पष्ट भूमिका का घेतली जात नाही? की या प्रकरणात काही राजकीय दबाव आहे, ज्यामुळे अधिकारी वर्ग कारवाईपासून दूर राहत आहे? असे प्रश्न आता नागरिक उघडपणे उपस्थित करीत आहेत.

### मौन की संगनमत ?

तहसील कार्यालयापासून जिल्हा पातळीपर्यंत या प्रकरणात सातत्याने मौन पाळले जात आहे. नोटिसा, अपील, पुनर्मोजणी पण वसुली नाही! हा केवळ प्रशासकीय विलंब आहे की ठरवून केलेला 'खेळ'? या प्रश्नाचे उत्तर अजूनही मिळालेले नाही.

### ■ टार्गेट मोठे, वसुली शून्य !

राज्य शासन महसूल वसुलीसाठी आक्रमक धोरण राबवत असताना अकोटमध्ये मात्र ४८ कोटी रुपयांचा दंड प्रलंबित आहे. जर हीच रक्कम वसूल झाली, तर केवळ अकोट तालुका शासनाच्या महसूल वाढीत मोठा वाटा उचलू शकतो. मात्र, अधिकारी वर्गाच्या उदासीनतेमुळे ही संधी दवडली जात असल्याचे स्पष्ट दिसते.

---

## उड्डाणपुलावरील लोखंडी प्लेट कोसळून युवक ठार

### रिध्दपूर येथील घटना, ठेकेदाराच्या हलगर्जीपणावर संताप

**अमरावती/प्रतिनिधीः-** गॅस सिलेंडर आणण्यासाठी निघालेल्या एका निष्पाप युवकाचा जीव ठेकेदाराच्या बेजबाबदार कारभारामुळे गेला, तर दुसरा युवक गंभीर जखमी अवस्थेत जीवनाशी झुंज देत आहे. ही घटना रिध्दपूर येथील बांधकामाधीन रेल्वे उड्डाणपुलाखाली घडली.

या भीषण घटनेत ईश्वर भुरभुरे (वय ४५, रा. दाभेरी) यांचा मृत्यू झाला असून प्रभू वानखडे (वय ३५) गंभीर जखमी झाला आहे. दोघेही दुचाकीवरून चांदूर बाजारकडे सिलेंडर आणण्यासाठी जात असताना उड्डाणपुलाखालून जात होते. त्याचवेळी सुमारे एक



क्विंटल वजनाची लोखंडी प्लेट थेट ईश्वरच्या डोक्यावर कोसळली. हा आघात प्रचंड गंभीर होता, रुग्णालयात पोहोचल्यावर डॉक्टरांनी ईश्वर भुरभुरे यांना ☞(पान २ वर)


---

## पिता-पुत्रावर प्राणघातक हल्ला

**संजय गांधी नगरातील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील संजय गांधी नगर परिसरात जुन्या वादातून पिता-पुत्रावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. मंगळवारी रात्री घडलेल्या या घटनेत दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

प्राप्त माहितीनुसार, हिरामण शंकर बोरकर (वय ६५) आणि त्यांचा मुलगा धम्मदीप हिरामण बोरकर (वय ४०) हे दोघे ३१ मार्च रोजी रात्री साडे नऊच्या सुमारास आपल्या घराबाहेर बसले होते. त्याच वेळी शेजारी



राहणाऱ्या ४ ते ५ हल्लेखोरांनी जुन्या किरकोळ वादाचा राग मनात ठेवत अचानक त्यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला चढवला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पिता-पुत्राला सोडून हल्लेखोर घटनास्थळा वरून पसार झाले. घटनेनंतर ☞(पान २ वर)

---

## गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

### अंजनगाव बारी जंगलातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंजनगाव बारी जंगल परिसरात एका ३५ वर्षीय



युवकाने पळसाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी मर्ग दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. मृताची ओळख अरुण रमेश उईके (वय ३५, रा. करजगाव, बालवाडी, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती) अशी झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केले की, संबंधित घटना ३१ मार्च २०२६ रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. फिर्यादी हे ☞(पान २ वर)

---

## सातुर्णा परिसरातील फ्लॅटमध्ये देहव्यापाराचा पर्दाफाश



### गुन्हे शाखेची धडक कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सातुर्णा परिसरातील भव्यदिप अपार्टमेंटमधील एका फ्लॅटमध्ये सुरू असलेल्या अवैध देहव्यापारावर अमरावती शहर गुन्हे शाखेने धडक कारवाई करत छापा टाकला. या कारवाईत एका महिलेसह दोन युवक आणि दोन युवतींना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना मिळालेल्या गोपनीय ☞(पान २ वर)

---

## महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावले

### दुचाकीवरून आलेल्या दोन युवकांची धाडसी लूट

**अमरावती/प्रतिनिधीः-** दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात युवकांनी महिलेच्या गळ्यातील तब्बल १ लाख ५० हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (ता. ३१) सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास हिंदू स्मशानभूमीलगत घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून राजापेठ पोलिसांनी गुन्हा नोंदवून लुटारूंना पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू केली आहे.

एकनाथपुरम येथील रहिवासी पूजा नितीन जगताप (वय ४७)



या नेटवर्क मार्केटिंगचे काम करतात. मंगळवारी दुपारी अकोली मार्गावरील एका कॉलनीत मार्केटिंगची बैठक असल्यामुळे त्या आणि त्यांची मैत्रीण रश्मी पांडव या दोघी वेगवेगळ्या दुचाकींवरून तिकडे गेल्या होत्या. बैठक संपल्यानंतर गडगडेश्वर परिसरात आणखी एक बैठक असल्याने ☞(पान २ वर)

---

## उड्डाण पुलाखाली तलवारींसह इसम ताब्यात

### नांदगाव पेठ पोलिसांची कारवाई

अमरावती/प्रतिनिधी:- नांदगाव पेठ पोलिसांनी अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या एका इसमाला अटक करून त्याच्याकडून तलवार जप्त केली. स्वप्निल चिंटुसिंग घागरे ऊर्फ स्वप्निल भिमराव मेश्राम (३१, रा. नांदगाव पेठ) असे आरोपीचे नाव आहे. ही कारवाई मंगळवारी



दि. १ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी उड्डाण पुलाखाली करण्यात आली. पोलीस स्टेशन नांदगाव पेठ ☞(पान २ वर)

---

## जिल्ह्यात 'एचटीबीटी' कापूस बियाण्यांवर बंदी

### नियमांचे उल्लंघन केल्यास ५ वर्षे कारावास

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात खरीप हंगाम २०२६-२७ ची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर कृषि विभागातर्फे शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. कापूस लागवडीसाठी शासनाची मान्यता नसलेल्या बीजी-३ (एचटीबीटी) बियाण्यांचा वापर टाळावा, असे निर्देश कृषी विभागाने दिले आहेत. नियमाचे उल्लंघन केल्यास पाच वर्षे कारावास आणि एक लाख रूपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.




शासनाने केवळ बीजी-१ आणि बीजी-२ या वाणांच्या कापूस बियाण्यांना मान्यता दिली आहे. 'राउंडअप बीटी', 'चोर बीटी', 'वीडगार्ड' किंवा एचटीबीटी यासारखी बियाणे बेकायदेशीर असून ती पर्यावरणास घातक आहेत. या बियाण्यांचा वापर ☞(पान २ वर)

---

## दुचाकीसह खड्ड्यात कोसळून युवकाचा मृत्यू

### बहिणीकडे सिलेंडर घेऊन जातांना अपघात

**तिवसा/प्रतिनिधीः-** बहिणीकडे रिकामे सिलेंडर घेऊन दुचाकीने जाणाऱ्या भावाचा रात्रीच्या अंधारात खड्ड्यात कोसळून मृत्यू झाल्याची घटना आज १ एप्रिल रोजी दुपारी उघडकीस आली.

अंकुश पांडुरंग अमझरे (वय २८,रा.टाकरखेडा पूर्णा,ता.चांदुर बाजार) असे अपघातात ठार झालेल्या युवकाचे नाव आहे.अंकुश हा गावातून ३० मार्च रोजी रिकामे सिलेंडर दुचाकी क्रमांक एमएच २७, सीपी-




६३८९ ला बांधून भारसवाडा येथील बहिणीकडे सायंकाळी निघाला होता. दरम्यान सारसी ते आनंदवाडी जवळ असलेल्या कल्याणराव वानखडे यांच्या शेताजवळील ☞(पान २ वर)

---

## शेअर मार्केटमध्ये नफा देण्याचे आमिष

### साडे पाच लाखांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत साईनगर परिसरातील एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची सुमारे साडे पाच लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सायबर पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

माहितीनुसार, अकोली रोडवरील नित्यानंद कॉलनी येथे राहणारे महेंद्र विश्वनाथ शेंद्रे (वय ५८) यांनी सायबर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, २० फेब्रुवारी ते २१ मार्चदरम्यान एका अज्ञात



महिलेने त्यांच्याशी संपर्क साधून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. या महिलेने शेंद्रे यांना एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सहभागी करून घेत 'टीसीजी प्लस' नावाचे ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर खाते उघडून सुरुवातीला अडीच लाख रुपये गुंतवण्यास भाग पाडले. पुढे अधिक नफ्याचे आमिष दाखवत १५ लाख रुपये गुंतवून शेअर्स खरेदी करण्यास सांगितले. मात्र, इतकी रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगितल्यावर संबंधित महिलेने कर्ज काढून गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला. यानुसार शेंद्रे यांनी गुंतवणूक केल्यानंतर संबंधित ॲपवर त्यांना तब्बल ६३ लाख ८६ हजार २०० रुपयांचा नफा झाल्याचे दर्शविण्यात आले. हा नफा काढण्यासाठी ३० टक्के रक्कम भरण्याची अट घालण्यात आली. त्यानुसार शेंद्रे यांनी ३ लाख रुपये आरटीजीएसद्वारे दिलेल्या खात्यावर जमा केले. ☞(पान २ वर)

---

## नरेंद्र केडिया यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील केडिया मॉलचे संचालक नीरज आणि धीरज केडिया



यांचे वडील नरेंद्र झुंबरलालजी केडिया यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनामुळे व्यापारी क्षेत्रात शोक व्यक्त केला जात आहे. त्यांची अंतिम यात्रा गुरुवार दिनांक २ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून आशीर्वाद निवासस्थान, जिजाऊ नगर, विद्यापीठ रोड येथून निघणार असून हिंदू स्मशान भूमी येथे पोहोचेल, तिथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे आणि मोठा आप्तपरिवार आहे.

---

## नवसारी येथे उभारणार भव्य क्रीडा संकुल

### अमरावती महापालिकेला शासनाची १६,७०८ चौ. मी. जागा विनामूल्य

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब**

**पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार**

**मुंबई/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील क्रीडाप्रेमींसाठी आनंदाची बातमी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अमरावतीलगतच्या नवसारी येथे १६,७०८ चौ. मी. जागा क्रीडा संकुलासाठी अमरावती महानगरपालिकेला विनामूल्य देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. महसूलमंत्री व अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने हा निर्णय घेतला.

■ अमरावती शहरासाठी क्रीडांगण ही आवश्यक बाब होती. या ठिकाणी तयार झालेले अनेक खेळाडू देश आणि जगभरात लौकिक मिळवत आहेत. त्यामुळे सामाजिक हित आणि खेळाडूंची गरज लक्षात घेऊन या क्रीडांगणासाठी शासकीय जागा महापालिकेस विनामूल्य देण्यात येत आहे. **-चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री व पालकमंत्री, अमरावती**



या जागेवर विकास योजनेअंतर्गत 'खेळाचे मैदान' असे आरक्षण होते आणि त्याचा आगाऊ ताबा महापालिकेला देण्यात आला होता. मात्र, महापालिकेने या जागेवर पूर्वपरवानगीशिवाय त्रयस्थांसोबत करार ☞(पान २ वर)

---

## शहरात वाहतूक नियमांमध्ये अंशतः बदल

### पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरात श्री क्षेत्र चांगापूर हनुमान मंदीर, चांगापूर अमरावती येथे दरवर्षी प्रमाणे हनुमान जयंतीच्या दिवशी मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी असते. दि. ०२ एप्रिल २०२६ गुरूवार, सकाळी ५ वाजेपासून रात्री १२ वाजेपर्यंत वाहतूक नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. यासाठी पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी अधिसूचना जारी केली आहे.

सर्व वाहनांना वाहतूकीसाठी बंद करण्यात येणारे मार्ग- चांगापूर फाटा ते श्री हनुमान मंदीर चांगापूर हा मार्ग सर्व




प्रकारच्या जड वाहनांकरीता प्रवेश बंदी राहील.

वाहतूकीस पर्यायी मार्ग - चांगापूर फाटा ते श्री हनुमान मंदीर चांगापूर रेल्वे अंडर बायपास या मार्गे फक्त दर्शनाकरीता जाणारे दुचाकी, चारचाकी वाहनांना प्रवेश राहील. हनुमान मंदीर चांगापूर येथे दर्शन घेवून परतणाऱ्या नागरिकांनी आपल्या दुचाकी, चारचाकी वाहनांसाठी मंदीरा पासून बाहेर निघणारे मार्ग- अयोध्या नगरी ले-आऊट ते रेवसा फाटा या मार्गाचा अवलंब करावा.

पार्कींग व्यवस्था- मंदीर परिसरात वाहन पार्कींग फलक लावले असल्या त्या ठिकाणीच वाहन धारकांनी वाहने पार्क करावे.

वाहतूक परिस्थितीनुसार वाहतूक थांबविणे व वळविणे याबाबत सर्व अधिकार वाहतूक ☞(पान २ वर)